कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे संस्था, गडहिंग्लज

# शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी.एस.कदम विज्ञान महाविद्यालय आणि

# संभाजीराव माने साहित्य, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय

गडहिंग्लज. जि. कोल्हापूर.

# शिवराज २०१७



# महाविद्यालयाचा सन्मान




जत (जिल्हा सांगली) येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात, शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेच्या कला शाखेतून निमशहरी गटातील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते स्वीकारताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.वाय. कोतमिरे



शिवाजी विद्यापीठात मराठी (एम.ए) विषयात सर्वप्रथम. पदवीदान समारंभात पारितोषिक स्वीकारताना कु. रूपाली लक्ष्मण होडगे

# शिवराज २०१७

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज संचलित

## शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय आणि संभाजीराव माने साहित्य, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

## संपादक मंडळ

### संपादक



डॉ. मनमोहन राजे

### अध्यक्ष



प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे

## संपादन साहाय्य



डॉ. एस. बी. माने
हिंदी विभाग



प्रा. डी.यू. जाधव
इंग्रजी विभाग

# भावपूर्ण आदरांजली...



**प्राचार्य बी. एम. चांडके**
संस्थेचे सचिव



**प्रा. रजनीताई तेलवेकर**
संस्थेच्या संचालिका



**शीलप्रभा माने**



**नरसिंग गुरुनाथ पाटील**
चंदगडचे माजी आमदार



**जयललिता**
मुख्यमंत्री, तमिळनाडू



**डॉ. द. ना. धनागरे**
शिवाजी विद्यापीठाचे
माजी कुलगुरु



**डॉ. आनंद यादव**
साहित्यिक



**वामन होवाळ**
साहित्यिक



**डॉ. कृष्णा किरवले**
माजी मराठी विभाग प्रमुख
शिवाजी विद्यापीठ



**महाश्वेतादेवी**
साहित्यिक



**किशोरी अमोणकर**
गायिका

स्फूर्ती

शिवराज २०१७



# कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे

# अभिनंदन !



**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
शिवाजी विद्यापीठाच्या
कुलसचिव पदावर निवड.





**डॉ. डी. टी. शिर्के**
शिवाजी विद्यापीठाच्या
विशेष कार्य अधिकारीपदी निवड



**श्री. संतोष शहापूरकर**
कोल्हापूर येथील
शिवपुरस्काराने सन्मान



**प्रा. एन.आर. कोल्हापुरे**
विद्यापीठ अनुदान आयोगाच्या
टीचर फेलोशिपसाठी निवड
(राज्यशास्त्र)



**डॉ. एस.डी.सावंत**
समाजशास्त्र विषयातील
पी.एच.डी पदवी प्राप्त



**प्रा. आर. पी. हेंडगे**
विद्यापीठ अनुदान आयोगाच्या
टीचर फेलोशिपसाठी निवड
(समाजशास्त्र)

# कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्थेचे

## अध्यक्ष



# मा. किसनरावजी कुराडे

# सेवानिवृत्ती



**प्रा. डॉ. एन. आर सावंत**
इंग्रजी विभाग





**प्रा. डॉ. बी. डी मुरगी**
भौतिकशास्त्र विभाग



पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अरूण आडसूळ यांची महाविद्यालयास भेट. त्यांचे स्वागत करताना संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे




पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या स्वागतसमारंभात मार्गदर्शन करताना शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे

# शिवराज २०१७

## शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय




## प्राचार्य. डॉ. एस. वाय. कोतमिरे

**M.Sc.,Ph.D.**



## उपप्राचार्य . आर. बी. कांबळे एम.ए.,बी.एड.

संभाजीराव माने कनिष्ठ महाविद्यालय



## प्रा. पी.एम. भोईटे एम.एस्सी.,बी.एड.

पर्यवेक्षक, संभाजीराव माने कनिष्ठ महाविद्यालय



## श्री. संतोष शहापूरकर एम.ए.,एम.बी.ए.

प्रबंधक, शिवराज महाविद्यालय

## शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

### स्थानिक व्यवस्थापन समिती
### (सन २०१५-१६ पासून)

१) मा. प्रा. के. व्ही. कुराडे : अध्यक्ष
२) मा. प्रा. जे. वाय. बारदेस्कर : संस्था प्रतिनिधी
३) मा. प्रा. व्ही. बी. कुरळे : शिक्षक प्रतिनिधी
४) मा. प्रा. ए. व्ही. कुराडे : शिक्षक प्रतिनिधी
५) मा. प्रा. के. बी. केसरकर : विविध क्षेत्रातील प्रतिनिधी
६) मा. श्री. आर. जी. येरटे : विविध क्षेत्रातील प्रतिनिधी
८) मा. श्री. एस. आर. शहापूरकर : प्रशासक सेवक प्रतिनिधी
८) मा. प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे : सचिव

## संभाजीराव माने साहित्य, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

### शाळा समिती
### (सन २०१५-१६ पासून)

१) मा. प्रा. के. व्ही. कुराडे : अध्यक्ष
२) मा. प्राचार्य बी. एम. चांडके : संस्था प्रतिनिधी (निधन)
३) मा. प्रा. जे. वाय. बारदेस्कर : संस्था प्रतिनिधी
४) मा. प्रा. ए. व्ही. कुराडे : संस्था प्रतिनिधी
५) मा. प्रा. आर. बी. कांबळे : प्राध्यापक सदस्य
६) मा. श्री. एस. आर. शहापूरकर : प्रशासक सेवक प्रतिनिधी
७) मा. प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे : सचिव

## दि प्रेस अ‍ॅण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक अ‍ॅक्ट नियम फॉर्म नं. ४ प्रमाणे निवेदन


| | | |
|---|---|---|
| **प्रकाशन स्थळ** | : | शिवराज कला, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज (जि. कोल्हापूर) |
| **प्रकाशन काळ** | : | वार्षिक |
| **प्रकाशक** | : | **प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे** |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **पत्ता** | : | शिवराज कला, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर - ४१६ ५०२. |
| **दूरध्वनी** | : | ०२३२७ - २२२३०७. |
| **संपादक** | : | **डॉ. मनमोहन राजे** |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **पत्ता** | : | शिवराज कला, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर - ४१६ ५०२. |
| **दूरध्वनी** | : | ९४२३८२४८९३. |
| **मुद्रक** | : | **अतुल कोलते** |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **पत्ता** | : | श्री सरस्वती ऑफसेट, कडगांव रोड, गडहिंग्लज ४१६ ५०२. |
| **स्वामित्व** | : | शिवराज कला वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर - ४१६ ५०२. |


**मी प्राचार्य, डॉ. एस. वाय. कोतमिरे असे जाहीर करतो, की वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजूतीप्रमाणे सत्य आहे.**

**ह्या अंकातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखनाची निवड, संपादन व मुद्रीत शोधन सहसंपादकांनी केले आहे.**

# मुखपृष्ठा विषयी थोडसं

मुखपृष्ठावर देशामध्ये महत्त्वपूर्ण घडलेल्या घटना आणि प्रसंगांसंबंधी काही छायाचित्रे घेतलेली आहेत. 'अग्नी : ५' हे त्यापैकी एक आहे. देशाच्या संरक्षणाला तितकेच महत्त्वाचे स्थान आहे. देशातील शास्त्रज्ञ त्यासाठी आहोरात्र संशोधन करत असतात. संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने २००५ पासून भारतीय सेनादलाकरिता अग्नी-५ हे क्षेपणास्त्र विकसित केले आहे. ते आंतरखंडीय असून ५००० किलोमीटर त्याचा क्रियात्मक पल्ला आहे. ५० टन वजन, अवघ्या २० मिनिटात लक्ष भेदण्याची शक्ती व एक टन अण्वस्त्रे वाहून नेण्याची त्यामध्ये क्षमता आहे. त्याची २६ डिसेंबर २०१६ रोजी शेवटची चाचणी घेतली. त्यानंतर २०१७ मध्ये ते सेनादलामध्ये सेवेसाठी दाखल झाले आहे. रिंग लेसर गायरोस्कोप, इनर्शियल नेव्हिगेशन प्रणाली व पर्यायी जी. पी. एस. वापर त्यामध्ये केला असून एकावेळी तीन लक्षांचा वेध ते घेऊ शकते.

भारत सरकारने चालू वर्षी चलनामधून हजार आणि पाचशेच्या नोटा रद्द करून त्याठिकाणी दोन हजार आणि पाचशेची नवीन नोट चलनामध्ये आणली आहे. पैशाच्या रोख व्यवहाराऐवजी ई-पेमेंटला सरकाने महत्त्व दिले आहे. नागरिकांनी ऑनलाईन बँकिंग व्यवहार करावेत, मोबाईल बँकिंग, कार्डपेमेंट करावे असे भारत सरकारने म्हटले आहे. नागरिकांचा त्याला प्रतिसाद मिळत आहे.

ब्राझिलमधील रिओ द जेनरो येथील माराझाना स्टेडियममध्ये ५ ऑगष्ट ते २१ ऑगष्ट २०१६ या काळामध्ये ऑलिम्पिक स्पर्धा संपन्न झाल्या. बॅडमिंट या खेळामध्ये भारताच्या पी. वी. सिंधूने १९ ऑगस्ट रोजी रौप्यपदक जिंकले, तर साक्षी मलिकने १७ ऑगष्ट रोजी कुस्तीमध्ये कास्यपदक जिंकून भारताचे नाव अजरामर केले आहे.

साहित्य विश्वामध्ये मानाचा समजला जाणारा साहित्य अकादमी पुरस्कार आसाराम लोमटे यांच्या 'आलोक' कथा संग्रहाला मिळाला आहे. खेड्यापाड्यातील कथा आणि व्यथा त्यांनी काळजाला भिडणाऱ्या शब्दातून वाचकांपर्यंत पोहोचवल्या आहेत.

# संपादकीय...



'शिवराज २०१७' ह्या वार्षिक नियतकालिकाचे संपादकीय लिहित असताना मला मनोमन आनंद होत आहे. नियतकालिक म्हणजे महाविद्यालयाचा आरसा असतो. महाविद्यालयामध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी विविध कार्यक्रमांचे नियोजन करुन त्यांच्या कलागुणांना वाव दिला जातो, तेच आमचे ध्येय आहे. महाविद्यालयातील शिक्षकवर्ग तळमळीने अध्यापनाचे कार्य करतो, तसा आमचा विद्यार्थीही तळमळीने अध्ययन करतो. विद्यार्थी केवळ पुस्तकात रमत नाही, तर क्रीडांगणावर तो चमकतो, शोध संशोधनात तो पुढे आहे, विद्यापीठीय पातळीवर त्याने यश मिळवले आहे.

आजपर्यंतचा इतिहास हे सांगतो की, महाविद्यालयीन जीवनात नियतकालिकासाठी ज्यांनी लेखन केले, ते पुढे लेखक आणि कवी झालेले दिसतात. आमच्या महाविद्यालयातून असे लेखक, कवी झालेले आहेत. लेखनासाठी जेव्हा आवाहन केले तेव्हा अनेक विषयांवर विद्यार्थ्यांनी लेख आणि कविता लिहिल्या. कु.सुप्रिया कदम या विद्यार्थिनीने 'विठ्ठल रामजी शिंदे : कार्य आणि कर्तृत्व' हा संशोधनात्मक लेख लिहिला. कु. संध्याराणी पाटीलने 'कुटुंब असंही ?' ह्या लेखातून कुटुंबाबद्दल लिहिले आहे. जीवन कसे जगावे ह्या बद्दल कु. अश्विनी कसुतेने विचार मांडले आहेत. पाण्याचे महत्व 'पाणी' या संवादातून कु. देवयानी पाटीलने सांगितले आहे. हा काळ स्पर्धा परीक्षेचा काळ आहे. कु. अश्विनी पोवार या विद्यार्थिनीने स्पर्धा परीक्षा आणि अभ्यासाचे महत्त्व तिच्या लेखातून सांगितले आहे. कु. महादेवी विजय पोळ ह्या विद्यार्थिनीने 'आनंद यादव यांचे कथा साहित्य' हा संशोधनात्मक लेख लिहिला आहे. वृक्ष आणि वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे; हे कु. तेजश्री मनमोहन राजे यांनी 'वटवृक्षाचे कथन' ह्या लेखातून सांगितले आहे. अशा विविध लेखातून आमच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींची वैचारिक जडणघडण दिसून येते. ते आता केवळ विद्यार्थी नाही तर समाजाचे मार्गदर्शकही आहेत. काही विद्यार्थ्यांनी कविता लिहून आपले चिंतन व्यक्त केले आहे.

रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, नृत्य, हस्तकला, पुष्परचना, पाककला अशा विविध स्पर्धा आम्ही घेत असतो, त्यांना प्रसिद्धी देण्याचे काम प्रस्तुत नियतकालिकामधून केले आहे. प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांनीही शैक्षणिक वर्षामध्ये चर्चासत्र, शोधनिबंध लेखन, कार्यशाळांमध्ये सहभाग घेतला आहे, त्याची नोंद आम्ही नियतकालिकामध्ये घेतली आहे.

प्रस्तुत नियतकालिकास आकार येण्यासाठी अनेकांनी सहकार्य केले आहे. संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे, महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे, डॉ. एस. बी. माने, प्रा. डी. यू. जाधव, सरस्वती ऑफसटचे मालक अतुल कोलते व त्यांचे कर्मचारी, ऑपरेटर फिरोज मणेर या सर्वांचे मन:पूर्वक आभार !

**डॉ. मनमोहन राजे**
संपादक

# मनोगत...



'शिवराज २०१७' या आमच्या वार्षिक नियतकालिकामध्ये माझे मनोगत व्यक्त करताना मला खूप आनंद होत आहे. आमचे महाविद्यालय दिवसेंदिवस प्रगतीपथावर आहे. संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. किसनराव कुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाची वाटचाल सुरु आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय आणि उत्तम शिक्षण मिळावे या हेतून महाविद्यालय उभे राहिले आहे. सुरुवातीला काही शेकड्यामध्ये विद्यार्थी संख्या होती, आज साडेपाच हजारापर्यंत विद्यार्थी विविध प्रकारच शिक्षण महाविद्यालयात घेत आहेत. अर्थात महाविद्यालयाचा व्याप वाढत आहे. माझे सहकारी प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचारी त्यांच्या त्यांच्या कामामध्ये प्रवीण आहेत. त्यांना कोणतीही जबाबदारी दिली, तरी ती पार पाडण्यास सक्षम आहेत, याची मला खात्री आहे. त्यामुळे तीन तालुक्यातील विद्यार्थी शिवराज कॉलेजमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी धडपडत असतात.

मी आता तुम्हाला महाविद्यालयाची सर्वात मोठी **Good News** सांगणार आहे. मी हे जे सांगतोय ते केवळ वरवरचे नाही, तर त्याला आधार आहे. शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेच्या कला शाखेतून निमशहरी गटातील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक आमच्या महाविद्यालयास प्राप्त झाले आहे. जत (जि. सांगली) येथे रामराव महाविद्यालयामध्ये अत्यंत दिमाखदार सोहोळ्यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे त्यांच्या हस्ते पारितोषिक मी स्वीकारले. माझ्यासोबत संस्थेचे पदाधिकारी, सहकारी प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते. मिळालेल्या या पारितोषिकासाठी महाविद्यालयातील सर्व सहकाऱ्यांचे योगदान आहे.

महाविद्यालयाचा लौकिक वाढवणाऱ्या आणखी काही घटना आहेत. कु. रुपाली होडगे यांनी एम.ए. (मराठी) या वर्गामध्ये शिवाजी विद्यापीठात सर्व प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे, सोबत त्यांना विद्यापीठाची आठ पारितोषिके प्राप्त मिळाली आहेत. हे मिळालेले यश म्हणजे शिवराज कॉलेजच्या शिरपेचात मानाचा तुरा आहे. आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यापीठीय पातळीवरही कोठेही कमी नाहीत. यावर्षी शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी वीस विद्यार्थी प्राप्त ठरलेले आहेत.

महाविद्यालयामध्ये अनेक विभाग कार्यरत आहे. त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. क्रीडाविभाग संपन्न आहे. शिवाजी विद्यापीठाची ॲथलेटिक्समधील चॅम्पियनशिप सलग पाचव्यांदा मिळाली आहे. त्याचबरोबर अनेक खेळाडू विद्यापीठीय पातळीवर चमकदार कामगिरी दाखवत आहेत. राष्ट्रीय पातळीवरही विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे. पॉवर लिफ्टिंग या क्रीडा प्रकारामध्ये इंडोनेशिया येते होणाऱ्या स्पर्धेसाठी अजिंक्य चौगुले याची निवड झाली आहे. त्याचबरोबर इतर अनेक विषयांमध्ये विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळविला आहे, असे अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी आहेत. माझे सहकारी प्राध्यापकही विविध चर्चासत्रामध्ये संशोधन पेपर सादर करत आहेत. प्रशासकीय कर्मचारीही विविध कोर्सला जाऊन स्वत:ला अपडेट करत आहेत. संस्थेचे अध्यक्ष प्रा.किसनराव कुराडे, सर्व पदाधिकारी यांचे सहकार्य आणि मार्गदर्शनामुळेच महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल सुरु आहे.

**डॉ. एस. वाय. कोतमिरे**

प्राचार्य

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज

# शिवराज महाविद्यालय

साहित्य, वाणिज्य आणि डी. एस्. कदम विज्ञान महाविद्यालय

गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

## विविध विद्याशाखा

## ११ वी, १२ वी आर्टस्, कॉमर्स, सायन्स

- B.A.
- B.Com
- B.Sc.
- B.B.A.
- B.C.A.
- B.C.S.
- B.Sc. (Comp.)
- M.A. मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र
- M. Com अकौंटन्सी
- M.B.A.
- कर्मवीर अध्यापक विद्यालय (D.T.Ed.)
- माळी हायस्कूल
- बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण
- ग्रामीण पत्रकारिता
- लायब्ररी सायन्स सर्टिफिकेट कोर्स

N.S.S., N.C.C, SPORTS, FINE ARTS, CULTURAL ACTIVITIES, RICH LIBRARY

# महाविद्यालयातील विशेष कार्यक्रम



नागपूरचे चिदानंद भारती स्वामी 'सामाजिक परिवर्तन' विषयावर मार्गदर्शन करत असताना



शिवराज कॉलेजचे मुखपत्र 'शिवराजीयन या ' पाक्षिकाचे प्रकाशन करताना संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे आणि मान्यवर



मराठी राजभाषा दिनानिमित्त मार्गदर्शन करत असताना डॉ. आनंद कुंभार



'विवेकवाहिनी' समितीमार्फत 'अज्ञानातून विज्ञानाकडे' या विषयावर बोलताना प्रा. पी. एम. भोईटे



महिला अन्याय निवारण समितीच्या वतीने संपन्न कार्यशाळेत मार्गदर्शन करत असताना पोलिस निरीक्षक व्ही. व्ही. हसबनीस



संभाजीराव माने कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात बोलताना प्राचार्य राजेंद्र ठाकूर

# स्नेहसंमेलनातील क्षणचित्रे



डॉ. एस.के नेर्ले
स्नेहसंमेलन प्रमुख




स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी नांदवडेकर मार्गदर्शन करताना



पोष्टर स्पर्धेतील कलाकृतींची पाहणी करताना संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे



मॉडर्न जमान्याचा नृत्याविष्कार



लोकनृत्य सादर करताना शिवराजचे कलावंत

'जय मल्हार' या प्रसिध्द दूरदर्शन मालिकेतील दृश्य सादर करताना शिवराजचे कलाकार





बहारदार लावणीनृत्य सादर करणारी शिवराजची लावणीसाम्राज्ञी

# स्नेहसंमेलनातील क्षणचित्रे




स्नेहसंमेलनातील रांगोळी स्पर्धेतील
प्रथम क्रमांकाची रांगोळी



चित्रकला स्पर्धेतील कु. मनीषा पाटील (B.SC I) यांनी
रेखाटलेले प्रथम क्रमांकाचे चित्र




कु. स्मिता डोमणे (B.C.S III)
तृतीय क्रमांकाचे चित्र



शरीर सौष्ठव स्पर्धेतील शिवराज 'श्री' आणि
विजयी स्पर्धक

कु. रेणू चराटी (B.CS I)
द्वितीय क्रमांकाचे चित्र





पुष्परचना स्पर्धेतील प्रथम
क्रमांकाची पुष्परचना

# क्रीडाविभाग वरिष्ठ



प्रा.आर. डी. मगदूम
शारीरिक शिक्षक



शिवाजी विद्यापीठ आणि महाविद्यालयाच्या वतीने संपन्न झालेल्या वेटलिफ्टिंग स्पर्धेचे उद्‌घाटनः बीभीषण पाटील व प्रा. पी.टी गायकवाड यांच्या हस्ते



ग्वाल्हेर येथे झालेल्या राष्ट्रीय हॉकी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाला तृतीय क्रमांक प्राप्त. संघातील महाविद्यातील विद्यार्थिनी



शिवाजी विद्यापीठ हॉकी स्पर्धेतील उपविजेता संघ



ग्वाल्हेर येथे झालेल्या राष्ट्रीय हॉकी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघात महाविद्यालयातील खेळाडू



राष्ट्रीय हॉकी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठातील संघामध्ये महाविद्यातील सहभागी खेळाडू (अमृतसर-पंजाब)



शिवाजी विद्यापीठची ॲथलेटिक चॅम्पियनशिप सलग पाचव्यांदा मिळविणारा संघ



शिवाजी विद्यापीठ पातळीवर तलवारबाजीमध्ये चॅम्पियनशिप मिळवणार संघ



राज्यस्तरीय क्रॉसकंट्री स्पर्धा (नागपूर) यश मिळविणारी नम्रता दंडगीदास, आकाश कडूकर, प्रियांका जाधव

# क्रीडाविभाग वरिष्ठ



शिवाजी विद्यापीठ क्रॉसकंट्री
उपविजेता संघ




इंडोनेशिया येथे होणाऱ्या अशियाई
पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत भारतीय संघात
निवड झालेला अजिंक्य चौगुले



नम्रता दंडगीदास
बी.एस सी भाग २
बेंगलोर येथील राष्ट्रीय
क्रॉसकंट्री स्पर्धेत निवड



प्रियांका गवळी
बी.ए भाग २
फेन्सिंग राष्ट्रीय
खेळाडू



तेंजाली पाटील
बी.सी कॉम भाग १
राष्ट्रीय फूटबॉल
स्पर्धा



अक्षय सावंत
बी.ए भाग १
राष्ट्रीय फूटबॉल
खेळाडू



अमृता वडाम
एम.कॉम भाग १
फूटबॉल राष्ट्रीय
खेळाडू




मालू शेटे
एम.कॉम भाग १
फूटबॉल राष्ट्रीय
खेळाडू



विकास चौगुले
बी. ए भाग १
ॲथलेटिक राष्ट्रीय
खेळाडू

# राष्ट्रीय सेवा योजना



**प्रा. डॉ. ए. जी. हारदारे**
प्रमुख
राष्ट्रीय सेवा योजना



**प्रा. ए. व्ही. कुराडे**
साहाय्यक
राष्ट्रीय सेवा योजना



**प्रा. जी. जी. गायकवाड**
साहाय्यक
राष्ट्रीय सेवा योजना



महाविद्यालय परिसर स्वच्छता
करताना स्वयंसेवक



जनधन योजना व कॅशलेस इंडिया यासंदर्भात माहिती
संकलित करताना स्वयंसेवक



मतदार जनजागृती कार्यक्रम तहसीलदार
हणमंतराव पाटील यांची उपस्थिती



स्वच्छ भारत अभियानः गडहिंग्लज
बसस्थानकावरील स्वच्छता



**रवींद्र उथळे**
आदर्श स्वयंसेवक



**मिथुन कोळी**
आदर्श स्वयंसेवक

# राष्ट्रीय सेवा योजना



कडगाव (ता. गडहिंगलज) येथील विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन करताना डॉ.डी.आर.मोरे



कडगाव स्मशानभूमीची स्वच्छता करताना स्वयंसेवक



कडगाव (तां.गडहिंगलज) येथील स्वच्छता करताना स्वयंसेवक



शिबिरास्थळी महिला मेळाव्याचे उद्घाटन करताना प्रा. बिनादेवी कुराडे




श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना गडहिंगलजचे तहसीलदार राजेश चव्हाण



निर्भया अभियान अंतर्गत पथनाट्य सादर करताना स्वयंसेवक

# शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद

**■ वनस्पतीशास्त्र विभाग**

प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे (एम्. एस्सी.,पीएच्.डी.)
प्रा. जे. व्ही. सरतापे (एम्. एस्सी.)
प्रा. डॉ. एस्. के. नेर्ले (एम्. एस्सी.,पीएच्.डी.)
प्रा. व्ही. वाय. पाटील (एम्. एस्सी.)
प्रा. कु. एन. एस. पाटील (एम्. एस्सी.)
प्रा. सौ. एस. ए. चिवळकर (एम्. एस्सी.)

**■ मराठी विभाग**

प्रा. एस्. सी. जोशी (एम्. ए., डी.एच.ई.,डी.ए.ई.)
प्रा. डॉ. एम्. व्ही. राजे (एम्. ए.,पीएच्.डी.नेट,एम. जे.)
प्रा. डॉ. ए. बी. कुंभार (एम्. ए., पीएच्.डी.नेट)
प्रा. ए. के. मोरमारे (एम्. ए., नेट)

**■ इंग्रजी विभाग**

प्रा. डी. यू. जाधव (एम्. ए., नेट)
प्रा. पी. ए. पाटील (एम्. ए., सेट)
प्रा. पी. एस. होनगेकर (एम्. ए.बी.एड्.,एम.एड्.,पी.जी.सी.टी.ई.)
प्रा. डॉ. एस. बी. परीट (एम्.ए.,एम्.फिल्.पीएच्.डी.,सेट)
प्रा. व्ही. पी. चौगुले (एम्.ए.,सेट)
प्रा. पी. पी. दावणे (एम्.ए.,सेट)

**■ हिंदी विभाग**

प्रा. एन. बी. एकिले (एम्. ए., एम.फिल. नेट)
प्रा. डॉ. एस. बी. माने (एम्. ए.,पीएच्.डी.)

**■ मानसशास्त्र विभाग**

प्रा. डॉ. आर. व्ही. गुंडे (एम्. ए., एम्.फिल.,पीएच्.डी.)

**■ समाजशास्त्र विभाग**

प्रा. ए. व्ही. कुराडे (एम्. ए.)
प्रा. डॉ. एस्. डी. सावंत (एम्. ए.,एम्. फिल.,पीएच्.डी., नेट)
प्रा. आर. पी. हेंडगे (एम्. ए.,एम्. फिल., नेट)

**■ राज्यशास्त्र विभाग**

प्रा. एन्. आर. कोल्हापूरे (एम्. ए.,एम्. फिल.,सेट)
प्रा. डॉ. ए. जी. हारदारे (एम्. ए.,एम्. फिल्.,पीएच.डी.,नेट )

**■ अर्थशास्त्र विभाग**

प्रा. डॉ. डी. आर. खटके (एम्. ए., एम्.फिल.पीएच.डी.)
प्रा. जी. जी. गायकवाड (एम्. ए., बी.लिब्., नेट)
प्रा. एस. जी. मुंज (एम्.ए.)
प्रा. ए. यू. पटेल (एम्.ए.,बी.एड.)

**■ वाणिज्य विभाग**

प्रा. डॉ. आर. बी. तेली (एम्.कॉम., एम्. फिल्.पीएच्.डी.)
प्रा. डी. पी. खेडकर (एम.कॉम., बी.एड्.,सेट)
प्रा. डॉ. एम. डी. चौगुले (एम.कॉम.,एम्.फिल.,पीएच.डी.)

**■ भौतिकशास्त्र विभाग**

प्रा. डॉ. एस. ए. जोडगुद्री (एम्.एस्सी.,एम्.फिल.पीएच्. डी.)
प्रा. डॉ. एम्. पी. पाटील (एम्. एस्सी.,डी.एच.ई.,पीएच.डी.)
प्रा.बी. एम्. कुलकर्णी (एम्. एस्सी.,एम्.फिल.)
प्रा. डॉ. एस्. एम्. कदम (एम्. एस्सी.,पीएच.डी.)
प्रा. डॉ. पी. एस्. चिगरे (एम्. एस्सी.,डी.एच.ई.,पीएच.डी.)
प्रा. कु. एस. डी. खन्ना (एम्. एस्सी.)
प्रा. आर. टी. पाटील (एम्. एस्सी.)
प्रा. कु. ए. आर. पाटील (एम्. एस्सी.)
प्रा. ए. ए. पाटील (एम्. एस्सी.)
प्रा. व्ही. बी. श्रेष्ठी (एम्. एस्सी.)

**■ संख्याशास्त्र विभाग**

प्रा. डी. एम्. म्हेतर (एम्.एस्सी.,एम्.फिल.)
प्रा. आर. के. देशपांडे (एम्.एस्सी.)
प्रा. सौ. एम्. आर. दंडगे (एम्.एस्सी.)
प्रा. जे. के. पाटील (एम्.एस्सी.)
प्रा. कु. एस. आर. घाडगे (एम्. एस्सी.)

**■ गणित विभाग**

प्रा. डी. जी. वाठारे (एम्.एस्सी.)
प्रा. पी. एस. वाली (एम्.एस्सी.)
प्रा. कु. टी. एस. पाटील (एम्. एस्सी.)

**■ रसायनशास्त्र विभाग**

प्रा.डॉ.टी. एन्. पोवार (एम्. एस्सी.डी.एच.ई.,पीएच्.डी.)
प्रा. डॉ. बी. जे. देसाई (एम्. एस्सी.,पीएच्.डी.)
प्रा. व्ही. बी. कुरळे (एम्. एस्सी.,एम्.फिल.)
प्रा. डॉ. ए. एम्. हसुरे (एम्. एस्सी.,पीएच्.डी.)
प्रा. डॉ. बी. डी. अजळकर (एम्.एस्सी.,पीएच्.डी.)
प्रा. डॉ. एस्. डी. पाटील (एम्.एस्सी.,पीएच्.डी.)
प्रा. पी. आर. डोंगरे (एम्.एस्सी.)
प्रा. ए. आर. पोवार (एम्.एस्सी.)
प्रा. एस. ए. समडोळे (एम्.एस्सी.)
प्रा. बी. जे. कांबळे (एम्.एस्सी.)
प्रा. ए. ए. पाटील (एम्.एस्सी.)
प्रा. सौ. एस. एस. देसाई (एम्.एस्सी.)
प्रा. एन. आर. भोसले (एम्. एस्सी.)
प्रा. ए. पी. तेलवेकर (एम्. एस्सी.)
प्रा. कु. एन. एस. पाटील (एम्. एस्सी.)

**■ प्राणीशास्त्र विभाग**

प्रा. के. जे. अदाटे (एम्. एस्सी.)
प्रा. डॉ. एस. बी. नदाफ (एम्.एस्सी.,पीएच्.डी.)
प्रा. जी. ए. राऊत (एम्.एस्सी.)
प्रा. सी. ए. कणसे (एम्.एस्सी.)
प्रा. डॉ. सौ. एस. एस. साखरे (एम्.एस्सी.)

**■ शारीरिक शिक्षण**

प्रा. आर. डी. मगदूम (बी. कॉम.,एम्.पी.एड्.)

**■ बी.एस्सी. कॉम्प्युटर**

प्रा. सी. एस. निकम (एम्. सी. ए.)
प्रा. आर. बी. खोत (एम्.एस्सी., कॉम्प्युटर)
प्रा. सौ. डी. एस. खांडेकर (एम्.एस्सी., कॉम्प्युटर)

**■ पर्यावरण शास्त्र**

प्रा. सौ. एस. एस. देसाई (एम्. एस्सी.)
प्रा. कु. के. एस. काळगे (एम्. एस्सी.,एम.एड.)

# पदव्युत्तर विभाग - प्राध्यापक वृंद



## डॉ. डी. आर. खटके

प्रमुख पदव्युतर विभाग

## ■ मराठी विभाग

प्रा. एस. सी. जोशी (विभाग प्रमुख):शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. डॉ. एम. व्ही. राजे : शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. डॉ. ए. बी. कुंभार : शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. ए. के. मोरमारे : शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. डॉ. ए. पी. गवळी : यशवंतराव चव्हाण कॉलेज,हलकर्णी
प्राचार्य डॉ. बी. व्ही. चौगुले : आर्टस् , कॉमर्स कॉलेज, गड.
प्रा. बी. जे. शिंदे: आर्टस् , कॉमर्स कॉलेज, गड.
प्रा. डॉ. ए. एस. बल्लाळ: आजरा महाविद्यालय, आजरा

## ■ हिंदी विभाग

प्रा. एन. बी. एकिले विभाग प्रमुख:शिवराज महाविद्यालय, गड.
डॉ. एस. बी. माने:शिवराज महाविद्यालय, गड.
डॉ. के. आर. पाटील :प्राचार्य, आर्टस् , कॉमर्स कॉलेज, नेसरी
प्रा. यू. एस. पाटील : यशवंतराव चव्हाण कॉलेज,हलकर्णी
प्रा. एस. एन. खरुजकर : यशवंतराव चव्हाण कॉलेज,हलकर्णी
प्रा. डॉ. एस. बी. घरपणकर : राजा शिवछत्रपती महाविद्यालय, महागाव
प्रा. एन. डी. केसरकर : आर्टस् , कॉमर्स कॉलेज, नेसरी
प्रा. एस. एन. कांबळे: आर्टस् , कॉमर्स कॉलेज, नेसरी
प्रा. सौ. एस. एस. पाटील: आर्टस् , कॉमर्स कॉलेज, गड.

## ■ इंग्रजी विभाग

प्रा. डी. यू. जाधव विभाग प्रमुख: शिवराज महाविद्यालय,गड.
प्रा. पी. एस. होनगेकर: शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. डॉ. एस. बी. परीट: शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. पी. पी. दावणे: शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. ए. एस. जरग : डी. आर. माने कॉलेज, कागल
डॉ. सौ. पी. ए. पाटील : विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
प्रा. पी. ए. पाटील : यशवंतराव चव्हाण कॉलेज,हलकर्णी
प्रा. आय. आर. जरळी : यशवंतराव चव्हाण कॉलेज,हलकर्णी
प्रा. ए. एस. आरबोळे : आर्टस् कॉलेज, कोवाड
प्रा. सौ एम. एस. पाटील:सदाशिवराव मंडलिक कॉलेज,मुरगूड



## ■ अर्थशास्त्र विभाग

प्रा. डॉ. डी.आर. खटके (विभाग प्रमुख): शिवराज महाविद्यालय,गड.
प्रा. जी. जी. गायकवाड: शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. एस. जी. मुंज : शिवराज महाविद्यालय, गड.
प्रा. डी. जी. चिघळीकर : ऑर्टस, कॉमर्स आणि विज्ञानमहाविद्यालय,गड.
प्रा. एस. एस. सावंत: र.भा.माडखोलकर महाविद्यालय, चंदगड
प्रा.डॉ.पी. वाय. निंबाळकर :यशवंतराव चव्हाण कॉलेज,हलकर्णी
प्रा. के. एस. पोवार :सदाशिवराव मंडलिक कॉलेज,मुरगूड
प्रा. डॉ. के. आर. तणंगे :ऑर्टस, कॉमर्स आणि विज्ञान महाविद्यालय,गड.

## ■ वाणिज्य विभाग

प्रा. डॉ. आर. बी. तेली (विभाग प्रमुख): शिवराज महाविद्यालय,गड.
डॉ. एन. बी. जाधव : प्राचार्य, राज शिवछत्रपती महाविद्यालय, महागाव
प्रा. ए. एम. शिरदवाडे : डी. आर. माने कॉलेज, कागल
प्रा. व्ही. एस. वांद्रे : दत्ताजीराव ऑर्टस् , कॉमर्स, सायन्य कॉलेज, इचलकरंजी
प्रा. टी. के. जाधव : प्राचार्य एस. के. पाटील महाविद्यालय,कुरुंदवाड
प्रा. एम. ए. कोळी:सदाशिवराव मंडलिक कॉलेज,मुरगूड
प्रा. एम. एम. बागवान: देवचंद कॉलेज, अर्जुननगर
प्रा. एन. बी. भागवत: डी. आर. माने महाविद्यालय,कागल

## ■ समाजशास्त्र विभाग

प्रा. ए. व्ही. कुराडे विभाग प्रमुख: शिवराज महाविद्यालय,गड.
प्रा. डॉ. एस. डी. सावंत: शिवराज महाविद्यालय,गड.
प्रा. डॉ. के. एस. काळे: कला महाविद्यालय, कोवाड
प्रा. पी. ए. धोंगडे: यशवंतराव चव्हाण कॉलेज,हलकर्णी

## ■ एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स विभाग

प्रा. सी. एस. निकम विभाग प्रमुख: शिवराज महाविद्यालय,गड.
प्रा. आर. बी. खोत: शिवराज महाविद्यालय,गड.
प्रा. आर. के. पाटील: शिवराज महाविद्यालय,गड.
प्रा. डॉ. एस. टी. भोसले: वसंतदादा पाटील इन्स्टिट्युट, सांगली
प्रा. एम. व्ही. मंगारे:सिंहगड इन्स्टिट्युट, पुणे
प्रा. डी. बी. देसाई:के.आय.टी. कॉलेज, कोल्हापूर

# संभाजीराव माने साहित्य, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा प्राध्यापक वृंद (अनुदानित विभाग)

■ **मराठी विभाग**
प्रा. व्ही. एस्. मुसाई (एम्. ए.,बी.एड्.,एम.फील.)
प्रा. टी. व्ही. चौगुले (एम्. ए., बी.एड्.)

■ **इंग्रजी विभाग**
प्रा. आर. बी. कांबळे (एम्. ए., बी.एड्., डी.एच्.ई.)
प्रा. के. ए. सावेकर (एम्. ए., डी.एच्.ई.)
प्रा. आय. डी. नेर्लीकर (एम्. ए.,बी. एड्.)

■ **हिंदी विभाग**
प्रा. सौ. एल्. एम्. डिसोझा (एम्. ए., बी.एड्.)

■ **समाजशास्त्र विभाग**
प्रा. एस. पी. पाटील (एम्. ए., बी.एड्.)

■ **अर्थशास्त्र विभाग**
प्रा. एस. ए. कांबळे (एम्. ए., बी.एड्.)
प्रा. टी. डी. भांदूगरे (एम्. ए., बी.एड्.)

■ **राज्यशास्त्र विभाग**
प्रा. आर. एस. सरनाईक (एम्. ए., बी.एड्.)

■ **मानसशास्त्र विभाग**
प्रा. ई. जी. कांबळे (एम्. ए., बी.एड्.)
प्रा. एम्. एस्. घस्ती (एम्. ए., बी.एड्.)

■ **पर्यावरणशास्त्र विभाग**
प्रा. सौ. एस. पी. गाडवी (एम्. एस्सी.,बी.एड.)
प्रा. कु. के. एस. काळगे (एम्. एस्सी.,एम.एड.)
प्रा. एम. एम. देसाई (एम्. एस्सी.,बी.एड.)

■ **वाणिज्य विभाग**
प्रा. ए. व्ही. पाटील (एम.कॉम.,बी.एड.)
प्रा. सौ. एस. एन. जांगनुरे (एम.कॉम.)

■ **पदार्थ विज्ञान विभाग**
प्रा. ए. बी. कोकणे (एम्. एस्सी.,बी. एड्.)
प्रा. के. व्ही. कांबळे (एम्. एस्सी.,बी. एड्.)
प्रा. आर. टी. पाटील (एम्. एस्सी.,बी. एड्.)

■ **रसायनशास्त्र विभाग**
प्रा. पी. एम्. भोईटे (एम्. एस्सी., डी.एच्.ई.)
प्रा. एस्. एच्. रावण (एम्. एस्सी., बी.एड्.)
प्रा. सौ. आर. के. अदाटे (एम्. एस्सी., बी.एड्.)
प्रा. सौ. एस. एल. कांबळे (एम्. एस्सी., बी.एड्.)

■ **जीवशास्त्र विभाग**
प्रा. पी. टी. कट्टी (एम्. एस्सी., डी.एच्.ई.)
प्रा. कु. पी. आर. जाधव (एम्. एस्सी.)
प्रा. व्ही. वाय. पाटील (एम्. एस्सी.,बी.एड.)

■ **गणित विभाग**
प्रा. एन्. एम्. गरुड (एम्. एस्सी., डी.एच्.ई.)
प्रा. पी. टी. शेवाळे

■ **शारीरिक शिक्षण विभाग**
प्रा. जयवंत पाटील (एम्. ए., एम्.पी.एड्.)

■ **आय. टी. विभाग**
प्रा. एस. पी. कुराडे (एम.एस.ई. कॉम्प्यू.)
प्रा. य. पी. कानडे (एम.सी.ए.)

# संभाजीराव माने साहित्य, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा प्राध्यापक वृंद (विनाअनुदानित विभाग)

प्रा. एस. पी. कुराडे (एम.एस्सी.कॉम्पु.) हेड, ज्यु. सायन्स बी अँड सी डीव्हीजन
प्रा. आर. के. अदाटे (एम.एस्सी.,बी.एड.) केमिस्ट्री
प्रा. आय. डी. नेर्लीकर (एम.ए.,बी.एड.) इंग्लिश
प्रा. व्ही. वाय. पाटील (एम.एस्सी.,बी.एड.) बायॉलॉजी
प्रा. यू. पी. कानडे (एम.सी.ए.) आय.टी.
प्रा. कु. के. एस. काळगे (एम.एस्सी.,एम.एड.) इनव्हायर्नमेंट सायन्स
प्रा. पी. टी. शेवाळे (एम.एस्सी.,बी.एड.) मॅथ्स
प्रा. सौ. एस. एल. कांबळे (एम.एस्सी.,बी.एड.) केमिस्ट्री
प्रा. आर. टी. पाटील (एम.एस्सी.,बी.एड.) फिजिक्स
प्रा. कु. एम. एस. पाटोळे (एम.एस्सी.) मॅथ्स
प्रा. कु. एस. एस. कोरवी (बी.ई.) कॉम्प्युटर
प्रा. डी. बी. कोटी (एम.एस्सी.) फिजिक्स
प्रा. सौ. पी. पी. कांबळे (एम.एस्सी.) बॉयोलॉजी

# महाविद्यालयातील प्रशासकीय कर्मचारी वृंद

## कार्यालय

### ■ प्रबंधक
श्री. एस. आर. शहापूरकर (एम.ए.,एम.बी.ए.)

### ■ कनिष्ठ लघुलेखक
श्री. के. टी. कुंभार (एम. कॉम.)

### ■ कनिष्ठ लेखनिक
श्री. एम. बी. माने (बी. कॉम्., एम्. लिब.)
श्री. पी. डी. पाटील (बी. कॉम्.)
श्री. ए. एम्. पोवार (बी. कॉम्., एम्. लिब.)
श्री. एन्. एस्. काबळे (बी. ए., एम्. लिब.)
श्री. एन. झेड. दळवी (बी. कॉम्.)
श्री. बी. बी. जाधव (बी.ए.)
श्री. पी. डी. सोरप (बी. ए.)

## ग्रंथालय

### ■ ग्रंथपाल
प्रा. एस. आर. कुराडे (बी.एस्सी.,एम.लिब सेट)

### ■ साहाय्यक ग्रंथपाल
श्री. आर. ए. जाधव (एम्. ए., एम्. लिब.,एफ.फिल.)

### ■ ग्रंथालय लेखनिक
श्री. बी. एल. कोरवी (बी. ए.)

### ■ ग्रंथालय परिचर
श्री. एस्. एस्. हजारे
श्री. व्ही. आर. टेंबरे
श्री. पी. बी. नडगेरी
श्री. ए. एल्. कलकुटकी (एम. ए.)
श्री. ए. एस. सावंत
श्री. एन. बी. असोदे
श्री. एम. बी. शिंदे

## प्रयोगशाळा

### ■ प्रयोगशाळा साहाय्यक
श्री. डी. जी. रेंदाळे (बी.ए.)
श्री. आर. बी. आयरनाईक (एम्.ए.)
श्री. पी. जी. पोवार (एम्.ए.)
श्री. एस्. व्ही. शिंदे (बी.एस्सी.,बी.लीब.सायन्स)

### ■ प्रयोगशाळा परिचर
श्री. बी. डी. मोरे
श्री. एस्. बी. खोत (बी. कॉम्.)
श्री. एस्. डी. पाटील
श्री. टी. आर. देवडकर
श्री. व्ही. व्ही. कोंडूसकर
श्री. एम्. जी. खोत (बी. ए.)
श्री. टी. बी. कांबळे
श्री. आर. के. वडर
श्री. एस्. एम्. मोरबाळे
श्री. के. आर. कांबळे
श्री. एस्. एम्. कांबळे
श्री. व्ही. बी. पाटील
श्री. डी. जी. हुंदळेकर (बी. कॉम्.)
श्री. एस. एस. कांबळे
श्री. एस. एन. पाटील (एम.ए.,एम.बी.ए.)

### ■ शिपाई
श्री. एस्. डी. कुरळे
श्री. यू. डी. राऊत
श्री. एम. के. गोटुरे
श्री. व्ही. ए. सुतार
श्री. ए. एच. नाईक
श्री. व्ही. एस. गुरव
श्री. के. एम. सूर्यवंशी
श्री. एस. जी. हिले



# विना अनुदान विभाग

## प्राध्यापक वृंद

प्रा. आर. डी. कमते (एम.बी.ए.,एम.फील) हेड, बीबीए डिपार्मटमेंट
प्रा. प्रा. ए. यू. पटेल (एम.ए.,एम.फील)लेक्चरर, इकॉनॉमिक्स
प्रा. सी. एस. निकम (एम.सी.एम.,एम.सी.ए.) हेड, कॉम्प्युटर डिपाटमेंट
प्रा. एम. आर. दंडगे (एम.एस्सी.(स्टॅट)) लेक्चरर, स्टॅट
प्रा. के. एस. देसाई (एम.बी.ए.,जी.डी.सी.अँड ए.,एम.फील.नेट) हेड, बीसीए डिपार्टमेंट
प्रा. एन. जी. चव्हाण (एम.एस.सी.(इले.)) लेक्चरर, इलेक्ट्रॉनिक्स
प्रा. पी. एस. वाली (एम.एस्सी. (मॅथ)) लेक्चरर, मॅथ्स
प्रा. आर. बी. खोत (एम.एस्सी. (कॉम्प्यु.)) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स
प्रा. एस. बी. शिंदे (बी.ए.,एल.एल.बी.)सीएचबी, लॉ
प्रा. यु. बी. देसाई (एम.सी.एम.,एम.सी.ए.) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स
प्रा. डी. एस. खांडेकर (एम.एस्सी. (कॉम्प्यु.))लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स
प्रा. एस. एस. देसाई (एम.एस्सी. (इनव्हॉरमेंट))सीएचबी, इनव्हायरमेंट सायन्स
प्रा. बी. एस. पठाण (एम.एस्सी. (कॉम्प्यु.)बी.एड.) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स
प्रा. व्ही. पी. कळसगोंडा (एम.एस्सी. (कॉम्प्यु.)) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स
प्रा. एस. पी. गाडवी (एम.एस्सी. (इनव्हॉरमेंट)) सीएचबी, इनव्हायरमेंट सायन्स
प्रा. आर. के. पाटील (एम.एस्सी. (कॉम्प्यु.)) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स
प्रा. आय. पी. सुतार (एम.सी.एम.) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स
प्रा. यु. बी. पाटील (बी.ई. (कॉम्प्यु.) लेक्चरर, कॉम्प्युटर सायन्स
प्रा. पी. एस. पाटील (एम.बी.ए.) लेक्चरर, मॅनेजमेंट
प्रा. जी. डी. नेर्ले इलेक्ट्रॉनिक्स
प्रा. एम. आर. नांदवडेकर (एम.एस्सी.) कॉम्प्युटर
प्रा. सौ. पी. बी. पाटील (एम.एस्सी.) कॉम्प्युटर
प्रा. वाय. बी. पाटील (एम.सी.ए.) कॉम्प्युटर
प्रा. एस. पी. कुपेकर (एम.सी.ए.) कॉम्प्युटर
प्रा. टी. एस. पाटील (एम.सी.ए.) मॅथ्स
प्रा. सौ. के. एन. लोणकर (एम.सी.ए.)
प्रा. सौ. वाय. व्ही. सोनटक्के (एम.कॉम.)
प्रा. कु. एस. आर. घाडगे (एम.एस्सी.) स्टॅट
प्रा. एस. एन. आंबेवाडकर (एम.सी.ए.)
प्रा. कु. ए. एम. डोंगरसाने (एम.बी.ए.)
प्रा. सौ. पी. जे. नरोना (एम.कॉम.)

## कर्मचारी वृंद

श्री. पी. ए. शेंडे (बी.एस्सी.,एम.बी.ए.) हेड क्लार्क
श्री. एस. ए. शिरहट्टी (एम.कॉम.) ज्यु.क्लार्क
सौ. एस. बी. निकम (एम.कॉम.) ज्यु.क्लार्क
श्रीमती जी. जे. शिंदे (बी.कॉम.,बी.लीब) लॅब.असिस्टंट
श्री. एन. टी. पाटील (बी.कॉम.) ज्यु.क्लार्क
श्री. डी. बी. देसाई (बी.कॉम.) ज्यु.क्लार्क (पी.जी.सेक.)
सौ. पी. आर. सलवादे (बी.कॉम.) ज्यु.क्लार्क
सौ. एस. बी. आजरी (बी.कॉम.) ज्यु.क्लार्क
श्री. सी. आय. बाबर (एम.ए.) ज्यु.क्लार्क
श्री. व्ही. एम. घेज्जी (बी.ए.) ज्यु.क्लार्क
श्री. वाय. एस. शेंडे (एम.ए.) ज्यु.क्लार्क
श्री. बी. जी. चौगुले (एच.एस.सी.) लॅब. अॅटेंड.
श्री. आय. बी. गोवस (एच.एस.सी., आयटीआय) लॅब. अॅटेंड. (इले.)
श्री. आर.एन.कांबळे (बी.ए.,डिप्लोमा कॉम्प्यु.हार्ड.अँड नेटवर्क) लॅब. अॅटेंड.(हार्ड.टेक.)
श्री. ए. जी. भाटले (एम.ए.) लॅब.अटेंडेंट
श्री. डी. के. पताडे (एच.एस.सी.) लॅब.अटेंडेंट
श्री. जी. डी. निढोरी (बी.ए.) झेरॉक्स ऑपरेटर
श्री. एस. टी. हजारे (एच.एस.सी.) शिपाई
श्री. एम. बी. रेडेकर (एच.एस.सी.) शिपाई
श्री. एम. बी. यादव (एच.एस.सी.) शिपाई
श्री. एस. एस. गवळी (बी.ए.) शिपाई
श्री. डी. एस. पाटील (एच.एस.सी.) शिपाई
श्री. एस. जे. साबळे (एच.एस.सी.) शिपाई
श्री. एस. एस. कांबळे (एम.ए.) शिपाई
श्री. एस. व्ही. पाटील (एच.एस.सी.) शिपाई
श्री. के. के. सागर (एस.एस.सी.) गार्डनर
सौ. एस. एस. ठवे (७ वी) स्विपर
कु. एम. सी. दबडे (बी.सी.ए.) ज्यु.क्लार्क
श्री. बी. डी. केसरकर, वॉचमन
श्री. एस. बी. कांबळे, स्वीपर

## कर्मवीर वि. रा. शिंदे शिक्षण संस्था (प्रशासकीय कर्मचारी वृंद)

- **प्रशासकीय प्रमुख :** श्री. एल. एस. शिंदे (बी.कॉम.) ,
- **लेखनिक :** श्री. नारायण पाटील (बी.कॉम.)

# मराठी विभाग



डॉ. आनंद यादव

साहित्य :

खळाळ
आदिताल
डवरणी
उखडलेली झाडे
मातीखालची माती
हिरवे जग
मळ्याची माती
मायलेकरं
स्पर्श कमळे
पान भवरे
रात्र घुंगराची
एकलकोंडा
गोतावळा
नटरंग
झोंबी



वामन होवाळ

साहित्य :

ऑडिट
जपून पेरा बेणं
बेनवाड
येळकोट
वाटाआडवाटा
वारसदार



रामनाथ चव्हाण

साहित्य :

बिन चेहऱ्याची माणसं
वामनवाडा
बायको मी देवाची
गावगाडा
आधारस्तंभ
पारध
घाणेरीची फुलं
साक्षिपुरम

संपादक
**डॉ. मनमोहन राजे**
मराठी विभाग

# अनुक्रमणिका

## ✲ गद्य विभाग ✲


- विठ्ठल रामजी शिंदे : कार्य आणि कर्तृत्व — सुप्रिया अनिल कदम
- कुटुंब असंही ! — संध्याराणी शंकर पाटील
- वटवृक्षाचे कथन — तेजश्री मनमोहन राजे
- याला जीवन ऐसे नाव — अश्विनी आप्पासाहेब कसुते
- पाणी — देवयानी संभाजी पाटील
- स्पर्धा परीक्षा : काळाची गरज — अश्विनी अरविंद पोवार
- आनंद यादव यांचे कथा साहित्य — महादेवी विजय पोवळ


## ✲ पद्य विभाग ✲


- हरवलली पाखरे — धनश्री शिवाजीराव देसाई
- माणसू जागा होतो ! — विकास शिवाजी मोरे
- आठवणार सगळं काही आठवणार... — पूनम शिवाजी पोवार
- आई — रमा मारुती कांबळे
- वेळ नाही — पूजा नागाप्पा दुंडगे
- प्रेम कोणावर करावे ? — मनाली बाळगोंडा कडूकर
- जेंव्हा असतं लहानपण... — प्रसाद बाळासाहेब ताडे
- अन... मी जागत आहे...!! — कल्लेश नाईक
- माझे बाबा — कु. श्रद्धा अशोक कदम
- गुरू — रविकांत घस्ती

# विठ्ठल रामजी शिंदे : कार्य आणि कर्तृत्व

✍..... कु. सुप्रिया अनिल कदम
(बी.ए..भाग-१)

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राला समाजसुधारकांची मोठी परंपरा लाभलेली आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत अनेक समाजसुधारकांचा वारसा महाराष्ट्राला लाभला नसता, तर आधुनिक समाज घडला नसता. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, राजर्षी शाहू महाराज, राजा राममोहन रॉय, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे इ. व्यक्तींनी समाजासाठी अनेक मोलाचे कार्य केले आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचे कार्य करणाऱ्या व्यक्तिमध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांचा अवर्जून उल्लेख करावासा वाटतो. कारण, समाजसेवेची व समाजोन्नतीची चळवळ यात त्यांचा मोठा सहभाग असल्याचे आपल्याला दिसते. तसेच त्यांनी समाजजागृती करण्यासाठी आपले सारे आयुष्य समर्पित केले. त्यामुळे त्यांच्या या महत्त्वपूर्ण व मौल्यवान कार्याची चर्चा करणे खूप मोलाचे वाटते. म्हणून मी हा लेख लिहित आहे.



**बालपण व शिक्षण :**

विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म २३ एप्रिल १८७३ रोजी कर्नाटकातील जमखंडी गावी झाला. विजापूरजवळ असलेले हे गाव. त्यावेळी पटवर्धनांचे छोटे संस्थान होते. तिथे शिक्षणाला अनुकूल असे वातावरण देखील होते. विठ्ठलरावांचे आजोबा वसंतराव यांना लोक सुभेदार असे म्हणत असत. त्यांची आजी संताबाई ही मुधोळजवळच्या लिंगनूर खेड्यातली होती. त्यांची आजी रुपाने काळीसावळी पण उद्योगी स्त्री होती. तसेच त्यांच्या आजोबांची खानदारी, स्वाभिमानी वृत्ती आणि विनोदी स्वभाव विठ्ठलरावांच्यामध्ये आला होता. विठ्ठलरावांच्या वडिलांचे नाव रामजी शिंदे होते. जमखंडीजवळचे आलगूर गाव हे विठ्ठलराव शिंदेचे आजोळ होते. त्यांच्या आईचे नाव यमुनाबाई होते. विठ्ठलरावांच्या आईला सुंदर-सुंदर कानडी गाणी व भजने येत होती, तिचा आवाजही खूप गोड होता. पण विठ्ठलरावांचे वडील हे साधूच्या नादी लागल्यामुळे आणि त्यांनी नोकरीचाकरी सोडून दिल्यामुळे त्यांच्या वाट्याला दारिद्र्य आले होते.

विठ्ठलरावांचे वडील हे करारी व रागीट असल्यामुळे शेजारचे लोक त्यांच्या घरी जायला घाबरत असत. लहानपणी त्यांच्या घरी गुरेढोर, गडीमाणसे होती, पण वर्षानुवर्षे त्यांचे वडिलांनी बसून खाल्यामुळे सर्व गोष्टींना पाय फुटले. विठ्ठलराव शिंदेंना दोन बहिणी व एक भाऊ होता. त्यांची आई आणि चार मुले यांचे संबंध खूप जवळचे होते. 'आई आपल्या चौघा पिलास एखाद्या पक्षिणीप्रमाणे पंखाखाली घेऊन बसे,' असे वर्णन विठ्ठलरावांनी केले आहे. दारिद्र्यातही समाधानी वृत्तीने कसे राहावे हे त्यांना त्यांच्या आईने शिकवले होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत त्यांच्या आईचा फार मोठा वाटा होता. असे विठ्ठलराव सांगतात.

विठ्ठलराव शिंदे यांचे प्राथमिक शिक्षण जमखंडीच्या खासगी शाळेत झाले होते. विठ्ठलराव शिंदे सांगतात की, चौथी पास झाल्यानंतर इंग्रजी हायस्कूलमध्ये त्यांना जाणे शक्य होते, पण मराठी शाळेचे हेडमास्तर श्री. विष्णूपंत गवंडे यांनी विठ्ठलरावांना पाचवीसाठी मराठी शाळेतच ठेवले. त्यामुळे त्यांची मातृभाषेत आणि गणितात विशेष प्रगती झाली. विठ्ठलराव हे स्वभावाने खूपच खोडकर व हुंबाडे होते. हुतूत, सुरपाट्या, खो-खो, आट्यापाट्या यांसारखे खेळ ते खेळत असत. स्वातंत्र्याची आवड, सत्याचा छडा लावण्याची आणि नव्या जीवनाची हौस ही विठ्ठलरावांच्या स्वभावाची वैशिष्ट्ये लहानपणापासूनच दिसत होती.

विठ्ठलरावांना लहानपणापासूनच अवांतर वाचनाची आवड होती. चौथी-पाचवीत असताना त्यांनी गुलबकावली, वेताळपंचविशी, शुकबहात्तरी अशी पुस्तके वाचली. तसेच इंग्रजी शाळेत गेल्यावर त्यांनी मंजुघोषा, मदन मंजिनी, वसंत कोकिळा अशा अद्भूतरम्य कथा-कादंबऱ्या वाचल्या. विठ्ठलराव शिंदे हे १८९१ मध्ये पुणे केंद्राला त मॅट्रिक्युलेशन परीक्षेला बसले व उत्तीर्ण झाले. त्यानंतर विठ्ठलरावांनी त्या काळात शनिवार पेठेतील गद्रेवाड्यात भरणाऱ्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. इंटरची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना २५ रु. स्कॉलरशिप मिळू लागली. त्यानंतर त्यांनी इतिहास व कायदा हे विषय घेऊन बी.ए.साठी डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला.



१८९८ साली विठ्ठलरावांचे बी.ए. पूर्ण झाले. या परीक्षेत कायद्याच्या पेपर्समध्ये ६०% पेक्षा जास्त गुण मिळाल्याने त्यांना फर्स्ट एलएलबी करण्याची गरज राहिली नाही. एकदम सेकंड एलएलबी करण्यासाठी ते १८९९ मध्ये मुंबईला गेले. विठ्ठलरावांचे शिक्षक श्री. वासुदेव चिरमुले यांचे मार्गदर्शन त्यांना खूप मोलाचे ठरले. विठ्ठलरावांना वक्तृत्वाची खूप आवड होती. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे वक्तृत्व त्यांना खूप आवडत होते. विठ्ठलरावांचा ओढा हा राजकारण, समाजकारण आणि धर्मकारण या तिन्ही गोष्टींकडे होतो.

**विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक कार्य :**

विठ्ठलरावांना लहानपणापासूनच समाजासाठी काही मोलाची कार्ये करण्याची आवड होती. त्यांनी अनेक दलित समाजासाठी, अस्पृश्यांसाठी, स्त्रियांसाठी स्वतः पुढे येऊन अनेक कार्ये केली. त्याचा आपण थोडक्यात आढावा घेऊया.

**अस्पृश्यांसाठी कार्य :**

हिंदुस्थानात इंग्रजी राजवट आल्यानंतर केवळ राजकीय नव्हे तर, सामाजिक आणि धार्मिक व्यवस्थेतही बदल घडून आले. बहुजन समाजाला शिक्षणाची संधी मिळाली. इंग्लंडमध्ये असताना युनिटेरियन धर्ममताच्या लोकांनी अपंग, दीनदुबळे, वृद्ध यांच्यासाठी चालविलेल्या 'डोमेस्टिक मिशन' यासारख्या संस्था विठ्ठलरावांनी पाहिल्या. या वृत्तीचा त्यांच्यावर प्रभाव पडला. तेव्हा आपल्या देशातील अस्पृश्यांसाठी अशा प्रकारची कामे करण्याची गरज आहे, हे त्यांच्या मनाला जाणवले. इच्छा निर्माण झाली. त्याचा परिणाम म्हणजे १९०५ ला मीठगंज पेठेत विठ्ठलरावांनी अस्पृश्यांसाठी एक शाळा काढली.

२८ ऑक्टोबर १९०५ या दिवशी भिंगार नावाचे अस्पृश्य विठ्ठलरावांना सभेसाठी घेऊन गेले होते. तिथे भाषण करत असताना त्यांनी आपले आयुष्य अस्पृश्य निवारणासाठी समर्पित करण्याचा संकल्प जाहीर केला. डिसेंबर महिन्यात 'सुबोधपत्रिकेच्या' तीन अंकांमधून 'अस्पृश्य मानलेल्या वर्गाची उन्नती' या विषयावर त्यांनी इंग्रजी लेख लिहिला.

हिंदुस्थानातील अनेक लोकांना अस्पृश्य व बहिष्कृत समजले जाते. हे राष्ट्रीय पाप आणि राष्ट्रीय दुष्कृत्य आहे. त्यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी देशी मिशनची आवश्यकता आहे. हे मिशन स्थापन करण्यासाठी मुंबई शहर हे योग्य ठिकाण आहे, असे प्रतिपादन विठ्ठलरावांनी केले. केवळ

विचार मांडून ते थांबले नाहीत, तर १८ ऑक्टोबर १९०६ रोजी त्यांनी अस्पृश्य सुधारणेचे कार्य करण्यासाठी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेची मुंबईला स्थापन केली.

प्रथम स्थानिक पातळीवर कार्य सुरू करायचे आणि नंतर त्याचा विस्तार करायचा, असे विठ्ठलरावांनी ठरविले होत. संस्थेतर्फे प्राथमिक व दुय्यम शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू करायच्या. उद्योगशाळा, वसतिगृहे, मोफत दवाखाना धर्मशिक्षण देणाऱ्या शाळा आणि जातिभद व मुर्तिपूजा यांना फाटा देऊन चालविण्यात येणारी उपासनालयचे काढायची, असे त्यांचे ध्येय होते.

अस्पृश्यतानिवारणाचा प्रथम विचार केला तो विठ्ठलरावांनी. त्याचप्रमाणे अस्पृश्यतेच्या प्रश्नाबाबत प्रथम संशोधन केले तेही त्यांनीच. ब्राम्हो समाज व प्रार्थना समाज असे मानतो की, सर्व माणसे ही परमेश्वराची लेकरे आहेत आणि सर्वांनी एकमेकांशी बंधुभावाने वागावे. हे सांगून ते थांबले नाही तर ते त्यांनी आचरणात आणून दाखविले.

## स्त्रियांसाठी केलेले कार्य :

जमखंडीत राहूनही लहानपणी विठ्ठलरावांच्या घरात स्त्रीपुरुष समानता होती. त्यामुळे त्यांच्या बहिणीलाही शिक्षणाची संधी मिळू शकली. विठ्ठलरावांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन उदार होता. शिक्षण घेत असताना आपल्या घरातील स्त्रियांनाही संधी मिळावी म्हणून त्यांनी पुण्यामध्ये आपल्या भगिनी व पत्नी यांचे नाव शाळेत घातले.

ऑक्सफर्डमधील मँचेस्टर कॉलेजात धर्मशिक्षण घेत असताना तेथील चर्चा मंडळात विठ्ठलराव शिंदे यांनी धर्मकार्यात आधिक स्त्रिया सहभागी झाल्या तर धर्मकार्य अधिक परिणामकारक होईल. असा ठराव त्यांनी मांडला. मुलांच्या बरोबरीने मुलींनाही शिक्षण सक्तीचे करावे यासाठी शिंदे यांनी चळवळ सुरू केली होती.

विठ्ठलरावांच्या प्रेरणेने कौटुंबिक उपासना मंडळ सुरू झाले. तेव्हा खरी धार्मिक उपासना सहकुटुंब व्हावी म्हणून कुटुंबाने सभासद होताना आई, बहीण, पत्नी अशा स्त्री व्यक्तिसह सदस्य व्हावे असा आग्रह विठ्ठलरावांनी धरला होता. या उपासनांमधून, व्याख्यानामधून ते स्त्रीबद्दल आदरभाव व्यक्त करत असत. लहानपणापासूनच विठ्ठलरावांच्या मनात स्त्रियांविषयी आपुलकी व प्रेमभावना होती.

स्त्री ही सहनशील असते. पती, पिता व पुत्र या सर्वांचे अपराध ती सहन करत असते. सर्वांची सेवा करते. म्हणून आपण 'मातृ देवो भव' असे न म्हणता 'स्त्री देवो भव' असे म्हटले पाहिजे. तसेच स्त्री जातीला पूज्य मानून तिचा सत्कार केला पाहिजे. समाजामध्ये तिला समान व आदराची वागणूक दिली पाहिजे, असे मत विठ्ठलरावांनी मांडले आहे.

## अन्य सामाजिक कार्य :

दारुच्या व्यसनामुळे अस्पृश्यांची स्थिती जास्त दयनीय होत आहे हे लक्षात घेऊन विठ्ठलरावांनी मद्यपानबंदीच्या चळवळीत सहभाग घेतला होता. लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी या दोघांनीही आपल्या कार्यक्रमात विठ्ठलरावांना स्थान दिले होते. १९२२ साली शिंदे यांनी वसंत व्याख्यानमालेत दारुचा व्यापार, बहुजन समाज आणि सरकार या विषयावर व्याख्यान दिले. दारु दुकानाचे परवाने आणि अबकारी कर यापासून सरकारला उत्पन मिळते. म्हणून ते दारुच्या दुष्परिणामांकडे दुर्लक्ष करतात. सक्तीचे शिक्षण सुरू करायचे असेल तर, दारूबंदी केलीच पाहिजे, असा युक्तिवाद विठ्ठलरावांनी केला आहे. हा मुद्दा मांडत असताना विठ्ठलराव म्हणतात 'शिक्षणाचं मंगळसूत्र सरकारने दारुच्या बाटलीच्या गळ्यात बांधले आहे.'

विठ्ठलराव शिंद्यांनी अनिष्ट चालीरिती नष्ट व्हाव्यात म्हणून अनेक प्रत्यनही केले. इतकेच नव्हे तर त्यांनी दुष्काळग्रस्तांना अन्नधान्य, कपडे औषधे इ. चा पुरवठा केला. तसेच शेकऱ्यांच्या अनेक समस्या लक्षात घेऊन त्यांनी शेतकऱ्यांनाही मदत केली.

अशा प्रकारचे सामाजिक कार्य करताना विठ्ठलराव शिंदे यांनी मोलाचे योगदान दिलेले दिसते.

## शैक्षणिक कार्य :

विठ्ठलराव शिंदे यांनी दलित समाज, ब्राह्मोसमाज, स्त्रिया,

अस्पृश्य समाज इत्यादींना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्या म्हणून त्यांनी अनेक पावले उचलली. हिंदुस्थानातील अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांमध्ये व निराश्रित लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार केला. त्यांना नोकऱ्या मिळवून दिल्या. तसेच अस्पृश्यांना येणाऱ्या सामाजिक अडचणींचे निराकरण केले. स्थानिक पातळीवर कार्य सुरू करून, त्याचा विस्तार करायच असे विठ्ठलरावांनी ठरविले होते. संस्थेतर्फे प्राथमिक व दुय्यम शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू करायच्या. उद्योगशाळा, धर्मशिक्षण देणाऱ्या साप्ताहिक शाळा व उपासनालये काढायची असे त्यांचे ध्येय होते. या कार्यात त्यांना त्यांचे आई-वडिलही मदत करत होते.

शेतकरी व स्त्रिया अशा मागासलेल्या वर्गाची स्थिती सुधारणेही गरजेचे आहे. असा विचार त्यांच्या मनात आला. १९१९ मध्ये पुणे नगरपालिका प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा विचार करत होती. हे शिक्षण केवळ मुलांना सक्तीचे करावे की मुले व मुली अशा दोघांना सक्तीचे करायचे, याबद्दल निरनिराळी मते होती. मुलांप्रमाणे मुलींनाही सक्तीचे शिक्षण देणे आवश्यक कसे आहे, या मताचा प्रसार करण्यासाठी स्त्रियांची मोठी मिरवणूक काढण्यात आली. प्रत्येक जातीतील मुलींना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध व्हाव्या. म्हणून त्यांनी डोळ्यासमार ठेवू त्यांनी स्त्रियांसाठी शिक्षणाचा प्रसार केला. प्रा. धोंडीराव केशव कर्वे यांनी चळवळीला पाठिंबा दिल्याने शिक्षण प्रसारला चालना मिळाली. डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या साहाय्याने वसतिगृहातील मुलां-मुलींसाठी त्यांनी तांदूळ फंड, कापड फंड, पेटी फंड सुरू केला होता. या मिशनने काही ठिकाणी उद्योगशाळा चालवल्या होत्या. तसेच शाळेत बुक बायडिंग आणि शिवणकाम शिकविले जात असत.

**धर्माविषयक विचार :**

वि. रा. शिंदे यांच्यावर लहानपणी वारकरी संप्रदायाचे संस्कार झाले होते. पुण्यामध्ये असताना प्रार्थना समाजातील वातावरण आणि उपासना याचा यांच्यावर प्रभाव पडला. आपण प्रार्थना समाजाचे प्रचारक व्हावे, अशी त्यांची इच्छा होती. त्यामुळे त्यांनी प्रार्थना समाजाचे सभासदत्व स्वीकारले, तसेच ते ब्राह्मोसमाजाचे अनुयायी झाले. ब्राह्मोधर्माचे केवळ अनुयायी होऊन विठ्ठलरावांचे समाधान झाले नव्हते, केशवचंद्र सेन-यांच्या ब्राह्मो समाजातील योगदानाबद्दल त्यांना खूप आदर होता. ब्राह्मो समाजातून महाराष्ट्रात निर्माण झालेल्या प्रार्थना समाजाबद्दल आणि त्याच्या न्या. रानडे, आत्माराम पांडूरंग, डॉ. भांडारकर इ. नेत्यांबद्दलही आपुलकी होती.

'परमेश्वर एकच आहे. सर्व माणसे ही एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. म्हणून सर्वांनी बंधूभावाने वागावे. हे ईश्वरास प्रिय आणि मनुष्याचे कर्तव्य आहे. ईश्वराने मानवास निर्माण केले नाही तर मानवान ईश्वरास निर्माण केले आहे.' अशा प्रकारचे मत विठ्ठलराव शिंदे यांनी मांडले आहे. त्या काळात विठ्ठलराव शिंदे यांनी काही चर्चेसमध्ये उपासना चालवल्या. १ ते ४ सप्टेंबर १९०३ रोजी धर्मपरिषदेसाठी ब्राह्मो समाजाचा हिंदुस्थानातील प्रतिनिधी म्हणून त्यांची निवड केली.

जातिभेद, मूर्तिपूजा, नास्तिकता, लहान-लहान कोकरांना बळी देणे यासारख्या गोष्टी विठ्ठलरावांना मान्य नव्हत्या. ते या गोष्टी विरोधी होते. विठ्ठलराव शिंदे हे धर्म शिक्षणासाठी इंग्लंडमध्ये मॅचेस्टर कॉलेजात गेले आणि त्यांनी विविध धर्माचा तौलनिक अभ्यास केला. आयुष्यभर ते धर्मचिंतन आणि धर्मप्रसार करत होते. ब्राह्मोधर्म प्रसाराचे कार्य ग्रामीण भागात करावे अशी विठ्ठलरावांची तीव्र इच्छा होती. खेडेगावातील समाजावर धर्माविषयक अंधश्रद्धांचा मोठा प्रभाव असतो म्हणून तिथेच धर्म सुधारणेची अधिक गरज आहे असे त्यांना वाटत असे. आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात त्यांनी वाई आणि परिसरात हे कार्य करत होते.

**ग्रंथलेखन :**

धार्मिक आणि सामाजिक कार्य करीत असताना विठ्ठलरव शिंदे यांनी दोन प्रकारचे लेखन केले आहे.

१. रोजनिशीच्या स्वरूपाचे आत्मपर लेखन व प्रवासवर्णनपर लेखन

२. मिशन्या कार्यातून मुक्त झाल्यानंतर केलेले संशाधेनपर लेखन

**१. रोजनिशी :** फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असताना १८९८

मध्ये विठ्ठलरावांनी लिहिलेली रोजनिशी हे त्यांचे पहिले लेखन म्हणता येईल. पुण्याच्या वातावरणातील अनुभव आणि त्यावरील प्रतिक्रिया त्यात आहेत. त्यांनी केलेले वाचन ऐकलेली व्याख्याने, घडलेले प्रसंग विठ्ठलरावांनी त्यामध्ये सांगितले आहे. थोडक्यात, तत्कालीन पुण्याच्या धार्मिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक वातावरणाची कल्पना या लेखनामध्ये दिसून येते.

१९०१ ते १९०३ या काळात शिंदे हे धर्मशिक्षणासाठी ऑक्सफर्डला गेले. तेथील वास्तव्यावर विठ्ठलराव शिंद्यांनी रोजनिशी लिहिली. या रोजनिशीतून त्यांचा अध्यात्मिक पिंड, समाजसुधारणेची तळमळ आणि मानवतावादी दृष्टीकोन लक्षात येतो.

१९३० साली येरवड्याच्या तुरूंगात असताना ही विठ्ठलरावांनी रोजनिशी लिहिली. तुरूंगातील रोजनिशीत तेथील वास्तव्य आपल्या धर्मचिंतनाला अनुकुल ठरल्याचे ते सांगतात. तसेच तुरूंगातही प्रार्थना, भजन, प्रवचन व धार्मिक चर्चा केल्याचा उल्लेख विठ्ठलरावांनी केला आहे.

**२. प्रवासवर्णन :** इंग्लंडमध्ये असतानाच विठ्ठलराव शिंदे यांनी प्रवासवर्णने लिहिली या प्रवासवर्णनामधून त्यांनी शेक्सपीयर आणि वर्डस्वर्थ यांची घरे, इंग्लंड व स्कॉटलंड येथील पर्वत व सरोवरे, लंडन शहर यांचे सुरेख वर्णन कले.

भारतात परत आल्यानंतर कधी ब्राह्मोधर्माच्या प्रचारासाठी, तर कधी अस्पृश्यता निवारण कार्यासाठी त्यांनी भारतभर भ्रमंती केली. त्याचीही प्रवासवर्णने लिहिली आहेत.

**आत्मचरित्र : माझ्या आठवणी व अनुभव :**

येरवड्याच्या तुरुंगात असताना विठ्ठलरामजी शिंदे यांनी 'माझ्या आठवणी व अनुभव' या आत्मचरित्राच्या पहिल्या भागाचे लेखन केले. सुमारे १०० पृष्ठांच्या या भागात त्यांनी आपल्या बालपणापासून ते विद्यालयेतील शिक्षणापर्यंतची हकिकत विस्ताराने लिहिली आहे.

आयुष्यात अनेक बरेवाईट अनुभव वाट्याला आले, टीका-टिप्पणी सहन कराव्या लागल्या. पण विठ्ठलरावांनी त्या संयमाने भोगल्या व पचवल्याही. राग, द्वेष, मत्सर इत्यादी मार्गाचा त्यानी कधी अवलंब केला नाही. हे त्यांच्या या आत्मचरित्रातून स्पष्ट होते.

अशा प्रकारची पुस्तके विठ्ठलराव शिंदे यांनी कॉलेज जीवनापासून ते तुरुंगात असे पर्यंत लिहिलेले आपल्याल दिसते.

**समारोप :**

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत मौलिक कार्य केलेल्या म. जोतिराव फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे या सर्व व्यक्तिपैकी एक म्हणजे कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे हे महाराष्ट्राला लाभलेले एक थोर विचारवंत आहेत. विठ्ठलराव हे कर्ते सुधारक होते व त्यांचे जीवन दीपस्तंभाप्रमाणे सदैव मार्गदर्शन करणारे आहे.

विठ्ठल रामजी शिंदे यांच्याकडे एक थोर समाजसुधारक म्हणून पाहिले जाते. विठ्ठलरावांनी विनम्रपणे आणि स्वाभाविकपणे आपल्या कामास सुरूवात केली. अस्पृश्यांसाठी रात्रीची शाळा उघडली. डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना केली. निराश्रित स्त्रियांसाठी 'सेवासदन' उघडण्यात आले. तसेच स्त्रियांच्या समस्या सजमून घेण्यासाठी सभा भरवल्या, रूपी फंडाची योजना आखली, अहिल्याश्रम उघडला. ही सारी कार्ये विठ्ठलरावांनी येणाऱ्या अनेक अडीअडचणींवर मात करून, विनम्र भावनेने केले. सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा यांची पर्वा न करता धार्मिक आणि सामाजिक सुधारणांसाठी आयुष्यभर फकिरी पत्करली. विठ्ठलरावांचा ज्याला हातभार लागला नाही अशी लोकसेवेची अणि समाजोन्नतीची चळवळ दाखवून देणे खूप अवघड आहे. कारण समाजातील स्त्रिया, दलित अस्पृश्य या सर्वांसाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केलेले दिसते. राजकारण, धर्मकार्य, शिक्षणकार्य आणि सामाजिक कार्य इतकेच नव्हे तर वाङ्मयसेवा आणि इतिहास संशोधन या सर्वांत विठ्ठलराव शिंदे यांचा फार महत्त्वाचा वाटा आहे.

# कुटुंब असंही !

✍..... कु. संध्याराणी शंकर पाटील
(बी.ए.भाग-१)

विश्वातील समस्त जीवांच्या हिताचे पसायदान मागणाऱ्या ज्ञानेश्वरांनी 'विश्वाची माझे घर' मानून सगळ्या विश्वालाच एक कुटुंब मानले. काळानुसार कुटुंबाची संकल्पना आणि व्याख्याही बदलत गेली. एकत्र कुटुंबातून विभक्त कुटुंबेही अस्तित्वात आली. व्यक्तीचा मुख्य आधार हा कुटुंब असतो. व्यक्तीची जडण-घडण कुटुंबातच होत असते. कुटुंबात कामवासना, वात्सल्याची भावना व त्यागाची भावना इ. भावना असतात. व्यक्ती-व्यक्तीत घनिष्ठता, भावनात्मकता असल्याने कुटुंबात औपचारिक संबंध असतात. पती-पत्नी, आई-वडील, बहीण-भाऊ इ. मधीच संबंध हे प्रेमाचे असतात, सहानुभूतीचे असतात. अशा जिव्हाळ्याच्या संबंधामुळे कुटुंबातील सदस्य हे एकमेकांसाठी कोणताही त्याग करतात. एकाचे यश हे सर्वांचे यश मानले जाते. परंतु आताची परिस्थिती ही यापेक्षा खूप वेगळी व पूर्वीपेक्षा बदललेली दिसून येते.



पूर्वीच्या लोकांमध्ये एकोप्याचे संबंध असायचे. एखादं गाव म्हटलं की, त्या गावामध्ये झोपड्या छोटी-छोटी घरे दिसून न येता मोठमोठ्या वाड्या, वस्त्या असलेल्या आपल्याला दिसून येतात. पूर्वीची कुटुंबपद्धती ही एकत्र कुटुंबपद्धती होती. पण काळाच्या ओघात ही एकत्र कुटुंबपद्धती कशी विभक्त कुटुंबपद्धती होत गेली कळलंच नाही. पूर्वीच्या कुटुंबातच नव्हे तर शेजाऱ्यांमध्ये देखील एकोप्याचे, प्रेमाचे संबंध असायचे पण आता कुटुंबामध्ये इतकी फूट पडली आहे की, एकमेकांशी स्पर्धा, ईर्षा करायलाही आताच्या कुटुंबातील माणसं मागे-पुढे पाहत नाहीत. नाती आपलीच आहेत याचा विचार देखील त्यांच्या मनात येत नाही.

"एक दिवस दुःख पैशाला बोलतं
तू किती नशीबवान आहेस
की तूला मिळवण्यासाठी लोक
किती प्रयत्न करतात
आणि तेच लोक माझ्यापासून दूर पळतात...
पैसा बोलला,
नशीबवान तर तू आहेस
ज्याच्याजवळ तू असतोस
तेव्हा लोक आपल्या माणसांची आठवण तरी काढतात
कमनशीबी तर मी आहे
ज्याच्या जवळ मी असतो
तेव्हा त्यांना आपल्या माणसांचा विसर पडतो."

यावरून आपल्याला दिसून येतं की, पैशासाठी माणूस माणसाला विसरत चाललाय. पैसे कमावण्यासाठी कुटुंबातील मुलं आपल्या आई-वडिलांपासून दूर जातात. अनेकजण तर आपल्या आई-वडिलांना एकटं टाकून स्वतःच्या बायका-मुलांना घेऊन पुणे-मुंबईसारख्या शहरात स्थलांतर झालेत. मान्य आहे की, त्यांची कामाची ठिकाणे तिथे आहेत. पण हेही तितकच खरं आहे की आई-वडिलांपासून मुलं, त्यांची नातवंडं दुरावलीत. कुटुंबातील गणगोतावळा तेंव्हाच एकत्र असतो, जेव्हा त्या कुटुंबात एखादी दुःखद घटना घडलेली असते. पण हे चित्र सगळीकडेच असतं असं नाही. काही ठिकाणी दुःखाच्याच प्रसंगी नाही तर सणासुदीला, मंगल कार्याच्यावेळी देखील कुटुंबातील सर्व माणसं एकत्र येतात.

पूर्वीची कुटुंब ही एकत्र कुटुंबपद्धती होती, पण आता हे चित्र क्वचितच कुठेतरी खेड्यापाड्यात एखादं दिसून येतं. अनेक ठिकाणी खेड्यांमध्येही विभक्त कुटुंबपद्धती असलेली आपल्याला दिसून येते. जसजसा काळ लोटला तसशी कुटुंबाची पद्धतही बदलत गेली. आधुनिककरण इतकं वाढलं की, त्यामध्ये आपण आपल्या माणसांसाठीच त्यांना सोडून नोकरी-धंदा पाहण्यासाठी शहरात येऊ लागलो आणि कालांतराने आपल्या त्याच मायेच्या माणसांचा आपल्याला विसर पडायला लागला. पूर्वी लोकांचा कौटुंबिक व्यवसाय चालायचा. कौटुंबिक व्यवसाय असल्याकारणानं त्यांची पुढची पिढी देखील तो व्यवसाय चालू ठेवत असे. पण शिक्षणाच्या प्रगतीमुळे व वाढत्या वैज्ञानिक तंत्रज्ञानामुळे सगळ्यांचा कल जास्तीत-जास्त शहरी भागाकडे आहे. कारण तिथे नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. आजच्या या स्पर्धेच्या युगात आणि

वाढत्या महागाईमुळे नोकरीशिवाय पर्याय नाही. आज विज्ञान खूप पुढे गेलंय. औद्योगिकरण, आधुनिकीकरण, अनेक शिक्षणाच्या प्रगती, वैज्ञानिक तंत्रज्ञान या गोष्टीमुळे नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत आणि आजच्या या स्पर्धेच्या युगात व वाढत्या महागाईत टिकायचं असेल तर नोकरी ही हवीच. पण हे सगळं करताना आपण आपल्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करतो. शहरात अपूऱ्या जागा पडत असताना आपण आपलं मोठं कुटुंब त्या ठिकाणी वसवू शकत नाही. शहराच्या ठिकाणी कुटुंबाचा आकार हा मर्यादित असतो आणि म्हणून अनेक लोकं फक्त आपली पत्नी व मुलं यांनाच घेऊन शहरी ठिकाणी स्थलांतर होतात.

आपण अनेक वेळा पाहतो, असं म्हटलं जातं की,
''आई-वडिलांसाठी कोणतीही गोष्ट सोडा
पण कोणत्याही गोष्टीसाठी
आई-वडिलांना सोडू नका
कारण जीवनात एक वेळ कोणतीही
गोष्ट आपली साथ सोडेल
पण आई-वडिलांची साथ
ही नेहमीच तुमच्याबरोबर
आयुष्यभर असेल''

पण हे फक्त बोलण्या आणि ऐकण्यापुरतेच आहे का ? पूर्वीची पिढी पाहिली तर ते आपल्या आई-वडिलांसाठी, आपल्या कुटुंबासाठी अनेक गोष्टींचा त्याग करायचे. आपल्या कुटुंबातील प्रत्येक सदस्यांवर त्यांचे प्रेम असायचे. आजी-आजोबा, आई-वडील, बहीण-भाऊ, पती-पत्नी यांच्यातील संबंध हे जिव्हाळ्याचे, प्रेमाचे असायचे.

यांच्यातील प्रेम म्हणजे,

''कितीही जवळ जाणार असेल तरी, 'गाडी सावकाश चालवा आणि पोहचल्यावर फोन करा' असे आईचे काळजीचे
बोल म्हणजे प्रेम...
दिवाळीला स्वत:साठी कपडे न घेता मुला-मुलींसाठी त्यांच्या पसंतीचे महागातले कपडे घेणारे बाबा
म्हणजे प्रेम...
कितीही मस्ती केली व रात्री घरी यायला लेट झाला तरी आई-बाबांना न सांगता हळूच दार उघडणारे
आजी-आजोबा म्हणजे प्रेम...
कितीही वाद झाले तरी दादा जेवलास का
असं विचारणारी बहीण
म्हणजे प्रेम...
पगार कितीही कमी असला तरी दिवाळी
भाऊबीजला बहिणीच्या पसंतीचे घड्याळ घेणारा
भाऊ म्हणजे प्रेम...
आणि या सर्वांची काळजी घेणारी नि स्वत:ची काळजी न करता सकाळी पहाटे उठून जेवणाचा डबा बनवणारी
बायको म्हणजे प्रेम...''

यावरून कळतं कुटुंब कसं असावं, पूर्वीच्या कुटुंबामध्ये होती अशी एकमेकांवर प्रेम करणारी माणसं. आजी-आजोबा, आई-वडील, काका-काकू, पती-पत्नी, बहीण-भाऊ, चुलत भावंडं इतक्या सगळ्यांनी मिळून बनतं एकत्र कुटुंब. हे झालं पूर्वीच्या कुटुंबाबद्दल पण आता आपल्या पिढीमध्ये कुठेतरी दिसतं का एकत्र कुटुंब, नात्यामध्ये दिसतो का इतका गोडवा. आपल्या या काळात वीस-पंचवीस माणसं असलेलं कुटुंब पहायला तरी मिळतं का?

अहो, हेच काय पूर्वीची माणसं आपलं भलंमोठं घर शेणाने सारवत होती. रोज सकाळी पहाटे उठून सडा रांगोळी घातलेला असायचा. आता शेणाने सारवण्यासाठी घरं राहिलेत का? खेड्यातही स्लॅबची घरं जास्त प्रमाणात असलेली आपल्याला दिसून येतात. पूर्वीच्या सूना आपल्या सासू-सासऱ्याची दीर, ननंद, नवरा, मुलं यांची काळजी घ्यायच्या त्यांना हवं नको ते पहायच्या आणि मग स्वत:कडे लक्ष द्यायच्या. पण आता वास्तवात असं चित्र कुठे पाहिलय ? हा, खेड्यात २५% सुना अशा असतीलही, पण इतर अनेक मुलीचं काय ? त्यांना स्वत:चे आई-वडील हवेत पण सासू-सासरे नकोत. अरे पण तुम्ही हे का विसरताय की तेही कुणाचे तरी आई-वडीलच आहेत आणि म्हणूनच ते तुमचे सासू-सासरे आहेत.

असं म्हणतात की, सगळीच नसली तरी काही मुलं लग्नानंतर बदलतात. आई-वडिलांवर कितीही प्रेम असलं तरी लग्नानंतर ते कमी होतं. साहजिकच आहे म्हणा. लग्नानंतर आई-वडिलांवरचं प्रेम आटलं कारण, आता बायको आलेली असते ना! अरे पण ज्या आईने नऊ महिने पोटात ठेवलं, लग्न होईपर्यंत बाबांनी सांभाळ केला आणि अशा आई-बाबांवरचं प्रेम लग्नानंतर आटलं?

आताच्या सुनांना फक्त ती स्वत: तिचा नवरा आणि त्यांची मुलं हे इतकच कुटुंब हवं असतं. सासू-सासऱ्यांची अडचण होते. नको असलेलं साहित्य जसं आपण आडगळीत टाकतो अगदी तसंच अडगळीचं सामान असल्यासारखं अनेक सासु-सासरे

कोणाचे तरी आई-वडील वृद्धाश्रमात असतात. पूर्वीच्या कुटुंबामध्ये असलेले हे सासू-सासरे त्यांच्या नातवंडांसाठी गोष्टींचा खजिना असायचा. पण आता शहरी भागात पाहिलं तर लहान मुलांचे उतार वयाचे आजी-आजोबा वृद्धाश्रमात असलेले दिसून येतात. आजी-आजोबा वृद्धाश्रमात असताना नातवंडांना गोष्टी सांगण्याचा प्रश्नच येत नाही. म्हातारपण म्हणजे दुसरं बालपणच असतं ना ? आपण जेव्हा लहान होतो, तेव्हा आपल्या ह्याच म्हाताऱ्या आई-बाबांनी अनेक काबाडकष्ट करून तुमचे बालपण फुलवलं, तुमचा सांभाळ केला, तुम्हाला शिकवलं, मोठं केलं, स्वतःच्या पायावर उभं राहण्याइतपत लायक बनवलं आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे तुम्हाला जन्माला घालून त्याच्या कुटुंबाचा हिस्सा बनवलं आणि आता त्यांच्या म्हातारपणात तुम्ही त्यांचा आधार व्हायचं सोडून तुमची ही जबाबदारी झटकून देताय. एकंदरीत या सगळ्या गोष्टीवरून कळतं आपली एकत्र कुटुंबपद्धती कशी आणि का विभक्त झाली. अनेक घरांमध्ये सासू-सासऱ्यांशी त्यांच्या सूना परकेपणाने वागतात. सगळ्याच घरांमध्ये, कुटुंबामध्ये नसलं तरी काही कुटुंबामध्ये सासू-सासऱ्यांशी त्या उद्दाम वर्तन करतात. त्यांचं आंथरून-पांघरून वेगळे, ताट-वाटी वेगळी, इतकच काय चहाचा कप देखील वेगळा असतो आणि तोही दांडा नसलेला, पण अशा वेळी एक गोष्ट लक्षात येते का ? तुम्हीही वृद्ध होणार आहात, तुम्हीही कोणाचे तरी सासू-सासरे होणार आहात. यावरून एक उदाहरण सांगता येईल,

एका सुनेने आपल्या वृद्ध सासऱ्याला असंच दांडा नसलेल्या कपात चहा दिला होता. तितक्यात तिच्या मुलाने प्रश्न विचारला, 'आई आपल्या सगळ्यांना किती छान दांडा असलेले कप आहेत, मग आजोबांनाच का गं असा दांडा नसलेला कप.' त्यावर त्याची आई बोलली, 'बाळा आजोबा आता म्हातारे झालेत त्यांचे हात थरथरतात मग चहा पिताना हातातून कप खाली पडला तर?' क्षणाचाही विलंब न करता मुलगा आईला म्हणाला, 'आई हा कप जपून ठेव पुढे तुम्ही म्हातारे व्हाल तेंव्हा तुम्हालाही मी ह्याच कपातून चहा देईन.' मुलं ही वर्तनातून शिकतात त्यांना अशा गोष्टी शिकवाव्या लागत नाही.

परदेशी जाण्यासाठी एक मुलगा आपल्या वडिलांना घेऊन प्लॅटफॉर्मवर जातो. दोनची प्लाईट असते. बाबांना तो दोन मिनिटं इथेच थांबा असं सांगून तिथून जाता. प्लाईटची वेळ जवळ आलेली असते. अजून तो मुलगा आलेला नसतो. अखेर प्लाईट सुटून जवळजवळ आडीच तीन तास होतात. तरी तो येत नाही. त्याच्या बाबांच्या मनात वाईट विचार आला नाही. उलट त्यांना काळजी वाटू लागली अनेकांना त्यांनी विचारलं, 'अरे माझा मुलगा मला दोन मिनिटात आलो असं सांगून गेला आणि आडीच तास होऊन गेले. अजूनही पतरला नाही तो कशाला ठोकलाय का बघा, त्याला काही झालंय का बघा.' तेव्हा त्यांना एका व्यक्तीने सांगितले, 'एकट्याचाच पासपोर्ट होता. तो दोनच्या प्लाईटने केव्हाच गेलाय.' तेव्हा त्या वृद्ध माणसाने प्लॅटफॉर्वर आक्षरशः भिक मागून उरलेले दिवस हे वृद्धाश्रमात काढले. यावरून कळतं की आपल्यात माणुसकी किती आहे. अरे, आपण जर आपल्या मायेच्या माणसांसोबतच ज्यांनी आपल्यासाठी स्वतःचं आख्खं आयुष्य झिजवलं त्या व्यक्तींसोबतच जी आपल्या कुटुंबातील एक हिस्सा असते. त्या घरातल्या व्यक्तीसोबतच आपलेपणाने माणुसकीने राहत नसू तर बाहेरच्यांसोबत काय आणि किती माणुसकीने राहणार आहे. आपल्या सुखासाठी आपण आपल्या कुटुंबालाही जुमानत नाही.

पण मला असं वाटतं की,

'परिवारापेक्षा
श्रेष्ठ पैसा नाही
वडिलांपेक्षा
श्रेष्ठ सल्लागार नाही
आईपेक्षा
श्रेष्ठ जग नाही
भावापेक्षा
श्रेष्ठ भागीदार नाही
बहिणीपेक्षा
श्रेष्ठ शुभचिंतक नाही
आणि या सगळयांनी मिळून बनतो परिवार याच परिवाराशिवाय जीवन नाही.

पूर्वी एकत्र कुटुंबपद्धती होती. त्यामध्ये आजी-आजोबा, आई-बाबा, काका-काकू, पती-पत्नी, बहीण-भाऊ इ. व्यक्तींनी मिळून बनलेलं हे एकत्र कुटुंब कालांतराने या एकत्र कुटुंबातून विभक्त कुटुंब होत गेलं. त्यामध्ये आई-बाबा आणि त्यांची मुले या लोकांनी मिळून बनलेलं हे विभक्त कुटुंब आता शिक्षणासाठी म्हणून मुलंही हॉस्टेलसारख्या ठिकाणी राहात. कुटुंबात राहिलेल्या व्यक्ती ह्या दोनच त्या म्हणज नवरा-बायको. कुटुंबामध्ये फुट पडत गेली.

शहरी ठिकाणी पाहिलं तर पती-पत्नी दोघंही नोकरी करणारे

असतात. त्यामुळे त्यांचं लहान बाळ हे पाळणाघरात असलेलं दिसून येतं. समजा तेच जर त्या बाळाचे आजी-आजोबा घरी असते, तर त्या बाळाकडे पुरेपूर लक्ष राहिलं असतं. त्याचा जीव रमेल असं त्यांच्या आजी-आजोबांनी त्याला ठेवलं असतं, त्याचा सांभाळ केला असता. पण हल्लीच्या सुनांना सासु-सासरे म्हणजे अडगळ, अडचण वाटते. त्यामुळे वृद्धाश्रम हेच त्यांचं शेवटपर्यंतचं घर. लहानपणी पाळणाघर, थोडं मोठं झाल्यावर शिस्त लागावी म्हणून बोर्डींग आणि अजून थोडं मोठं झाल्यावर हॉस्टेल. लहानपणापासून जर आई-वडिलांच्या कुटुंबामध्ये असणाऱ्या सदस्यांच्या म्हणजेच आजी-आजोबा, काका-काकू, चूलतं भावंडे असतील तर मोठे बहीण-भाऊ यांच्या संस्कारात मुलं मोठी झाली तर शिस्तीसाठी त्यांना बाहेर पाठवण्याची गरज भासत नाही. पण असं नाही का वाटत शिस्त लागावी म्हणून बाहेर पाठवणं हे एक निमित्त आहे. खरं तर आई-बाबा काम करून दोघंही दमून येणार त्यानंतर मुलांचा अभ्यास, त्यांचं खाणंपिणं ह्या गोष्टींपासून सुटकारा मिळतो. इतकच बाकी काही नाही. खरंतर जिथे आई-बाबांना मुलांसाठ वेळ नाही तिथे त्यांचे संस्कार तरी काय मिळणार.



पूर्वीच्या कुटुंबातील मुलांना असं पाळणाघर, बोर्डिंग, हॉस्टेल या गोष्टी ऐकण्यात देखील नव्हत्या. पूर्वीच्या मुलांना शिस्त लावण्याची गरज नव्हती. संस्कारातून त्यांना आपोआप शिस्त लागायची. अनेक गोष्टी ते आपल्या कुटुंबातील इतर व्यक्तींशी बोलत असत, वेगवेगळ्या गप्पा गोष्टी करत असत जेवताना ते लोकं एकत्र बसून जेवत असायचे. अनेक गोष्टींवर चर्चा करायचे. आजचं जग म्हणजे धावपळीचं जग झालय आणि आजची तरुण पिढी यांना तर घरातल्यांसोबत दोन गोष्टी बोलायलाही वेळ नाही. त्यात जोड म्हणून मोबाईल, वॉटसप, फेसबुक या गोष्टी आहेतच की, या गोष्टींमुळे तर आजची तरूण पिढी कुटुंबापासून फार तुटत चालली आहे. या गोष्टीमुळे त्यांचा कुटुंबातील संवाद कमी होत चाललाय. त्यांना त्यांच्या कुटुंबापेक्षा मोबाईल, वॉटसप, फेसबुक या गोष्टी जास्त महत्त्वाच्या वाटतात.

पूर्वीच्या कुटुंबातच नव्हे तर शेजाऱ्यांमध्येही इतका गोडवा असायचा की, शेजार देखील कुटुंबाचाच एक भाग आहे, असं वाटायचं. वडिलांच्या संपत्तीमध्ये मुलाप्रमाणेच मुलीचाही समान वाटा असतो. त्याच संपत्तीच्या वाट्यावरून चालू घडामोडीतील एक उदाहरण - सख्खे बहीण-भाऊ त्यांचे वडील अस्तित्वात नव्हते. दोघांचीही लग्नं झाली होती. बहिणीची मुलं ही लग्नाच्या वया इतपत असावीत संपत्तीसाठी भावाने आपल्या रक्ताच्या नात्यातील, आपल्या सख्या बहिणीला तिने मला मारण्याचा प्रयत्न केला. अशा खोट्या आरोपावर पोलीस कोठडीत अडकवण्याचा प्रयत्न केला. अशावेळी वाटतं, हा तोच भाऊ का ज्याला आपण दरवर्षी राखी बांधतो. जो आपल्याला दरवर्षी तुझं रक्षण करेण असं आश्वासन देतो. यावरून स्पष्ट दिसून येतं की, आपल्या पिढीतील कुटुंबातील अनेक माणसं स्वत:चं स्वतंत्र कुटुंब वसवण्यासाठी, संपत्तीच्या हव्यासपोटी जन्माजन्मांतराचं नातं विसरतात. त्याचा त्यांना किती सहज विसर पडतो. म्हणून म्हणते,

'पती-पत्नी, आई-वडील
बहीण-भाऊ आप्त स्वकिय
अशी कुटुंबाची व्याप्ती आहे,
कुटुंबाचे लालन पालन
यांचे संरक्षण याची जबाबदारी
कुटुंब प्रमुखावर असते.
घरातील लहान मोठी
कुटुंब प्रमुखाशी आदराने वागतात.
सारे निर्णय त्यांना
विचारुनच घेतले जातात.
ज्या कुटुंबात शिस्त, संस्कृती
चारित्र्याचा मिलाफ असतो
त्या कुटुंबाची भरभराट होते.
त्या कुटुंबात आनंदाचा
लखलखाट असतो.'

# वटवृक्षाचे कथन

✍..... कु. तेजश्री मनमोहन राजे
(बी.एस्सी..भाग-२)

मी विचार करू लागले, आता काय करायचे ? सुट्टी सुरु झाली, अभ्यास नाही. धमाल करायची कशी ? मला काही सूचत नव्हते. माझ्या जवळच्या मैत्रिणींना फोन केले परंतु मला प्रश्नाचे उत्तर मिळत नव्हते. एक दिवस गेला. दोन दिवस गेले. तीन दिवस गेले. पुन्हा मैत्रिणीला फोन केला. तिला समजावून सांगितले, तेव्हा कुठे ती माझ्याबरोबर येण्यास तयार झाली. धमाल करण्याचा दिवस ठरला. माझा भाऊ यशही आमच्याबरोबर येण्यास तयार झाला. विशेषत: मला निसर्ग सौंदर्य खूप आवडते. त्यामुळे आम्ही गावाजवळ असलेल्या जंगलात सफर करण्याचा बेत आखला. हिरव्यागार जंगलात जाण्यास सर्वांनी ग्रीन सिग्नल दिला. आईलाही आनंद झाला होता, परंतू सावध जाण्याचा आम्हाला सल्ला दिला. मला तो योग्य वाटत होता. मैत्रिणीने जेवणाचा डबा आणलेला होता. आईनेही मला आणि यशाला टिफिन दिला.



आम्ही जंगलाच्या दिशेने चाललो. वाऱ्याची झुळूक अंगाला स्पर्श करून जात होती, जणू शरीरावरून कोणीतरी मोरपिसारा फिरवत आहे, असे मला वाटते होते. पक्षी आनंदाने बोलत होते, त्यांचा किलबिलाट सुरु होता. आमचे ते वेलकम करातयत असेच मला वाटले. कोठे कोठे माकडांचे कळप दिसायचे, छोटी पिले बागडत होती. ते दृश्य मन मोहवून टाकणारे होते. अनेक प्रकारची झाडे, झुडपे, वेली तिथे होत्या. हे सर्व बघत बघतच माझा फेरफटका सुरू होता. तितक्यात मला एक वडाचे झाड म्हणजेच वटवृक्ष दिसला. त्याचा आकार इतका मोठा व अवाढव्य होता. मला वाटले, हे झाड कितीतरी वर्षापूर्वीचे असेल. वटवृक्षाच्या पारंब्या अनेक होत्या, त्या मोठ्या होऊन, जमिनीला स्पर्शून त्यांच्या आणखी नवीन पिढ्या तयार झाल्या होत्या. त्या वटवृक्षाला पाहून मला एका एकत्र कुटुंबाला भेटल्यासारखे वाटले. त्या झाडाच्या निरीक्षणानंतर मी त्या वटवृक्षापासून चार पावले दूर गेल्यानंतर मला पाठीमागून आवाज आला, 'अगं मुली! एकेतस का...?' तेवढ्यात मी मागे वळून पाहिले. मला वाटले कोणीतरी मला हाक मारत आहे, पण काय, मागे कोणीच नव्हते. तेव्हा परत मी माझ्या मार्गावर वळले आणि निघाले तर काय, पुन्हा तोच आवाज आला. एकदा मी इकडे तिकडे बावरून पाहिले तर चक्क मला समजून आले की, तो वटवृक्ष हा, हा तोच तो वटवृक्ष माझ्याशी बोलण्याचा प्रयत्न करीत होता. मला ती, वस्तुस्थिती पाहून आश्चर्य वाटले. त्या आश्चर्यावर मी विश्वास ठेवला आणि मी ऐकतच गेले. त्यावर तो वटवृक्ष म्हणाला, ''इतके दिवस मला तुझ्यासारखी कोणी व्यक्ती भेटली नाही की, जिच्यासोबत माझे सुख व दु:ख व्यक्त करता आले नाही. म्हणून मी तुझ्याशी बोलत आहे.'' पुढे तो वटवृक्ष म्हणाला की, ''माझे तू मनोगत ऐकशील का?'' मी त्याला भावनिक होऊन उत्तर दिले, ''नक्कीच ! मला तुझे मनोगत ऐकायल आवडेल.''

तितक्यात त्याने त्याच्या मनोगताची सुरवात केली. म्हणाले, ही १०० वर्षापूर्वीची गोष्ट आहे. माझ्या भावंडाबरोबर माझा जन्म झाला. लहानपणी भावंडाबरोबर व आमचा मित्र वारा यांच्याबरोबर खेळत खिदळत कधी मोठा झालो हे समजूनच आले नाही. अनेक लहान मुलेसुद्धा आमच्याबरोबर खेळायचे, झोके घ्यायचे.

त्यावेळी या जंगलासोबत अनेक झाडेझुडपे व प्राणी होते. परंतु जसजसा लोकांचा स्वार्थीपणा वाढून जेव्हा त्यांचा जंगलामध्ये सहवास वाढला, तेव्हा हळूहळू हे सर्व काही कमी कमी होत गेले. आता मी तुला सांगतो की, तु इथे बघतच आहेस की या जंगलामध्ये झाडे कमी पण आजूबाजला सिमेंटची घरे, बंगले, कारखाने उभारले आहेत. मला तुझ्याकडे एक गोष्ट मांडायची आहे, ती म्हणजे माझ्यासारखी अनेक झाडे माणसांसोबत अगदी प्रेमाने वागतात. उदा. झाड आपले पूर्ण आयुष्य मानवजातीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी समर्पित करते. जसे की, फुले देवाच्या आरतीसाठी, स्त्रियांच्या सौंदर्यासाठी, फळे खाद्यपदार्थ मानवजातीसाठी, लाकुड उपयोगी वस्तू म्हणून फर्निचरसाठी, निवारा प्राणी-पक्ष्यांच्या निवासासाठी.

प्रत्येक झाडाचे वेगवेगळे गुणधर्म असतात जसे की, अनेक

झाडे औषधी असतात, अनेक झाडांचा कुंपन म्हणून वापर केला जातो, काही झाडांच्यापासून सुगंधी द्रव्ये तयार केली जातात, तर अनेक झाडांपासून मसाला मिळतो, तर काही झाडांच्या पानापासून कागद तयार केला जातो. वटवृक्ष म्हणाले, 'मी प्रत्येक वनस्पतींचे गुणधर्म सांगत गेलो तर मला अनेक वर्षे लागतील. यातून मला एवढंच सांगायचं आहे की, एखाद्या गोष्टीचा गरजेप्रमाणे वापर करायचा आणि त्याचा उपयोग संपला की, त्याला टाकून द्यायचं हा स्वभाव हा मनुष्यप्राण्याचा आहे.




आमच्याच बाबतीत बघा, आम्हाला लहानपणी मनुष्यप्राणी अगदी आनंदाने आणतात, घराशेजारी लावतात, रोज न चुकता आम्हाला पाणी घालतात. आम्हीसुद्धा आनंदाने व उत्साहाने मोठे होतो व चांगल्या भावनेने आम्हीसुद्धा त्यांना फळे, फुले देतो, मानवाच्या अनेक पिढ्या आपल्या आपल्या गरजा भागवून घेतात, पण अशी एक वेळ येते... जेव्हा ते आमचा विचार करत नाहीत, म्हणजेच त्यांना त्यांचा बंगला वाढवायचा असतो, तेव्हा त्यांना तिथे आम्ही अडथळा वाटतो. तेव्हा ते आम्हाला व आमच्या मुलाना निर्देयीपणे तोडून टाकतात.' हे सांगता सांगता वटवृक्षाच्या डोळ्यात अश्रू आले आणि ते रडायला लागले. तेवढ्यात मी त्याला म्हणाले, 'रडू नकोस ! मला तुझ्या व्यथा समजल्या आहेत.' मी त्याला सावरले तो पर्यंत वटवृक्ष, सावरत सावरत म्हणाले, 'माझे दु:ख सांगत सांगत मी तुलासुद्धा रडवले. Sorry हा पण मी तुला एक माझ्या आयुष्यातील एक अनंदाचीसुद्धा गोष्ट सांगतो.' वटवृक्ष म्हणाले, 'मागील वर्षामध्ये मी एकटाच वटवृक्ष होतो, म्हणजे ह्या परिसरात दुसरा कोणताही वटवृक्ष नव्हता. त्यावेळी ह्या परिसरात राहणाऱ्या महिला वटपौर्णिमेच्या दिवशी माझ्याजवळ येत असत. मला धागा गुंडाळत असत आणि परंपरेनुसार म्हणत मला धागा गुंडाळत असत आणि परंपरेनुसार म्हणत असत की, 'सात जन्मी मला हाच नवरा मिळावा.' जरी तो नवरा दारूडा किंवा काम न करणारा असला तरीसुद्धा तोच पाहिजे असा हट्ट धरतात. त्या महिला सोबत नैवेद्य व विवि प्रकारची फळे सुद्धा आणत असत. जरी त्यांच्या ह्या इच्छा पूर्ण होत असतील अथवा नसतील, पण त्यांच्यासोबत आणलेले पदार्थ आणि फळांमुळे मात्र पक्षाची व प्राण्यांची भूक मात्र हरपत होती.' पुढे तो म्हणाला, 'त्या महिलांच्या चेहऱ्यावर असलेल्या आनंदापेक्षा आणि उत्साहापेक्षा, प्राणीमंत्राचा आनंद व उत्साह त्या दिवशी जास्त असायचा. कारण, त्यांना भरपूर खायला मिळत असत. वटपौर्णिमे दिवी असंख्य स्त्रिया माझी पूजा करतात. त्यामुळे मी या दिवशीची आतुरतेने वाट पाहतो. तो क्षण माझ्या आयुष्यातील फार महत्त्वाचा क्षण असे.'

तो वटवृक्ष त्याच्या आयुष्यातील अनेक किस्से मला सांगत गेला आणि मी ऐकतच गेले. मनातल्या-मनात मला असे वाटले की, मी या वटवृक्षांसोबत जर संवाद साधला नसता, तर वृक्षांच्या जीवनात काय काय घडत जाते हे मला समजूनच आले नसते. त्यामुळे मी मनातल्या-मनातच खुश झाले व थोडे गालावर हसू आणले आणि वटवृक्षाचे मनोगत ऐकतच गेले.

वटवृक्ष म्हणाले, 'भारताचा राष्ट्रीय वृक्ष म्हणून माझी गणना केली जाते. त्यामुळे मला माझा व माझ्या भावंडाचा फार वर्ग आहे. आम्ही सहकुटुंब, सहपरिवार एकत्र राहतो. मौजमजा करतो, न भांडता, न रागावता राहतो. विभक्त न राहता, एकत्र कुटुंबपद्धतीने, आनंदाने, उत्साहाने, न भांडता राहातो.'

त्यावर मी म्हणाले, 'अरे व्वा ! किती सुंदर तू उपदेश आम्हाला करू शकतोस. मला तुझा स्वभाव फार आवडला आहे. तू माझा मित्र होशील काय ?' त्यावर वटवृक्ष हसले आणि म्हणाला, 'नक्कीच ! मला तुझा मित्र व्हायला फार आवडेल.' वटवृक्ष त्याच्या

जीवनातील आनंददायी व प्रसन्नदायी प्रसंग मला सांगत गेले. नंतर अचानकच वटवृक्षाच्या चेहऱ्यावरून हसू जाऊन गंभीरपणा आला आणि तो म्हणाला, 'मी आतापर्यंत ज्या गोष्टी अनुभवल्या त्या त्या गोष्टी मला इथून पुढे अनुभवायला मिळणार नाही.'
मी त्याला विचारले,
''असे का ?''
तो हळूहळू त्याच्यावर ओढवलेल्या संकटाचा खुलासा करू लागला. म्हणजेच त्या हिरव्यागार जंगलातून, वटवृक्षावरून एक High-way जाणार होता. म्हणजे मोठा रस्त्याचा मार्ग होणार होता. त्याचे कथन ऐकून मी थक्कच झाले आणि हे सांगून पुन्हा एकदा वटवृक्ष रडायला लागला. तो म्हणाला, ''इतक्या दिवसाचा माझा येथील सहवास संपणार. माझ्या फांद्यांचा आसरा घेऊन जगणाऱ्या त्या पक्षांचा निवारा संपणार. येथे असणाऱ्या अनेक माकडांचा खेळण्याचा कट्टा म्हणजेच मी आता येथून निघून जाणार. याच्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे, जंगलात वाहणारी स्वच्छ हवा, अनेक पक्षांचा किलबिलाट, पालापाचोळ्यांचा आवाज, जंगलातून वाहणाऱ्या पाण्याचा खळखळाट येथून हरवणार आहे गं!' वटवृक्ष पुन्हा म्हणाला, ''मला तुला एक आवाहन करायचे आहे गं ! तुम्ही साऱ्या तरुण पिढ्यांनी एकत्र येऊन जर आमच्या पाठिशी राहिलात, तर तुमचे जीवन प्रगत होईल.'' आम्ही वातावरणात महत्त्वाचा वायू म्हणजेच ऑक्सिजन देतो. जो वायू शोषल्याशिवाय मनुष्यप्राणी जगू शकणार नाही त्यामुळे मला एवढेच सांगावेसे वाटते की, जर माझ्यावरून जाणारा हा High-way थांबला तर माझ्याप्रमाणे इतर झाडांचादेखील जीव वाचेल. झाडांचा जीव वाचल्यामुळे त्यांच्यावरच अवलंबून राहणारी जीवसृष्टी वाचेल. त्याच्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे, जर मनुष्यप्राणी आम्हाला मारून येथे High-way करणारच असेल, तर येथील शुद्ध वातावरण प्रदूषित होईल. वाहनांच्यामुळे हवा प्रदूषण होईलच होईल पण ध्वनिप्रदूषण व्हायलासुद्धा वेळ लागणार नाही. पहिल्या-पहिल्यांदा मानवाला अगदी सोईनियुक्त वाटेल पण तेवढ्याच होणाऱ्या त्या प्रदूषणामुळे जीवसृष्टीवर तसेच मानवजातीवरसुद्धा परिणाम व्हायला सुरवात होईल.'

यावर मी विचार केला. ते सर्व खरे होते. हे सर्व वाचवायचे असेल तर त्याच्यासाठी अनेक मदतीचे हात हवेत. वेगवेगळ्या प्रकारचे आणि महत्त्वाचे संदेश त्या वटवृक्षाने मला एका भेटीत दिले त्यामुळे मी त्याची मनापासून आभारी होते. त्यामुळे मी माझ्या मनात ठरवले की, आपल्या आयुष्यातील खरा व प्रामाणिक मित्र म्हणजेच 'झाड' होय. त्यामुळे त्यांच्या जीवासाठी प्रयत्न केले तर, आपलाही त्यातून जीव वाचेल. वटवृक्ष म्हणाला 'हा रस्ता न होण्यासाठी आता तुझ्यासारख्या अनेक तरुण-तरुणींची गरज आहे. यासाठी अनेक शाळांमधून, कॉलेजमधून प्रभातफेऱ्या काढल्या पाहिजेत ज्यामध्ये 'झाडे लावा, झाडे जगवा' यासारख्या घोषणा द्यायला पाहिजेत. त्याचप्रमाणे, अनेक पालक त्यांच्या मुलांचा वाढदिवस असला की, त्या दिवशी लोकांना पार्टी देतात पण पार्टी न देता त्याऐवजी त्या लोकांना अनेक प्रकारची रोपे देऊन भारताला निसर्गवृष्टीने भरवले पाहिजे.' प्रथमत: आमच्यावर आलेल्या संकटाचे निवारण करा, तेव्हाच तुम्ही आनंदाने जगू शकाल. निसर्गासोबत व पक्षांच्यासोबत उत्साहाने व नव्या उमेदीने जगू शकाल.' वटवृक्षाने मला व मनुष्यप्राण्याला नव्या मार्गाने जगण्यासाठी अनेक ध्येय, सल्ले सांगितले. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानले. त्याला मी विश्वास दिला की, तुझ्यावर आलेले हे संकट टाळण्यासाठी मी अतोनात प्रयत्न करीन. हे शब्द म्हणत मी माझ्या बेडवरून खाली पडले. तेव्हा कुठे मला समजले, आधीपासून सुरू असलेला माझा वटवृक्षाशी संवाद हे माझे स्वप्न होते. परंतु माझ्या त्या स्वप्नाने जीवन बदलून टाकले. त्या स्वप्नाने माझ्यात परिवर्तन घडवून आणले. त्या दिवसापासून मी आजूबाजूला अनेक झाडे लावून त्यांच संगोपन केले आणि तसेच आजूबाजूच्या लोकांनासुद्धा प्रेरित केले. या उपक्रमात सहभागी करुन घेतले. वाटते की,

'भरपूर झाडे लावा, जंगल वाढवा
भरपूर ऑक्सिजन मिळवा,
व मनुष्यप्राणी, प्राणीमात्र वाचवा.'

आता मात्र मला गंमत वाटू लागली, 'ना मैत्रीण, ना टिफिन, ना सहल, ना आई, ना भाऊ' खरे तर स्वप्नच ? पण ते वास्तवच वाटत होते. त्यामुळे किमान माझे प्रबोधन झाले. वृक्षांच महत्त्व तरी कळाले. पण खरं सांगू, मला संत तुकारामांचा अभंग आठवतो, तो मी तुम्हाला सांगते,

'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे
पक्षी हे सुस्वरे आळवितो.'

# याला जीवन ऐसे नाव

..... कु. अश्विनी आप्पासाहेब कसुते
(बी.कॉम..भाग-१)

नमस्कार मित्रांनो ! ही गोष्ट जीवनावर आधरित आहे. 'याला जीवन ऐसे नाव' ही गोष्ट वाचून स्वत:ला नक्की बदलण्याचा प्रयत्न करा.

जीवन म्हणजे सहन, मरण, दळण-वळण इत्यादी. आता सहन, मरण, दळण-वळण म्हणजे काय? असंही वाटत असेल. सहन म्हणजे स्वत:वर नियंत्रण ठेवणे, रागावर ताबा ठेवणे. उदा. समजा, तुमच्यापेक्षा एखादी मोठी व्यक्ती आहे त्यांच्यावर रागावून जास्तच बोलला तर कोणातही अपाय होऊ शकतो. म्हणतात की, 'रागाच्या भरात घेतलेले निर्णय अपायकारी असतात.' त्यासाठी ते बोलत असतात तेव्हा त्यांना जास्त रागावून बोलण्यापेक्षा समाधानाने तुमची जी समस्या असेल ती दूर करा. समाधानाने बोलले की, समोरची कोणतीही व्यक्ती नतमस्तक होते. म्हणून म्हणते की, 'समाधान देई तुला खूप ज्ञान' काही जण असेही म्हणत असतील की, माझं काही चुकलं नाही, तरीही बोललेलं कसं सहन करायचं. तर काही जास्त नाही मित्रांनो, त्याला त्याची चूक किंवा आपली चूक समजावून सागायची. काहीजणांना आपली चूक व्यक्त करता येत नाही. आजकाल सर्व कांही बदलेलं आहे. त्यामुळे माणुसकी पायदळी तुडवले जात आहे. ज्याला माणुसकी नसेल त्याला या सुंदर जीवनाची चव कळणार नाही. समजा प्रत्येक पदार्थात मीठ घालतो, कारण त्या चिमुटभर मिठाशिवाय कोणत्याही पदार्थाला चव येत नाही. तसेच व्यक्तीजवळ सहनशिलता नसेल तर ते काहीच उपयोगाचे नसते. मान्य आहे की, प्रत्येकवेळी किती सहन करून जगायचं ? म्हणून आपण वाईट वागू नये.



आपण जेव्हा अगदी लहान असतो, तेव्हा काहीही माहीत नसते. कोणाला काय म्हणून ओळखायचं, कसं जगायचं, कसं वागायचं, काही माहीत नसतं. पण ते दुसऱ्यांचं ऐकून किंवा बघून शिकत असतो. म्हणून आपण मोठे झाल्यावर काही बाबतीत चुकतो. कारण लहानपणी वाईट, चांगलं काही माहीत नसतं. कोणी आपल्याशी चांगलेच राहिलेले असतात असे नाही. त्यातीलच एक शिकलेली वाईट सवय आम्हाला पुढे दुखावते. पण प्रत्येकाच्याच बाबतीत असे होतं असं नाही. त्यात आपली आपली चूक काही नसते. पण मोठे होईल तसे सर्व काही कळू लागते. तेव्हा आपण पहिल्यांदा शिकायचं ते प्रामाणिकपणाने कसं राहायचं. काहीजण खूप प्रामाणिक राहणारे असतात, पण तरीही त्यांना कोणी किंमत देत नाहीत. पण किंमत देत नाहीत म्हणून आपण आपला प्रामाणिकपणा सोडायचा नाही. कारण प्रामाणिक असणाऱ्यांना खूप सुख असते. पण कष्ट भोगून शेवटी सुख मिळते. म्हणजे असं की, जरी आम्हाला माहीत असतं की, आपण प्रामाणिक आहोत. म्हणून प्रामाणिकपणा हा अपल्या आयुष्यातलं भाग्य असतं.

जीवन म्हणजे एखादी उलमणारी कळी असते. कळी हळू हळू मोठी होते. कधी असं होत नाही की उमललेलं फुल कळी होते. तसेच आपले जीवनही असतं. जर आपण गरीब असलो तर ती अजून उमलणारी कळी असते. श्रीमंत म्हणजे फूल जसं फूल कळी होऊ शकत नाही तशी श्रीमंती गरीबी होत नाही आणि जरी गरीबी असेल तर ती तशीच राहत नाही. म्हणून श्रीमंत काय, गरीब काय दोन्ही गोष्टी घाम गाळून केलेल्याच असतात. पण श्रीमंत आहे किंवा झालो म्हणून जास्त उणे बोलू नये. कारण पैशापेक्षा मनाची, बोलण्याची श्रीमंती ही जास्त महत्त्वाची संपत्ती असते. मनाची श्रीमंती काही घाम गाळून मिळवलेली संपत्ती नसते तर ती जन्मापासून मिळालेली बुद्धी असते. हवे असेल तर पडताळून पहा. एखाद्या श्रीमंत व्यक्तीकडे जा. तेव्हा कितीही चांगल्या व्यक्तीशी वेडंवाकड वागला तर लोक हसत नाहीत किंवा आनंदी होत नाहीत. कारण शब्दाने मारलेली गोष्ट मनाला दु:ख खोलवर देते. काही लोक श्रीमंत असणाऱ्या व्यक्तींना समोर छान बोलतात. पण मागे टोमणे मारतात. मग त्या बोलण्याला श्रीमंतीचा काहीच उपयोग नसतो. म्हणून मनाची श्रीमंती ही कायम टिकणारी संपत्ती

आहे. कोणी ती चोरून घेऊ शकत नाही आणि जर कोणी चोरलं तरी चोरणाऱ्याचं काही वाईट होत नाही. चोर ही मनाने श्रीमंतच होतो. म्हणून जरी गरीब असलो तरी खचू नका, मनाची श्रीमंती वाढवा.

प्रत्येक श्रीमंत असणारे हे वाईट किंवा गर्विष्ट असतात असे नाही. कारण ते श्रीमंत होण्यामागे त्यांचे कष्ट असते. म्हणून प्रत्येकांना वाईट या दृष्टीने पाहू नका. उदा. बिल गेटस् हे जगातील श्रीमंत व्यक्ती आहेत. एकदा त्यांचा मुलगा हॉटेलला जेवायला गेलेला असतो, तेव्हा तो मुलगा येताना वेटरला टिप्स म्हणून भरपूर पैसे देऊन जातो. मग त्याच हॉटेलमध्ये एकदा बिल गेटस् येतात आणि जाताना तेवढेच मोजके पैसे टिप्स म्हणून वेटरला देतात. मग वेटर म्हणतो, 'तुमच्या मुलग्याने तर लाखों रुपये टिप्स म्हणून दिले आणि तुम्ही मोजकेच दिले. का?' तेव्हा बील गेटस् म्हणतात, 'त्या पैशामागे मी किती कष्ट केले ते त्याला माहीत नाही.' बील गेटस् खूप श्रीमंत व्यक्ती तरी ते श्रीमंतीच्या मागचा विचार करून जगणारी व्यक्ती आहे. म्हणून प्रत्येक श्रीमंत व्यक्ती ही वाईट असते असे समजू नका. शेवटी टिकते ती माणूसकी.

आपण कोण आहोत ? काय आहोत ? आणि काय करून दाखवलं पाहिजे. हा सतत विचार करा. कारण जन्माला येताना आपण काहीही घेऊन येत नाही. म्हणून जातानाही रिकामा जायचं नाही. पण काय घेऊन जाऊ शकतो ? असा प्रश्न पडला असेल ना. सांगते, प्रत्येकांत एक ना एक कला दडलेली असते. फक्त ती कला दाखवून देण्याचा प्रयत्न करावा किंवा आयुष्यात असं एक स्वप्न पहावं की, सतत आपण त्या स्वप्नाच्या मागे धावायचं पण ते स्वप्न चांगलं आणि मोठं असावं. पण आपण ते स्वप्न पूर्ण करण्याच्या मार्गात अडचणी, दुःखद प्रसंग येऊ शकतात. म्हणून त्या अडचणींना घाबरून थांबायचं नाही. काही चेहरे आकर्षणाने आम्हाला अडकवतात. पण तरीही त्यातून सुटून पुन्हा त्या स्वप्नाकडेच धावायचं. पण, हो मित्रांनो ते अगदी प्रामाणिकपणाने केलेली प्रत्येक गोष्ट जीवन सुखी ठेवते.

आपण प्रत्येकजण जीवनात एक ना एक तरी ध्येय ठेवलेले असते. सगळं व्यवस्थित चालूही असतं. पण प्रेम, मैत्री ही गोष्ट प्रत्येकाच्या आयुष्यात येते. परंतु आपण आपलं ध्येय (स्वप्न) विसरून फक्त आनंदाचा विचार करायचं नाही आणि जर केला तर मग पूर्ण आयुष्य दुःखी होऊन जातं. म्हणून मी काय असेही म्हणत नाही की, प्रेम करू नका, मैत्री करू नका, करा. प्रेम करा, मैत्री करा पण त्याच आनंदात आपण पाहिलेले स्वप्न, ध्येय मात्र विसरू नका. कारण मैत्री किंवा प्रेम आपलं आयुष्य घडवून देत नाहीत. कारण त्यांना पण त्यांचं आयुष्य घडवायचं असतं. मैत्री आणि प्रेम या दोन्हीमध्ये खूप मोठा फरक आहे. मैत्री प्रत्येक संकटात साथ देते आणि प्रेम आनंद ! पण खरं प्रेम असेल तरच खरा आनंद. पण आपण ज्याच्यावर प्रेम करतो त्याच्यावर जास्त रागावतो. पण यालाच खरं प्रेम म्हणतात. रागावणे, रुसणे हे प्रेमात साहजिकच असतं. पण प्रेम समजावून घेऊन आयुष्यात राहणं खूप कठीण असतं आणि तितकच सोपंही असतं. मित्रांनो, काहीजणाचं प्रेम तर शिक्षणानुसार होत असतं. म्हणजे दहावीपर्यंत जी आपल्या शाळेत असेल त्यांच्यावर प्रेम. दहावीनंतर आणि कोणीतरी दुसरी छान वाटली की, तिच्यावर. खरंतर हे प्रेम नसतं ते आकर्षण असतं. आजकाल प्रेमालाही पालवी फुटत आहे. प्रेम केलेच तर असं करावं की, तिच्याशिवाय दुसरी, तिसरी कोणाला येऊच देऊ नये. काहीजण टाईमपास म्हणून प्रेम करतात. पण प्रत्येकाचं प्रेम हा टाईमपास असतो असंही नाही. खरंच काहीजण जिवापाड खूप प्रेम करणारी सुद्धा असतात. पण हो मित्रांनो, त्या प्रेमासाठी प्रेमळ माणसांना सोडून दूर पळून जाऊ नका. तुम्ही तुमचं प्रेम मिळावं म्हणून पळून जाऊन लग्न करता, तेव्हा तुम्ही आनंदी असता. पण किती दिवस तुम्ही आनंदी रहाल? तुम्ही जाताना कृपया एकदातरी पाठीमागचा, घरच्यांचा, आई-वडिलांचा विचार करा. लहानचं मोठं करतात. तितकच काय तर प्रेमही देतात, हट्टही पुरवतात. अशा त्या आई-वडिलांना दुःख देऊन जाणं चांगलं का ? तुम्हाला का मुलाचं/मुलीचं प्रेम दिसतं. तर मग आई-वडिलांचं प्रेम दिसत नाही का? जन्मापासून ते मरेपर्यंत जिवापाड प्रेम करणारे दोनच जीव असतात. पहिली आई दुसरे बाबा.

प्रत्येक मुलगा-मुलगी यांच्यासाठी सृष्टीने प्रेमळ व्यक्ती निर्माण केलेल्या असतात. तोच आपल्याला जोडीदार मिळतो. मित्रहो, खरं सांगायचं तर लग्न ज्याच्यांशी होतं तेच आपले आयुष्यभर प्रेम करणारे, काळजी घेणारे असतात. नवरा बायकोचं नातं हे आयुष्यभर टिकणारी मैत्री असते. एकमेकाला भरभरून प्रेम देतात. त्यामुळे आयुष्य सुंदर बनून जातं. कोणावर तरी प्रेम आणि लग्न दुसरीसोबत करण्यापेक्षा लग्न करून त्याच मुलीसोबत/

मुलासोबत प्रेम करा. मला काही मुलींचा खूप राग येतो. काही मुली अशा असतात की, त्या शिकूनही काहीही उपयोग नसणाऱ्या. राग येत असेल, पण खरंच एकदा मनाला प्रश्न टाकून पहा? मी ही एक मुलगी आहे. पण आजूबाजुला घडून गेलेल्या गोष्टी डोळ्यात पाण्याने वाहून जाते. उदा.: एक कुटुंब होतं. खूप प्रेमळ. दोन मुलं, बहीण नाही. आई-वडील होते, असे हे चौघाजणाचं कुटुंब. मुले दोघेपण लग्नाच्या वयाचे झाले होते. आई-वडिलांनी राबराब राबून दोघांना एक व्यवसाय उभा करून दिला. मोठ्या मुलग्याचे लग्न झालं. मुलगी अगदी पदवीधर आणि सुंदर होती. लग्नानंतर १ वर्ष झाले. नवरा फक्त बायकोचं ऐकू लागला. बायको नवऱ्याला म्हणाली की, आपण दोघे दुसरीकडे राहू. तो मुलगा बायकोची गोष्ट ऐकून बिचाऱ्या आई-वडिलांपासून दूर राहिला. सासू वांड आहे, म्हणून काही सुनांची तक्रार असते. पण तिथे आपणच काही तरी चुकलेलो असतो हे लक्षातच घेत नाहीत. सासू-सासऱ्यांना प्रेमळ नात्याने पाहिलं की कुटुंब रंगते. लग्नानंतर आई-वडिलांना कृपा करून सोडून दूर राहू नका. कारण आम्हीही कोणाचे तरी आई-वडील असतो आणि आपलीच मुले आम्हाला सोडून जातात. तेव्हाच तो होणारा त्रास व दुःख आम्हाला कळते. म्हणून विचार करून जीवन जगायला शिकूया. कारण भविष्यात आपण सुद्धा कोणाचे तरी आई-वडील होणारे असतो. मी म्हणते आई-वडिलांना विसरण्यापेक्षा तुम्ही स्वतःलाच विसरून जा, कारण आम्हाला निर्माण करणारेच ते आई-वडील असतात. फक्त आई आहे म्हणून आपण नाही, वडील आहेत म्हणून आपण आहोत.

आपण पाहतो आईबद्दल भरपूर लेखकांनी लेखन लिहिले आहे. आई म्हणजे स्वर्ग, सर्वस्व. मग बाबा म्हणजे काय ? आई या घरात कशी आली ? प्रश्न करा स्वतःच्या मनाला. वाचकांनो एक सांगते. वडील होते म्हणून आई घरात आली. वडील आहेत म्हणून आईचं सौभाग्य आहे. वडील नसतील तर आईचं सौभाग्य नसतं. वडिलांना तुच्छ लेखू नका. मान्य आहे, काहीजणाचे वडील व्यसनी असतात. दारू पिऊन आईसोबत भांडतात. पैशाची उधळपट्टी करतात. पण ते दारू पितात ती त्यांची चूक नाही मित्रांनो, जे लोक दारू विकतात तेच लोक चूक करतात. म्हणून प्रत्येकाचे वडील वाईट असतात असे नाही. वडील भांडतात, दारू पितात असे म्हणालो तर मग चांगल्या वडीलांचे काय ? वडील आम्हाला प्रत्येकवेळी प्रेमाने पाहत असतात. फक्त आम्ही वडिलांना प्रेम दिलं पाहिजे. जेवढं आपण आईला मानतो, तेवढेच वडिलांना माना. वडिलांना पाहून कांही मुलं घाबरतात. खरं सांगते, घाबरू नका. कारण वडील काही तुम्हाला मारणार नाहीत. प्रेमाने राहिल्यानंतर प्रत्येक व्यक्ती प्रेमानेच बोलते. मग वडिलांसोबत सुद्धा तसेच वागूया. तेव्हा आईबाबा या जुळुन झालेल्या एका शब्दाचे कधीच दोन शब्द होणार नाहीत.

काहीजणांना आई किंवा वडील नसतात. पण त्यांनी कधीच दुःखी होऊ नये. कारण त्यांना दुसऱ्यांच्या रुपात तरी आई-वडील मदत करत असतात. काहीजणांचे सासू-सासरे सुद्धा आपल्या सुनेला अगदी आई-वडिलांसारखं प्रेम देतात.

'शब्दात करते वंदन तुम्हाला
आई-वडिलांनो आशीर्वाद द्या आम्हाला.'

मृत्यूबद्दल सांगते, मृत्यू ही गोष्ट सामान्य आहे. मृत्यू कोणाला नाही? मृत्यू तर सगळ्यांनाच आहे. असा कोणीही नाही की, तो मेलेलाच नाही. प्राणी, पक्षी असो किंवा मनुष्य प्रत्येकानाच मरण आहे. जन्माला आला म्हणजे तो मरणाशिवाय राहत नाही. तो कितीही संत असो, विद्वान असो मरण हे दूर नसतं. एकदा ना एकदा मरणार ही गोष्ट माहीत असूनही लोक सुखाने जगत नाहीत. अत्याचार, भ्रष्टाचार, दरोडे करत असतात. ते करून काय सुख मिळणार आहे. आपण जितकं आनंदाने जगू तितकं आपलं जीवन सुंदर बनून जातं. एखाद्या व्यक्तीला रडवणं ही खूप सोपी गोष्ट आहे. काहीक्षणात अपण समोरच्यांना रडवू शकतो. पण हसवणं ही खूप कठीण आहे. हसण्याने आयुष्यात बदल निर्माण होतात. म्हणतात की आनंदी मनुष्य दीर्घायुषी असतो.

'हसत रहा हीच माझ इच्छा
प्रामाणिकपणे राहू हीच आहे अपेक्षा
खूप सुंदर आहे हे जीवन
आनंदाने जगू कारण केव्हाही येईल मरण.'

# पाणी

✍..... कु. देवयानी संभाजी पाटील
(बी.ए..भाग-१)

(काही मैत्रिणी शिक्षणाच्या निमित्ताने बाहेरगावी असतात. सुट्टीला गावी एकत्र येण्याचे ठरवतात. निसर्गाची ओढ त्यांना असल्यामुळेच त्या गावाजवळच्या तलावाजवळ जाण्याचे ठरवतात. तलावाजवळ येताच पाणी आणि परिसर त्यांना वेगळा दिसतो. त्यानंतर त्यांच्यात पाणी आणि तलावासंबंधी संवाद सुरू होतो.)

ज्योती : अरे ! ते तलाव ना राधा किती भरलेलं आहे, किती छान दिसतं लांबून.

राधा : ज्योती इथूनच काय पाहतेस, चला तिथे जाऊया सर्वजण. (सर्वजण तलावाजवळ जातात.)

प्रिया : हेच का ते तलाव जे आपण लांबून पाहिलं होत. तेथून किती सुंदर दिसत होत.



राणी : हो, पण आता जवळ आल्यावर कळतय तलाव किती दुषित झालेला आहे. ते म्हणतात ना 'दुरुन डोंगर साजरे' त्यातलाच हा एक प्रकार.

दिव्या : पण, आपण मागे एकदा इथे आलो होतो, तेव्हा हे तलाव किती स्वच्छ होत. पण आताचं हे दृश्य उलटच आहे.

राधा : दिव्या तेव्हा तलावच काय तर इथला परिसरही स्वच्छ होता, पण आता इथे कचऱ्याचे ढीग दिसत आहेत.

सिया : मला तर राधा असं वाटतंय की, पूर्ण गावचा कचरा इथे टाकला जातोय.

प्रिया : मानव हा स्वतः स्वच्छ राहतोय अन् आपल्या अवतीभोवतीचा परिसरही स्वच्छ ठेवतोय पण कचरा पाण्याच्या ठिकाणी टाकला जातोय. त्याला हे कळत नाही की, आपले जीवन म्हणजे पाणी आहे हे तो अस्वच्छ करतोय. ज्योती हो की नाही ?

ज्योती : प्रिया बरोबर बोललीस. पाणी आपले जीवन आहे. पाण्याशिवाय जीवन शक्यच नाही.

राणी : मानवच नाही तर पाण्याशिवाय कोणताच सजीव जिवंत राहू शकत नाही. मैत्रिणींनो !

दिव्या : पाण्याचा साठाही कमी आहे, त्याकडेही आपण दुर्लक्ष करतो.

सिया : आपण बातम्या पाहिल्याच की, किती तरी भागात दुष्काळ पडलाय. मराठवाडा आणि विदर्भातील लोकांना पाण्यासाठी वनवन फिरावे लागते.

राधा : सिया, एवढे करूनही त्यांना पुरसे पाणी मिळत नाही. बिचारे!

प्रिया : अन् मिळालं तर ते पाणी शुद्ध असेल असे याची खात्री नाही.

सिया : हो. पण ते सुद्धा काहीच करू शकत नाहीत. पाणी नसल्यामुळे जे आणि जसं पाणी मिळतं ते स्वीकारावं लागतं त्यांना.

राणी : पण म्हणून दुसऱ्याला दोष देता येत नाही. कारण, या सर्वाला मानव स्वतः जबाबदार आहे.

ज्योती : पाण्याचे अनेक स्त्रोत दुषित झालेले आहे, अनेक कोरडे पडलेले आहेत.

सिया : अनेक ठिकाणी पाणी आहे, परंतू त्याचा वापर होत नाही, कारण ते दुषित असते.

दिव्या : अनेक ठिकाणेच कशाला सिया, हाच तलाव बघा ना ! किती तरी पाणी आहे.

राधा : हो, पण दुषित झालेलं.

ज्योती : ह्या पाण्याचे शुद्धीकरण करून पाण्याचा वापर करता येतोच ना राधा.

राणी : हो, पण इथं हे कळतंय कोणाला ?

प्रिया : आणि कळलं तरी त्याचा विचार केला जात नाही. कारण प्रत्येक जण असंच म्हणत असतो. मला पुरेसे पाणी मिळतय, मग दुसऱ्यांचा विचार मी का करावा ?

राधा : सगळ्यानीच जर असा विचार केला तर प्रिया आपल्यावर सुद्धा ही वेळ येऊ शकते.

राणी : औद्योगिकरण, वाढती लोकसंख्या, पाण्याचा मर्यादित

साठा, पाण्याचा होणारा अपव्यय यामुळं संपूर्ण जीवसृष्टी धोक्यात येणार आहे एकदिवस.

दिव्या : कारखान्यातून जे सांडपाणी नदीत सोडलं जातं त्यात अनक घातक रसायनं असतात. त्या पाण्याचे शुद्धीकरण न करता जसेच्यातसे नदीत सोडतात, ह्याला काय म्हणावं प्रिंया ? भिती वाटते बुवा.

प्रिया : दिव्या, खरच सजीवाच्या अस्तित्वासाठी शुद्ध व निर्मळ पाणी मिळण्याची गरज आहे.

राधा : हो. याची गरज आहे. परंतु प्रिया मला नाही वाटत, की असं पाणी मिळेल ?

सिया : राधा तुला जे वाटतंय ते खरच आहे. कारण पाणी टंचाई आणि जलप्रदूषण वाढतच चाललय.

ज्योती : माणसानं स्वतःचं अस्तित्व तर धोक्यात घातलेच परंतु त्याच्या बरोबर अनेक प्राण्यांना ह्या संकटाला तोंड द्यावे लागत आहे.

राधा : तर काय ?

दिव्या : मला तर वाटतय संकटांना सामोरेच नाही, तर त्यांना आपला जीव सुद्धा गमवावा लागतो.

राणी : आणि आता ह्या तलावातल्या कितीतरी सजीवांनी आपले प्राण गमावले असतील.

सिया : प्रत्येकाने पाण्याचा हवा तितकाच आणि योग्य वापर केला पाहिजे.

राधा : पाण्याचे प्रदूषण टाळावे. नदी, तलाव, विहीरी हे प्रदूषण मुक्त करणे, स्वच्छ ठेवणे हे आपले कर्तव्य आहे सिया.

प्रिया : पण, राधा खरच आपण हे कर्तव्य कितपत पार पडतोय?

राणी : हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा प्रिया. आपण खरच आपले कर्तव्य पार पाडतोय का ?

सिया : अनेक ठिकाणी आपण पाहिलय की, दवाखान्यातील सलाईनच्या बाटल्या, उपयोगात न आलेली औषधं नदीत सोडली जातात. किती गंभीर ?

दिव्या : त्यामुळे जलचर प्राणी मरतात. प्रदुषण तर आपणच करतो, पण त्याचे परिणाम बाकीच्या प्राण्यांना भोगावे लागतात.

प्रिया : हेच पाणी प्रक्रिया करायच्या आधी प्रत्येकाच्या घरी पोहचतं आणि ते पिऊन अनेक जण आजारी पडतात.

ज्योती : हो, आणि अशा पाण्यामुळे कित्येक जिवघेणे रोग होतात. बाई मला तर भिती वाटते.

राणी : मानवाच्या निरोगी आरोग्यास रोगी बनवण्यासाठी तो स्वतःहून आमंत्रण देत आहे.

दिव्या : खरय, मानव पण किती स्वार्थी होत चाललाय राणी. आपल्या सुख सोयीसाठी त्याने अनेक झाडे तोडली.

प्रिया : आणि झाडे तोडून तो त्या ठिकाणी मोठ-मोठी घर बांधतोय.

सिया : पण त्याला हे का कळत नाही की, तो झाडे तोडून तो किती मोठं संकट ओढावून घेतोय ?

ज्योती : मानवापेक्षा इतर प्राणी, पक्षी श्रेष्ठ वाटतात मला.

राधा : बरोबर बोललीस ज्योती, कारण निसर्गवाढीला त्यांच्याकडून मदतच होते.

राणी : म्हणजे पक्षी फळं खातात आणि त्या ब्रिया जमिनीवर पडल्या की, त्या तिथे रुजतात आणि अनेक झाडे उगवतात.

दिव्या : आपण जर झाडे लावत नाही, तर ती तोडण्याचा अधिकारही आपल्याला नाही.

सिया : पूर्वीची माणसं किती सुखी होती. पाण्याचं प्रदूषण नव्हतं कोणते आजारही नव्हते.

प्रिया : हो. कारण पूर्वी मोठ-मोठे उद्योगधंदे नव्हते, कारखाने नव्हते आणि मग कारखान्यातून निघणाऱ्या सांडपाण्याचा आणि नदीचा संबंधच नव्हता.

राणी : प्रत्येक व्यक्ती ही सुशिक्षित आहे. अनेक नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या गरजा पूर्ण करत आहे.

राधा : राणी, त्याने आपल्या गरजा तर पूर्ण केल्या, पण आपली महत्त्वाची गरज म्हणजे पाणी याकडे मात्र दुर्लक्ष केलं.

राधा : म्हणून पाण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत.

ज्योती : अनेक ठिकाणी तर पाण्याचा अपव्यय केला जातो.

सिया : हेच बघता, अनेकदा आपण उत्सव साजरे करतो. उदा. होळी ह्या सणा दिवशी आपण पाण्याचा किती तरी वापर करतो.

राणी : माझ्या मनातलं बोललीस. मागं मी वर्तमानपत्रात वाचलं होतं की, एका साधूनं रंगाच्या पाण्याचे टँकरच्या टँकर रंगपंचमी सणाला आणले आणि वापरले. ह्याला काय

म्हणावे ?

प्रिया : पाण्याचा वापर न करताही आपण उत्सव साजरे करू शकतो.

राणी : हो सिया त्याचा सगळ्यानी विचार करायला हवा आणि हा विचार कृतीत आणला पाहिजे.

राधा : राणी पूर्वीची लोक सण-उत्सव साजरे करत नव्हते असं नाही, ते करायचे पण मर्यादित.

दिव्या : हो, कारण पाणी हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता.

सिया : पण दिव्या आजच्या पिढीला कळत नाही त्याचं काय?

ज्योती : हो, पण आजची पिढी स्वत:चा आनंद साजरा करण्यासाठी निसर्गातील काही घटकांचा अतिरिक्त वापर करत आहे. चंगळवादाच्या मागे लागली आहे ती.

दिव्या : कारण आजच्या पिढीला आपला आनंद महत्त्वाचा वाटतोय. पण मलाही ते पटत नाही.

राधा : आणि दररोजच्या जीवनात आपण पाण्याचा किती वापर करतो याचा अंदाजही नाही.

ज्योती : म्हणून दररोजच्या जीवनात पाण्याचा योग्य वापर हवा..

सगळे : हो खरच !

राणी : शहरी भागात प्रत्येकाच्या घरी शॉवरचा वापर केला जातो. त्यामुळे किती तरी पाणी वाया जाते.

प्रिया : राणी, काही ठिकाणी फुटलेल्या पाईपलाईन, तुटलेले नळ यामुळेही काही प्रमाणात पाणी वाया जाते.

ज्योती : एवढेच काय तर मोठ-मोठे हॉटेल, इमारती, मोठ्या बागा यामध्ये कारंजे असतात, त्यामुळेही पाणी वाया जाते.

सिया : काही ठिकाणी पाणी पिण्यासाठी सुद्धा मिळत नाही.

राधा : तर काही ठिकाणी पाण्याचा असा अयोग्य रितीने वापर केला जातो.

दिव्या : निसर्गाने आपल्याला विनामोबदला अनेक घटक पुरवले आहेत. निसर्गाचे आपल्यावर किती उपकार ?

प्रिया : पण त्याचा कसाही वापर करत आहोत आपण.

राणी : असंच जर पुढेपर्यंत चालू राहील तर प्रिया निसर्गातील पाणी हा घटक संपुष्टात येईल.

सिया : आणि राणी जर पाणीच नसेल तर पृथ्वीवरील अनेक सजीव सृष्टी नष्ट व्हायला वेळ लागणार नाही. आपण किती वेळा उभे राहून बोलणार.

सिया : माझे पाय खूप दुखाय लागलेत, आपण कुठे तरी बैठक मारुया.

दिव्या : सिया इथे कुठे बसणार ?

राधा : इथे किती कचरा आहे. कचऱ्याचे ढीग पाहतेस ना !

राणी : आणि इथे बसायचं जरी म्हटलं तरी इथे सावलीही नाही राधा.

प्रिया : हो इथली झाडंही तोडून टाकलेली आहेत.

ज्योती : पण खरच पूर्वी जेव्हा आपण इथे आलो होतो तेव्हा इथलं वातावरण किती सुंदर आणि रणमीय होतं. झाडं उभी होती, ते आता काहीही नाही.

सिया : पाण्याची बाटली कुणाकडे आहे, मला तहान खूप लागली आहे. मला पाणी पिऊ द्या !

राधा : सिया मला पण हवय पाणी ! (सिया आणि राधा बाटलीतले पाणी पितात)

ज्योती : पाण्याशिवाय तर आपण एक दिवसही राहू शकत नाही.

दिव्या : एक दिवसच काय पाण्याशिवाय तर आपण तासभर सुद्धा नाही राहत. याचा प्रत्यय येथे आला.

प्रिया : आपल्या जीवनात पाण्याची किती गरज आहे हे कळतंय.

सिया : आता जरा वेगळं सांगते, माणसाला मेल्यावरसुद्धा पाण्याचीच गरज भासते.

ज्योती : ते कसं काय सिया ?

सिया : एखादी व्यक्ती मेल्यानंतर त्याची राख पाण्यातच सोडली जाते ना !

सगळे : हो !

राणी : पण याचा परिणाम जिवंत असलेल्या सजीव प्राण्यावर हातो. पाणी दुषित होतं.

प्रिया : देवधर्माच्या उत्सवाच्या बाबतीत तेच आहे. राधा सांग.

राधा : गणेश चतुर्थीला आपण बप्पाला वाजत-गाजत मिरवत घेऊन येतो.

दिव्या : छोटे गणपती आणि मोठे गणपती पाण्यामध्ये विसर्जन करतो. प्लॅस्टर ऑफ पॅरीसच्या मूर्ती असल्यामुळे त्या पाण्यात विरघळत नाहीत.

सिया : रंगही विषारी असतो.

प्रिया : पण मग पाण्यात विसर्जनाचा अट्टाहास आपण का

करतो?

राणी : गणपती म्हणत नाही की, मला पाण्यात विसर्जन करा.

राधा : राणी त्यापेक्षा मूर्ती आपण दान करू शकतो.

ज्योती : हो, त्यामुळे पाण्याचे प्रदूषणही वाचेल कारण मूर्ती बनविण्यासाठी घातक रंग वापरले जातात. त्यामुळे पाणी प्रदूषित होतं.

दिव्या : त्यामुळे अनेक जलचर प्राणी आपला जीव गमावतात ज्योती, असं माझं मत आहे.

राधा : आणि पाण्याच्या ठिकाणी अनेक धार्मिक कार्ये पार पाडली जातात. त्यासाठी लागणारे हार, फुलं, पानं नंतर आपण पाण्यातच टाकतो.

प्रिया : आणि ते पुढे जाऊन कुठेतरी अडकत आणि ते तिथेच कुजत आणि पाणी प्रदुषणाला आणखीनच हातभार लागतो. हो का नाही ?

सिया : तुम्हाला माहितेय पूर्वीची माणसं आपल्या येणाऱ्या पिढीसाठी फळांची झाडे लावायचे.

राणी : हो.

सिया : पण आताची परिस्थिती पाहता असं वाटतंय सिया आपण आपल्या येणाऱ्या पिढीसाठी दुषित पाणी देतोय.

ज्योती : लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सगळ्यांनीच वर्षातून कमीत-कमी ३-४ झाडे लागवली पाहिजेत.

राधा : तरच आपली वसुंधरा टिकून राहील.

दिव्या : वृक्षतोडीमुळे अनेक ठिकाणी दुष्काळ पडला आहे.

प्रिया : वृक्ष लागवड केली तर पावसाचे प्रमाण वाढेल आणि जास्तीतजास्त पाण्याचे प्रमाण वाढेल, हे असे अभ्यासपूर्वक मत मांडते.

ज्योती : सांडपाण्याचा योग्य निचरा केला पाहिजे. कचरा टाकून नद्या प्रदुषित करू नये.

राधा : आपल्या परिसरातील नद्या, तलाव, नाले स्वच्छ रहावे यासाठी सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचे शुद्धीकरण करून नदीमध्ये सोडले पाहिजे.

राणी : पावसाच्या पाण्याचे साठवण करून उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा वापर करायला हवा.

प्रिया : दररोजच्या जीवनातील पाण्याचा वापर योग्य प्रमाणात करायला हवा हे सर्वांनी ठरवायला हवे.

सिया : म्हणजे पाण्याचे नियोजन प्रत्येकानेच केले तर पाणी टंचाईचा प्रश्न सुटेल.

राधा : हे बघ, छोट्या-छोट्या गोष्टींची दक्षता जर आपण घेतली तर ही गोष्ट अशक्य नाही.

दिव्या : या सगळ्याचा प्रत्येकाने गांभीर्याने विचार केला पाहिजे राधा, तर फायदा.

प्रिया : याची सुरवात स्वत:पासून केली पाहिजे दिव्या.

सिया : प्रिया, आपल्या खूप चर्चा व्हायला लागलेत.

दिव्या : तसं नव्हे, पाणी म्हणजे जीवन आहे. म्हणूनच आपण बोलतोय.

राणी : दिव्या, खूप वेळ झाला आहे, आपल्याला जायला हवं, निघायचं ?

प्रिया : माझा काय येथून पाय निघेना !

राणी : तू थांब इथेच.

प्रिया : एकटी ? नाही बाबा !

प्रिया : चला ठीक आहे. तलावावर येण्याच्या निमित्ताने आपण खूप बोललो.

राणी : मज्जा आली.

सिया : कसली मजा ! पाण्याची वाईट अवस्था दिसली.

प्रिया : लोक शहाणे होतील, सिया.

राणी : मलाही तसेच वाटते.

राधा : बरोबर आहे, चला आता. घरातली मंडळी आपली वाट बघत असतील.

सिया : पण निघण्यापूर्वी आपण एक शपथ घ्यायची.

राधा : कोणती ?

सिया : आपण सर्वांनी पाण्याचं जतन करायचं.

राधा : हो ठीक आहे. मान्य.

प्रिया : मीही शपथ घेते. पाणी दूषित करणार नाही.

राधा : पाण्यात मीही काही टाकणार नाही अशी शपथ घेते.

सिया : मीही शपथ घेते की, माझ्या शेजारी पाजाऱ्यांना पाण्याचे महत्त्व सांगेन. पाणी जपून वापरण्यास सांगेन.

दिव्या : मीही पाण्यात कोणालाही कचरा टाकून देणार नाही.

राधा : चला आता जाऊया !

(राधा, सिया, प्रिया, दिव्या ह्या मैत्रिणी घराकडे जाण्यासाठी वळल्या पाठीमागे तलाव मात्र आनंदी होता. गालातल्या गालात हसत होता, आपल्याला चांगले दिवस येतील म्हणूनच तो आनंदी होता.)

# स्पर्धा परीक्षा : काळाची गरज

✍..... कु. अश्विनी अरविंद पोवार

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे, त्याच्याही पुढे जाऊन मी म्हणेन, प्रत्येक क्षेत्रातील मुले-मुली स्पर्धा परीक्षेकडे वळत आहेत, ही आनंददायक बाब आहे. पण मला वाटते, स्पर्धा परीक्षा ही काळाची गरज ठरलेली आहे. स्पर्धा परीक्षा म्हटले की, MPSC / UPSC, बँकिंग क्षेत्रातील विविध पदांसाठी स्पर्धा घेतली जाते. MPSC म्हटले तर त्यामध्ये तलाठी, ग्रामसेवक पासून ते DC पर्यंत त्याच्या पायऱ्या आपल्याला चढायला लागतात. UPSC मध्ये IAS / IPS / IFS / IRS अशा विविध प्रकारची पदे त्यात असतात. तसेच बँकिंग क्षेत्रामध्य PO पासून ते Clerck पर्यंत इ. पदाचा समावेश असतो.



सध्या प्रत्येक विद्यार्थी हा स्वतःचा आत्मविश्वास, जिद्द व एक ध्यास मनात बाळगून स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाकडे विद्यार्थ्यांचा कल असलेला पहायला मिळतो. MPSC-UPSC व बँकिंग क्षेत्राकडे आपल्याला जायचे असेल तर प्रथम आपल्याला अभ्यासासाठी वेळेचे नियोजन करणे अत्यंत गरजेच आहे. आपल्याला कोणत्याही क्षेत्रात प्राविण्य मिळवायचे असेल तर प्रथम वेळेला व अभ्यासाला महत्त्व दिले पाहिजे. MPSC चा अभ्यास करायचा असेल तर प्रथम आपल्याला Basic पुस्तकांचा अभ्यास केला पाहिजे. तसेच दर महिन्याचे मासिक, दररोजची वृत्तपत्रे वाचणे गरजेचे आहे. वृत्तपत्रामध्ये लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ, Times of India इ. वाचणे गरजेचे आहे.

प्रत्येकजण समाजात आपली एक चांगल छाप उमटण्यासाठी चांगल्या शिक्षणाकडे वळत आहे. गरिबातील गरीब मुलगा सुद्धा बाहेरुन का असेना आपले पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करत आहेत. पण सगळ्यात मोठा प्रश्न आज युवक व युवतीच्या समोर हा आहे की, आज शिक्षण पूर्ण असून पण त्या शिक्षणाला अनुसरुन रोजगार नाही. रोजगार आहेत, पण कायमच्या नोकरीची हमी नाही. चांगल्या शिक्षणासाठी चांगले पैसे मोजावे लागत आहेत, तरीसुद्धा रोजगार नाही, अशी स्थिति आज झाली आहे. यासाठी आज एकच पर्याय डोळ्यासमोर आहे, तो स्पर्धा परीक्षा. (नेटके नियोजन) वेळेचा योग्य दुरुपयोग जिद्द, चिकाटी व आत्मविश्वास या जोरावर आपण स्पर्धा परीक्षेची तयारी करून समाजात एक सन्माभिमूख व्यक्ती बनू शकतो.

ब्रिटीश काळातील ICS नंतरच्या IAS / IPS / IRS तसेच केंद्रीय सेवा, इंजिनिअरिंग सेवा, मेडिकल सेवा, आर्थिक सेवा, संरक्षण सेवा इ. केंद्रशासन सेवेत अधिकारी होण्यासाठी संघ लोकसेवा आयोग व राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांकरिता १९३५ चा 'Government Act of India Act' प्रोव्हिशल सिव्हिल सर्व्हिसे सिलेक्शन बोर्ड व भारतातील व भारतीय राज्यघटनेचा अंमल सुरु झाल्यावर राज्य लोकसेवा आयोगामार्फत अधिकाऱ्याची निवड केले जाते.

१९६२ साली काही शेकडो उमेदवारांत होणारी स्पर्धा आज लाखात पोहचली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दरवर्षी ४० ते ५० प्रकारच्या पदांकरिता स्पर्धा परीक्षा होतात. त्यासाठी दरसाल सरासरी ५००० उमेदवारांची निवड केली जाते. परीक्षेला बसणारे एकूण उमेदवार असतात. सरासरी १५ लाखांपेक्षा एका पदाकरिता ३०० उमेदवारामध्ये स्पर्धा होते. परंतु १५ लाखांपैकी ५००० उमेदवारांची निवड होणे याचा अर्थ उर्वरित १४ लाख ९५ हजार उमेदवार नापास झाले असा होत नाही. ते शासकीय सेवेत अधिकारी होण्यास लायक होत नाहीत असे नाही. वस्तुतः स्पर्धा परीक्षेत पास किंवा नापास ही संज्ञा लागू नाही. त्यामुळे यशप्राप्तीसाठी प्रयत्नांची शिकस्त करतानाच आणि वारंवार प्रयत्न

करूनही यशस्वी न झाल्यास स्वत:ला अकार्यक्षम क्षेत्रासाठी लायक नाही, असा न्यूनगंड मनात बाळगण्याचे कारण नाही.

उदा. जर एखादा मुलगा गावातून फिरताना दिसला तर त्याचा वडिलांना लोक म्हणतात की, यांचा मुलगा गावातून फिरतो, पण तो ज्यावेळी पोलिस उपअधिक्षक बनेल त्यावेळी लोक त्यांच्या वडिलांना लोक म्हणतात की यांचा मुलगा गावातून फिरतो, पण तो ज्यावेळी पोलिस उपअधिक्षक बनेल त्यावेळी लोक त्यांच्या वडिलांना म्हणतील तेच साहेबांच वडील चाललेत अशी ओळख निर्माण करण्याची संधी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून अनुभवता येते.

काहीही असो या सवयीच्या मागे एक महत्त्वाचे कारण म्हणज या पदांचे वलय, असलेले अधिकार आणि समाजात मिळणारा मानसन्मान.

अभ्यास सुरु केल्यापासून स्वप्नपूर्ती होईपर्यंत विद्यार्थीदशेच्या तीन अवस्था :

अ) अभ्यास सुरु केल्याचा प्राथमिक अवस्थेत केवळ उत्साह असतो आता परीक्षेचा Form भरला ही लगेचच पद मिळेल असे वाटते.

ब) दुसऱ्या अवस्थेत या क्षेत्रातील काही अडीअडचणी उदा. अनिश्चितता, निवडीसाठी लागणारा वेळ इ. ची जाणीव झाल्यास पहिल्या अवस्थेतील आनंदात आणखी एक घटक समावेश होतो तो म्हणजे सजगता, म्हणजेच 'जोश के साथ साथ होश.'

क) तिसऱ्या आणि अंतिम अवस्थेत या क्षेत्रातची परिपूर्ण महिती झालेली असतो. पूर्ण झालेल्या अभ्यासाचा मनात उत्सव चालू असतो आणि डोळे मात्र 'अधिकारी' पदाच्या स्वप्नपूतीची वाट पाहत असतात. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्याची इच्छा मनात जागृत झाल्यावर, अभ्यासाचे नियोजन, अभ्यास साहित्याचा वापर, काय करावे ? काय नाही ? या खाच खळग्यांची जाणीव, मुलाखतीसह पूर्व, मुख्य परीक्षेची व्यूहरचना या बाबी यातील प्रमुख आहेत.

माझ्या मते स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गरजा तीन प्रकारच्या - १) अभ्यासासाठी बसायला जागा २)वाचन करण्यासाठी पुस्तके ३) योग्य मार्गदर्शन

अभ्यास करायच ठरल्यावर काही दिवस शांत रहा. अभ्यासात अडथळत्त आपणणाऱ्या घटकांची यादी करा, तुमचा जनसंपर्क, मित्रमंडळी, सकाळी खूप उशिरापर्यंत झोपण्यासाठी भाग पाडणारा आळस, Facebook, Whatsapp ही साधने या सर्वांवर खर्च पाडणारा वेळ नको ते विचार Fixed mindest, Timepass, प्रेम करण्यामध्ये आयुष्याचा जाणारा अमूल्य वेळ, त्यामुळे डोक्यात होणाऱ्या विचारांची खिचडी इ. घटक यादीत प्राधान्याने स्थान द्या.

स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना वेड होऊन अभ्यास करण्याची एक संकल्पना आहे. उठता, बसता, झोपता, चालता, फिरता, आपले ध्येय कायम डोळ्यापुढे असले पाहिजे यावरून कधीही लक्ष्य विचलित होऊ देऊ नका पण याचा अर्थ असा नाही सारखे पुस्तकात तोंड खुपसून बसायचे. टेंशन घ्यायचे, कोणाशी बोलायचे नाही.

उदा. : ज्याप्रमाणे अर्जुनाला पक्ष्याचा डोळा दिसत होता त्याप्रमाणे तुम्हाला पद दिसल पाहिजे. केवळ मजा म्हणून अभ्यास न करता त्याकडे गांभीर्याने पाहत त्यांचा आनंदा ही घेतला पाहिजे.

१. दर्जेदार पुस्तकांचे वाचन, २. ताणतणाव व्यवस्थापन, ३. उदार दृष्टीकोनाचा गट, ४. 24 x 7 वाचन, ५. अभ्यास टार्गेट, परीक्षा नाही, ६. सामाजिक दबावाकडे दुर्लक्ष, ७. अभ्यासाची पद्धत, ८.अभ्यासाचा आनंदी उत्सव.

मी फक्त एवढेच म्हणालो की, तुम्ही खूपच early expectations नका. व्यवस्थित अभ्यास करा. अभ्यास Focus करा, पद नाही. तुम्हाला चांगले यश हवे असेल तर वेळही द्यावा लागेल आणि भरपूर कष्टही करावे लागतील. एकदा Dy Collector, Dy S.P. झाल्यावर कोणी नाही विचारत की, आपण attepts किती दिले. स्पर्धा परीक्षेची तुमची अभ्यासरुपी इमारत शांत चित्ताने अपेक्षाचं ओझं न घेता बांधून काढा. 'झालेच पाहिजे' हा शब्द तुमच्या मनातून काढून तर टाकाच पण कुटुंबातील इतर सदरस्यांशीही मनमोकळेपणाने या विषयावर चर्चा करा. या सगळ्या दडपणातून बाहेर पडा, मग बघा अभ्यास बसा बहरतो

तो. Celebrating Study ही अवस्था अगदी सहज येईल. भरपूर अभ्यास होईल.

'मला वेड लागले प्रेमाचे...' असे आकाशाकडे बघून, हात पसरवून, पावसात भिजत म्हणायला प्रत्येकालाच आवडते. पण ही आवड गांभीर्यात आणि गांभीर्य दु:खात कधी बदलते ते भल्याभल्यांना शेवटपर्यंत कळत नाही. बऱ्याच जणांना न आवडणारा पण अगदी जिव्हाळ्याचा सल्ला म्हणज अभ्यासाच्या प्रक्रियेत अशा प्रेम प्रकरणांपासून दूरच राहा. काहीच साध्य होत नाही यातून आयुष्यातील उमेदीची काही वर्षे यात निघून गली की Tension ची छाया परत गडद व्हायला लागते. काय करावं काही सुचत नाही. काही अपवाद असतील ही पण, प्रेम व पद हे दोन घटक एकत्र प्रवास करणे जरा अवघडच आहे. अभ्यासासाठी मन शांत हवे असते.

स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना आपल्याला चौफेर पद्धतीने अभ्यास करणे गरजेचे आहे. त्याम्धये प्रत्येक घटकांकडे आपल्याला लक्षपूर्वक प्रत्येक विचार आपल्या उपयोगी पडत असतील तर ते पटकन आपण एका वहींमध्ये लिहून ठेवले पाहिजे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना कोणतेही शॉर्टकट न मारता आपण कसून अभ्यास करणे गरजेचे आहे, म्हणून हे एक प्रसिद्ध वाक्य- "There is no shortcut to success." मनातील भीती, आळस, एखाद्या विषयाकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती या सगळ्या बाबी बाजूला ठेवून अवघड वाटणाऱ्या विषयांची दर्जेदार पुस्तके वाचून अभ्यास करणे गरजचे आहे. जो विषय खूप अवघड वाटतो तोच विषय आनंदाने, मौजमजेने हाताळला तर आपल्याला खूप सोपा वाटतो.

अभ्यास करताना प्रथम आपण एक-दोन वेळा शांतपणाने वाचन करून मग तिसऱ्या वाचनानंतर स्वत: वाचन करत आपल्याला ज्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात त्या गोष्टी आपण एका वहीमध्ये नोट्सच्या रुपाने काढून ठेवल्या तर आपल्या Exam च्या वेळी जाताना देखील त्या डोळ्याखालून घालवता येतात. दुसऱ्याच्या नोट्स न वापरता स्वत: प्रयत्न करून व आपल्या अनुभवातून नोट्स काढणे अत्यंत उत्तम आहे.

जर राज्यसेवा मुख्य परीक्षेचा अभ्यास केला तर त्यातून आपल्यला बहुतांशी इतर सर्व परीक्षेचा अभ्यास होतो. त्यामध्ये आधुनिक भारताचा इतिहास, महाराष्ट्र व भारताचा भूगोल, अर्थशास्त्र, विज्ञान-तंत्रज्ञान, भारतीय राज्यव्यवस्था इ. अनेक विषय अनेक परीक्षांना आपल्याला अनुभवता येतात. कोणत्याही परीक्षेत केवळ काही भाग वेगळा असतो. या वेगळ्या अभ्यासक्रमासाठी दररोज साधारणत: दोन तासांचा वेळ दिल्यास अनेक परीक्षा सहज देता येईल. त्यासुद्धा एका समान अभ्यासाच्या पायावर.

आपण आठवड्यातील एक दिवस पेपर व मासिके वाचण्यासाठी वेळदेणे गरजेचे आहे. सकाळ, लोकसत्ता, लोकमत, महाराष्ट्र टाईम्स इ. पेपर दर रविवारच्या पुरवणीसह वाचणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी पेपरमधील नोट्स काढण्याकरीता एक वेगळी वही करून आपण त्यात वेगवेगळ्या घटकांसाठी थोडे थोड भाग करून त्या त्या माहितीचे आपण त्या त्या घटकात त लिहून ठेवले, तर आपल्याला अभ्यास करताना कंटाळवाणे वाटले तर ते वहीमधील नोट्स वाचले तरी आपल्याला त्या गोष्टी लक्षात राहतात. पेपर मधील नोट्स काढताना विषयाची पार्श्वभूमली, संकल्पना, वैशिष्ट्ये, फायदे, तोटे, सद्यस्थिती या घटकांवर भर देता येते. या सर्वांचा फायदा पूर्व, मुख्य व मुलाखतीसाठी उपयुक्त पडते. 'आयुष्यातील सर्वात मोठा आनंद म्हणज जे तुम्हाला जमणार नाही ते साध्य करून दाखवणे' नवीन विद्यार्थी गोंधळात पडतो की नेमके काय वाचायचे ? गोंधळून जाण्याची गरज नाही. अभ्यासात सातत्य ठेवल्यास नक्की आपणास यश मिळते.

मुख्य परीक्षेचा अभ्यास करताना आपण प्रत्येक रविवार



हा मराठी व इंग्रजासाठी द्यावा. आपण थोडा वेळ दिला, तर भरपूर गुण देणारे हे विषय आहेत. काही निबंध, अर्ज, पत्र इ. लिहिण्याचा सराव केला पाहिजे. व्याकरण तसेच मराठी व इंग्रजी प्रश्नपत्रिका सोडवून त्यातील उताऱ्यातील प्रश्नोत्तराचा सराव केला पाहिजे. तसेच सरावामुळे CSAT ची तयारी होऊन जाते.

अभ्यासाचे योग्य नियोजन, त्यासाठीची स्वयंशिस्त, अपेक्षांचे ओझे न घेता केलेला अभ्यास या घटकांमुळे आपण यशाच्या अधिकाधिक जवळ जातो. जरी आज Prelims चा पेपर कोणाला अवघड गेला असेल ती एका Attempt वरुन आपले भवितव्य ठरू शकत नाही, ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. स्पर्धा परीक्षेत एकमेव गोष्ट आपल्या हातात आहे, ती म्हणजे प्रयत्न : प्रयत्नातील सातत्याने, अडीअडचणींना न जुमानता अभ्यास करून यशाला गवसणी घातली पाहिजे. जोपर्यंत तुम्ही ध्येयापर्यंत पोहोचतनाही, तोपर्यंत थांबू नका. मनाला सतत एक गोष्ट सांगत राहा, 'पद मिळाले की सगळं बदलेल.' त्यासाठी आपल्याला कायम अभ्यासात राहणे गरजेचे आहे.

१. कमी पण दर्जेदार पुस्तकांचा वापर करणे. २. अनेक पुस्तके एकदा वाचण्याऐवजी एक पुस्तक अनेकदा वाचणे उत्तम. ३. समजून घेऊन विषयांचा अभ्यास करा. ४. सगळे विषय एकदा सुरु न करता ठराविक विषयांना भरपूर वेळ द्या. कारण यामुळे विषयासाठी आपली मन:स्थिती तयार होण्याला मदत होते, तसेच केलेला अभ्यास लक्षात राहतो. लगेचच सर्वच अभ्यास लक्षात राहणार नाही, त्याला थोडा वेळ जावा लागेल, कोणत्याही अपरिचीत क्षेत्राचा परिचय होण्यासाठी वेळ जावा लागतो. त्यामुळे लगेचच आठवून पाहू नका. स्वत:ची परीक्षा घेवू नका. अभ्यासात सातत्य ठेवा. You just stick to wicket, runs will come automatically. अधिकारी व्हायला निघालात ना तर अधिकाऱ्यासारखे वागा. इतरांचा अभ्यास बघून, त्यांच्या Performance शी स्वत:ची तुलन करून काही फायदा होणार नाही. त्यामुळे स्वत:सोबत रहा.

**अभ्यासासाठी केली जाणारी प्रसिद्धी :**

स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरु केल्यावर आपल्याकडून नकळत म्हणा किंवा आनंदाच्या भरात म्हणा झालेली चूक म्हणजे 'मी MPSC चा अभ्यास करतोय' ही बाब लोकांना सांगणे होय. यामुळे आपल्याला समाजात, पाहुणेमंडळीत भरपूर मानसन्मान मिळतो. जाहिरात निघून Form सुद्धा भरलेला नसतो. पण लाक हा अधिकारी झाल्याची चर्चा करतात. या सगळ्या बाबींमुळे अभ्यास सुरु केल्याच्या पहिल्या काळात Social Infuence खूप वाढतो. लोक मानसन्मान देतात. शेवटी समाजात मानसन्मान कोणाला नको असतो ? पण काळजीपूर्वक लक्षात घ्या हे सगळे म्हणजे नजीकच्या भविष्यात Tension च्या एका भल्या मोठ्या चक्रीवादळाला आमंत्रण असते. स्पर्धा परीक्षेच्या क्षेत्रात काहीजणांना लवकर यश मिळते तर अनेकांना उशीर लागतो. यात आपल्या हाती काहीही नसते. उशीर लागण्याच्या प्रक्रियेत विद्यार्थी अडकला की सुरवातीच्या काळात मानसन्मान देणारे हे लोक त्याच्या डोक्याचा एकदम फ्राय करतात. आणखी किती दिवस अभ्यास करणार ? अधिकारी कधी होणार ? तुला जमत नसेल तर सोडून दे, तुझ्यासोबतचे सगळे नोकरीला लागले, तू कधी लागायचा ? अस एक ना अनेक प्रश्न विचारतात. मुलांच्या बाबतीत तर एक मजशीरच बाब असते. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरु केल्यावर अनेक पाहुणेमंडळी लक्ष ठेवून असतात. हा अधिकारी होणार आणि माझी मुलगी यालाच देणार, अस सगळीकडे सांगत फिरतात. पण स्पर्धा परीक्षेत यश मिळविण्यासाठी विद्यर्थ्याला उशीर झाला तर मुलगी द्यायची तर गोष्ट सोडा, तिच्या लग्नाची पत्रिकसुद्धा त्याला देत नाहीत. 'गुरुडाइतके उडायला येत नाही म्हणून चिमणी कधी उडायचं सोडून देत नाही.'

तुम्ही सतत चौफेर नजरेने अभ्यास कला तर यश ह आपल्याच हातात आहे. जसे गरुड स्वत:च्या अन्नासाठी एक नजर ठेवून भक्ष्याला आपल्या पायाच्या नखेत घट्ट पकडून ता उंच भरारी घेतो तसच आपण देखील ठरवलेल्या ध्येयावर व पदावर नजर ठेवून त्या गुरुडाप्रमाणे उंच भरारी मारण्याचे सातत्य आपल्या अंगी बिंबवले तर नक्की यशाची पायरी आपल्याला काढता येते.

आपण एक अधिकारी होऊन समाजातील अडीअडचणी, तसेच अन्य गोष्टीमध्ये समावेश करून स्वत:ची एक वेगळीच ओळख समाजात दाखवली पाहिजे. पूर्व परीक्षेचा अभ्यास करताना आपण एक Timetable अ Timetable तयार करून

अभ्यासाला सुरवात केली पाहिजे.

वेळ

| सकाळी ८ ते १२ | दुपारी २ ते ६ | रात्री ९ ते ११ |
|---|---|---|
| आधुनिक भारताचा इतिहास | भूगोल व कृषी | भारतीय राज्यघटना आणि भारतीय राजकारण |
| अर्थव्यवस्था | विज्ञान व तंत्रज्ञान | भारतीय राज्यघटना आणि भारतीय राजकारण |
| मानवी हक्क | मानवी साधन संपत्ती विकास | भारतीय राज्यघटना आणि भारतीय राजकारण |

तसेच १२ त २ दोन तास पेपर वाचन आणि थोडी झोप घेणे आवश्यक.

प्रत्येक विद्यार्थ्यांचे Timetable वेगवेगळे असतात. प्रत्येकजण आपल्या वेळेनुसार अभ्यासाला चालना देत असतो. पूर्व परीक्षा अभ्यास करत असताना आपण अगोदरच्या प्रश्नपत्रिका अभ्यासणे गरजेचे आहे.

✲ पूर्व परीक्षा

✲ पेपर क्र.१ - सामान्य क्षमता चाचणी (१०० प्रश्न)-गुण २००

✲ पद्धत - वस्तूनिष्ठ/बहुपर्यायी ३:१ निगेटिव्ह चाळणी परीक्षा

✲ विषय - चालू घडामोडी - राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय, भारताचा इतिहास : विशेषत: महाराष्ट्राचा व भारतीय राष्ट्रीय चळवळ, महाराष्ट्र, भारत आणि जगाचा भूगोल- भौतिक, सामाजिक, आर्थिक- राज्यघटना, राजकीय व्यवस्था, पंचायतराज, नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक धोरण, अधिकार व हक्क आर्थिक व सामाजक विकास- दारिद्र्य लोकसंख्या, शिक्षण, सामाजिक क्षेत्रातील महत्त्वाचे धोरण, पर्यावरणीय मुद्दे, जैवविविधता व वातावरण बदल याबाबतचे सामान्यज्ञान.

✲ पेपर क्र. २ - (८० प्रश्न) - गुण २००

✲ विषय - आकलन शक्ती, आंतरव्यक्ती कौशल्य व संवाद कौशल्य, विश्लेषणात्मक व तार्किक बुद्धीमत्ता चाचणी, निर्णय क्षमतेशी संबंधित व समस्या निवारणात्मक मुद्दे, गणिते, बद्धीमत्ता चाचणी, सामान्य अंकगणित, माहिती विश्लेषण (आलेख व टेबल नकाशे) मराठी व इंग्रजी आकलन कौशल्य

✲ मुख्य परीक्षा - मराठी,इंग्रजीचे २ पेपर व सामान्य अध्ययनचे ४ पेपर

✲ पेपर क्र. १ - मराठी-इंग्रजी - गुण ५०

✲ पद्धत - वर्णनात्मक पारंपारिक दर्जा-१२ वी

✲ विषय - मराठी - निबंध लेखन - दोनपैकी १ विषयावर सुमारे ४०० शब्द भाषांतर इंग्रजी उताऱ्याचे मराठी भाषांतर, सुमारे अर्धपान / २ परिच्छेद सारांश लेखन

✲ पेपर क्र.२ - मराठी-इंग्रजी

✲ पद्धत - वस्तुनिष्ठ/बहुपर्यायी पेपर दर्जा-पदवी

✲ विषय - 1. Essay writing 2. Translation
3. Paragraphs 4. Precies writing

✲ गुण - ५०

✲ विषय - मराठी - व्याकरण, म्हणी, वाक्प्रचार, समानार्थी/ विरुद्धार्ती शब्द, शुद्धलेखन/विरामचिन्हे

✲ विषय - Grammar - Idioms, Synonyms/ Antonyms, Correct of the words and sentences, punctuations etc. and comprehension.

✲ पेपर क्र. ४ - सामान्य अध्ययन

✲ पद्धत - वस्तूनिष्ठ/बहुपर्यायी पेपर - दर्जा - पदवी

✲ विषय - इतिहास, भूगोल, कृषी

✲ गुण - १५०

✲ पेपर क्र. २ - सा. अ.

✲ विषय - भारतीय राज्यघटना आणि राजकारण आणि कायदा (महाराष्ट्र स्पेशल रेफरन्स)

✲ गुण - १५०

✲ पेपर क्र. ३ - सा. अ.

✲ मानव संसाधन विकास आणि मानवाधिकार

✲ गुण - १५०

✲ पेपर क्र. ४ - सा. अ.

✲ अर्थव्यवस्था व नियोजन - विकास विषयक आणि कृषी अर्थशास्त्र, विज्ञान तंत्रज्ञान विकास

✲ गुण - १५०

✲ मुलाखत

✲ साधारणतः १५ ते ३५ मिनिटे दरम्यान

✲ विषय - बायोडाटा, पदवी, पदासंदर्भात माहिती, चालू घडामोडी-उमेदवार व दिलेले पदांचे संदर्भ याबाबत प्रश्न, जिल्हा, प्लस पॉईंट, अनुभव असल्यास, शासकीय योजना.

संदर्भ पुस्तके -

१. चालू घडामोडी : परिक्रमा, बुलेटिन, चाणक्य स्टडी, सर्कल, लोकराज्य, योजना, CSR-GK, दै. सकाळचे चालू घडामोडी व वार्षिक

पुस्तके - देवा जाधवर, सानप, कल्पवृक्ष, भराटे, दत्ता सांगोलकर, लक्षवेध इ.

२. राज्यशास्त्र : कोळंबे, घांग्रेकर, व्ही. बी. पाटील, तुकाराम जाधव, डी.डी. बसू, लक्ष्मीकांत, खंदारे, सुभाष कश्यप इ.

३. इतिहास : कठारे, गाठाळ, सातभाई, पवार, कोळंबी, बिपीनचंद्र, सुमन वैद्य, अकरावी इतिहास इ. व ग्रोवर.

४. भूगोल - स्वंदी, खतीब, घारपुरे, अक्षरगंगा, युनिक, ज्ञानदीप, खुल्लर, दीपस्तंभ इ.

५. अर्थशास्त्र : कोळंबी, देसले, मगर, देसाई-भालेराव, शासनाच्या आर्थिक पाहण्या, संदर्भसाठी प्रतियोगिता अर्थशास्त्र विशेषांक, दत्त सुंदरम इ.

६. सामान्य विज्ञान - ज्ञानदीप, गोरे, लुसेट, साकेत, के. सागर, मॅग्राहिल इ.

७. बुद्धीमान चाचणी व अंकगणित : दांडेकर, अकलगी, वसे, राणे, सानप, जी किरण, अजय चव्हाण, कोकिळा, सुजित पवार, दीपस्तंभ, मोकलीकर इ.

८. मानवी हक्क : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या नोट्स

९. मानव संसाधन विकास : अमोल घोडके, योजना, कुरुक्षेत्र, लोकराज्य इ.

१०. पर्यावरण परिस्थितिकी : डॉ. तुषार घोरपडे

११. मराठी : आकाश लेगडे, के. सागर, वाळिंबे, नवजीत, भागवत, झांबरे इ.

१२. इंग्रजी : पाल-सुरी, रे मार्टिन, बाळासाहेब शिंदे, कुलकर्णी, मोहन प्रसाद इ.

संधीला योग्य तयारीची जोड दिल्यास प्रगती नक्की होते. आपल्याला कोणतीही गोष्ट करण्यासाठी अथवा मिळवण्यासाठी तीन घटक गरजेचे असतात. मेहनत, चिकाटी, व्यवहारज्ञान.

जर तुम्हाला सूर्यासारखे चमकायचे असेल तर त्याच्यासारखे प्रज्वलित व्हायला शिका. विद्यार्थ्यांनी स्वतःला अभ्यासाबाबतीत एवढं तयार करावं की पद त्याच्याकडे चालत यावे.

''खुदी को कर बुलंद इतना
की हर तकदीर लिखने से पहले
खुदा बंदे से पूछे की
बता तेरी रजा क्या है।''

Tension घेऊन अजिबात अभ्यास करायचं नाही, काण केवळ एखादी परीक्षा म्हणजे आपल्या आयुष्याचे सर्वकाही नाही. सराव चाचण्या देणे अत्यंत गरजेचे आहे. सराव चाचण्या देण्याचा उद्देश हा स्वतःचे ज्ञान तपासणे हा नसून time and stress management पाहिजे. Practice makes man / woman pefect.

एखादा सराव पेपर असल्यस खूष होऊ नये किंवा चाकोरी बाहेरचा अथवा अवघड असल्यास आत्मविश्वास ढळू देऊ नये. परीक्षेच्या शेवटच्या दिवशी Revision करणे अत्यंत गरजेचे आहे. Revision का करावे ? आत्मविश्वास कायम राहण्यासाठी Revision कशातून करावे ? अगोदर वापरलेली पुस्तके व नोट्समधून.

व्यवस्थित Revision झाल्यावर वेळ उपलब्ध असेल तर नवीन study material वापरावे. अन्यथा अजिबात नाही. Revision is must.

# आनंद यादव यांचे कथा साहित्य

✍..... कु. महादेवी विजय पोवळ
(एम.ए.,भाग-१)

**※ बालपण व जडणघडण :**

यादव यांचे बालपण कोल्हापूर जिल्ह्यातील कागल या खेडेगावात एका गरीब शेतमजुराच्या कुटुंबात गेले. त्यांचे पूर्वज कर्नाटक प्रांतातून महाराष्ट्र आले व कागल येथे स्थायिक झाले. जकात वसुलीचे काम करत असल्यामुळे त्यांना 'जकाते' हा पडनाव मिळाले होते. आनंद यादव हे देखील सुरुवातीला आपले नाव 'आनंद रत्नाप्पा जकाते' असेच लिहीत. पण पुढे रत्नागिरी येथे कॉलेजमध्ये शिकत असताना 'प्राचार्य' भावे यांच्या ओळखीने पु. ल. देशपांडे यांच्याशी आनंदाचा परिचय घडून आला. पु. ल. देशपांडे यांच्याच सांगण्यावरून आनंदाने जकाते हे पडनाव टाकून 'यादव' हे मूळचे आडनाव धारण केले. तसेच 'आनंदाचे' 'आनंद' व 'रत्नाप्पा' या कानडी वळणाच्या नावाचे 'रतन' हे मराठीकरण कले व 'आनंद रत्नाप्पा जकाते' चा 'आनंद रतन यादव' झाला.



एस. एस. सी. पर्यंतचे शिक्षण कागलमध्येच पूर्ण कले. आनंदा सकाळी मळ्यात काम करी. घाईघाईत हातपाय न धुता, चिखलाने लडबडलेल्या हातापायांनी, जेवणात वेळ न दवडता, उपाशीपोटी तो शाळेत जाई. शाळा सुटल्यावर वडिलांच्या धाकामुळे तडक मळ्यात जाई व पडेल ते काम करी. असे एस.एस.सी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पुढे शिक्षणाची अनिवार इच्छा होती. पण गावात कॉलेज नव्हते म्हणून गावातील काही समाजकार्यकर्त्या व्यक्तींच्या मदतीने, पण घरच्यांना न सांगता आनंदा रत्नागिरीला गेला. नंतर तेथून घरी पत्राने कळविले. पुढे कोल्हापूर येथे येऊन बी.ए. पर्यंतचे शिक्षण पदरात पाडून घेतले. रत्नागिरीला असताना भावे व चिटणीस सर यांनी यादवांना काव्यलेखनासाठी प्रोत्साहन दिले. प्राचार्य य. द. भावे यांच्यामुळचे आनंदचा सुप्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्याशी परिचय झाला. पु. ल. देशपांडे व सुनीता देशपांडे या दांपत्याशी परिचय घेणे, त्यांनी यादवांच्या कवितांचे वाचन करणे, कवितेविषयी गौरवोद्गार काढणे, त्यांना आणखी कविता लेखनाला प्रोत्साहित केले.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना गोखले कॉलेजमध्ये अनुराधा पोतदार या कवयित्रीचा प्राध्यापिका या नात्याने यादवांना सहवास लाभला. त्यांचेही प्रोत्साहन काव्यलेखनासाठी लाभले. तसेच प्रा. भिंगारे, प्रा. ग. वि. कुलकर्णी, व.ह. पिटके यांच्याशी यादवांच्या साहित्यिक गप्पा होऊ लागल्या. याच सुमारास 'हिरवे जग' य काव्यसंग्रहातील कवितांचे लेखन घडले. प्रा. अनुराधा पेतदार आणि व. ह. पिटके यांच्या मार्गदर्शनामुळे यादवांनी आपले 'हिरवे जग' चे हस्तलिखित महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कारासाठी पाठविले. या स्पर्धेत 'हिरवे जग' ला पारितोषिकही मिळाले.

बी. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यावर, यादवांना पुढील शिक्षणाची आस लागून राहिलेली होतीच. पण आर्थिक बाजू अतिशय डबघाईला आलेली होती. अर्थार्जनासाठी यादवांनी पुणे येथे आकाशवाणी केंद्रात नोकरी मिळवी. नोकरी सांभाळून एम. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पुण्याचे साहित्यिक व सांस्कृतिक वातावरण यांच्यातील कलावंतला आपल्या कलागुणांना वाव देण्यापुरतच ठरले. पुणे आकाशवाणी केंद्रात नोकरीच्या ठिकाणी व्यंकटेश मांडगुळकर, बा. भ. बोरकर, शंकर पाटील यांच्याशी जवळून परिचय झाला व त्यांचा सहवास यादवांना लाभला. 'गावकरी फड' या आकाशवाणीवरील कार्यक्रमासाठी श्रुतिका लेखन करतानाच भावी काळातील लेखनाची पूर्वतयारी झाली. श्रुतिका लेखनाचा अनुभव पुढच्या साहित्य लेखनासाठी पोषक

ठरला.

एम. ए. ची पदवी प्राप्त झाल्यावर दुसऱ्या कोणत्याही नोकरीसाठी बटपट न करता, प्राध्यापकाची नोकरी त्यांनी स्वीकारली. आपल्या लेखनाला वाव देणारा व वाचनाची हौस भागविणारा, प्राध्यापकाचा व्यवसाय त्यांनी स्वच्छेने पत्करला. पूर्वसुरींच्या लेखनाचे वाचन करीत असताना यादवांच्याही कथा, कादंबऱ्या, कविता निर्माण होऊ लागल्या. विविध वाङ्मयप्रकार हाताळत असताना त्यांनी प्राधान्याने ग्रामीण लेखक म्हणूनच लेखन केले. शिक्षणासाठी व नंतर नोकरीच्या निमित्ताने यादवांना आपल्या गावापासून दूर राहावे लागले, पण ते आपल्या गावाला कधीच विसरू शकले नाहीत. याचे प्रत्यंतर त्यांच्या सर्वच प्रकारच्या लेखनातून येते.

स्वातंत्र्योत्तर काळात खेड्यात शिक्षणाचा प्रसार झाला. पण त्यांच्यावर आजही अन्याय होतो आहे. ग्रामीणांवर होणारा हा अन्याय, त्यांच्यापासून दूरदूरच राहणाऱ्या सुधारणा याविषयीची खंत त्यांच्या साहित्यात व्यक्त होते. ग्रामीण जीवनाशी जुळलेली आपली नाळ कधी तुटू नये, तेथील विश्व आपल्या लेखणीने शब्दांकित करावे, त्या जगातील व्यक्तींची सुख-दुःखे साहित्यातून मांडावीत अशी यादवांची लेखनामागची भूमिका असल्याचे, त्यांच्या विविधस्वरुपी साहित्यातून जाणवते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खेड्यातच शिक्षणाचा प्रसार झाला. नवीन पिढी शिकू लागली. आपली शोषितावस्था, नाडलेपणा, सोयी सवलतीपासून वंचित राहणे, आपल्यावर होत असलेला अन्याय यांची जाणीव या नवशिक्षित ग्रामीण युवापिढीला झाली. ही वास्तवता त्यांच्या साहित्यातून अविष्कृत होऊ लागली. या नवजागृत ग्रामीण युवापिढीचे नेतृत्व यादवांकडे आले. आधुनिक ग्रामीण साहित्याच्या संदर्भात असलेली आपली भूमिका यादवांनी वेळोवेळी ग्रामीण साहित्य संमेलनातून ग्रामीण साहित्यिकांच्या मेळाव्यातून, परिसंवादातून चर्चासत्रातून सुस्पष्ट केली आहे. ग्रामीण साहित्याची ही चळवळ १९७५ च्या सुमारास सुरू झाली व अनेक कवी-लेखक यांनी या चळवळीला हातभार लावला. डॉ. आनंद यादव हे ग्रामीण चळवळीला प्रोत्साहन देतात व या चळवळीवर टीका करणाऱ्यांना प्रत्युतरही देतात. कविता, कथा, कादंबरी, वगनाट्य, आत्मचरित्रात्मक कादंबरी, व्यक्तिचित्रे, ललितलेख इत्यादी साहित्य प्रकारातून ग्रामीण जगतच प्रामुख्याने अविष्कृत करीत असताना, ग्रामीण साहित्याची समीक्षाही त्यांनी नेटकेपणाने केली आहे. लालित्यपूर्ण भाषेत रसपूर्ण ललित लेखन करणारे आनंद यादव, समीक्षापर लेखन तितक्याच ताकदीने पेलतात. त्यांचे कार्य एकूण तीन स्तरांवर चाललेले दिसते. साहित्यातून लालित्यपूर्ण लेखन करणे. ग्रामीण साहित्याची समीक्षा करणे व ग्रामीण साहित्य चळवळीचे नेतृत्व करणे अशा तीन पातळीवर यादव कार्यरत आहेत.

यादवांच्या संदर्भात असे संक्षेपाने म्हणता येईल की, बहुजन समाजातील एका अडाणी, अशिक्षित, शेतमजुराच्या या मुलाने, सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन, स्वतःला घडवते. आज उच्च पदावर विराजमान असताना आपल्या मातीचा आठव मनात ठेवून, साहित्यरुपाने तो गहिवर शब्दबद्ध केला. ग्रामीण शोषित जनतेचे प्रतिनिधत्व करीत असताना ते शोषित जीवन जगापुढे मांडले. तथाकथित शहरवासीयांनी, सदाशिव पेठी साहित्यिकांनी व टीकाकारांनी ग्रामीण साहित्यावर केलेले हल्ले परतवले. या हल्लांना चोख प्रत्युतर दिले. यादवांचे हे कर्तृत्व नक्कीच स्पृहणीय आहे. त्यांचे हे व्यक्तिमत्त्व त्यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व सुस्पटपणे समजण्यास पूरक असेच आहे.

**यादवांचे साहित्य :**

**१. कथासंग्रह : खळाळ (१९६८)**

खेड्यातील समाज, या समाजातील सामान्य माणूस, त्यांचे दारिद्र्य, त्याची वेदना, त्याचे भावविश्व हा यादवांच्या सर्वच लेखनाचा विषय आहे. 'खळाळ' मधील कथादेखील याला अपवाद नाही. 'वारकरी' कथेत दारिद्र्य आल्याने देवभजनी लागलेल्या वारकऱ्याचे मनोगत शब्दरुपात साकार झाले आहे, तर 'राजाराणी' कथेत बायकोपोरांशिवाय राजावाणी जीवन व्यतीत करणारा माणूस आहे. या उलट बायको मुलांसाठी राबणारा शेतमजूर 'बायकू-पोरं' या कथेत आहे. त्याच्या कष्टाचे मोल कुटुंबियांना नाही. पत्नी व मुलगी ह्यांच्या चोरट्या वृत्तीमुळे जिकीरीला आलेला नायक 'चाकरी' कथेतही भेटतो. 'मोट', 'इंजेन', 'पाडा बैल' यात खेड्यातील पशुसृष्टी चित्रीत झाली

आहे. तसेच 'चटावलेला' चिमण्यांच्या रक्ताची चटक लागलेला साप आहे. 'मुधा', 'वखार' ह्या कथा मानवी स्वभावातील चमत्कृतीचे चित्रण करणाऱ्या आहेत. 'सासुरवाशीण' कथेतील सून सासूच्या जाचाला कंटाळून स्वतःच्या जीवावर उदार होते, तर 'सून' कथेतील खून आपल्या वागण्याने सासूलाच मेटाकुटीला आणते. 'धुणं' या प्रेमकथेत तानीवर असलेले नायकाचे प्रेम संयमशीलपणे व सूचकतेने व्यक्त होते.

ग्रामीण जगतातील माणूस, त्याच्या भावभावना, प्राणिजगाचेहीदर्शन घडविणारी ही कथा आहे. त्यासाठी योजलेली ग्रामीण भाषा देखील विषयाला पूरक व उठाव देणारी आहे. म्हणूनच निशिकांत मिरजकर या संदर्भात म्हणतात, 'खळाळ' हा आनंद यादवांचा कथासंग्रह आजच्या मराठी कथेच्या प्रवासातील प्रतिनिधी ठरावा. कथेची रचना आणि अननुभूतीचे आकारग्रहण यांची हळुवार सांगड घालून त्यांनी त्यातील कथांची निर्मिती केली आहे. एकंदरीत या कथासंग्रहातील कथांमधून जिवंत, उत्कट अनुभूती प्रभावीपणे साकार झाल्या आहेत.

यादवांची ही कथा अकृत्रिम आहे. ती खरीखुरी आहे. जिवंत हाडामासाच्या व्यक्तींचे मनोगत सांगणारी आहे. अकृत्रिम सौंदर्याने परिपूर्ण अशा या कथांचा विषय ग्रामीण परिसर, ग्रामीण व्यक्तीच आहे. ग्रामीण बोलीभाषेतच सर्व कथा साकारलेल्या आहेत. विषयांची विवधता असूनही परिसर, मर्यादेमुळे त्याच त्या ग्रामीण भाषेच्या योजकतेमुळ संग्रह एका दमात वाचताना काहीसा एकसुरीपणा जाणवतो.

**२. आदिताल (१९८०) :**

आदिताल कथासंग्रहातील कथांचे विषय वैशिष्ट्यपूर्ण आहेत निसर्ग, निर्मिती - प्रक्रियेतील व्यामिश्र गुंतागुंत, प्रकृती - पुरूषातील गूढ नाते इत्यादी वैशिष्ट्यपूर्ण विषय या कथेत आलेले आहेत.

'अनवाणी' कथेत सिदू स्त्रीसहवासासाठी आतूरलेला आहे. पण सावित्री विषयीची त्याची खरी प्रीती त्याला पशू बनू देत नाही, लेखक मनावर असलेले संस्कार उचल खातात. 'आकार' मधील बायाक्काला ऐन तारुण्यातही स्त्री असूनही पुरूषाच्या सहवासाची गरज भासत नाही. तिची सर्व वागणूकच पुरुषी आहे. लेखकाने तिच्याविषयी केलेली कल्पना खरी न ठरता ती लेखकाची निराशा करते. 'रक्तसंगम' कथेत कमळा व इतर पात्रे लेखकाला न जुमानता आपल्या मनाप्रमाणे वागतात. लेखकाला निर्मिती - प्रक्रियेतील जाणवलेली गुंतागुंत येथे कथास्वरुपात साकारलेली आहे, तर 'प्रत्यय' व 'हिरवा चाफा' कथांचे विषय निसर्ग आहे. निसर्गाच्या सहवसाचा प्रत्यय हा 'प्रत्यय' कथेचा विषय आहे. तर झाडं म्हणजे कुणीतरी विशाल, व्यापक, उदात्त आकार असलेली व्यक्तिमत्त्वं आहेत, असे लेखकाला वाटतं. ही लेखकाची जाणवलेली व्यक्तिमत्त्वं 'हिरवा चाफा' कथेचा विषय आहे. स्त्रीचं अनादी, सनातन मातृत्व, तिच स्त्रीत्व व अबाधित सौभाग्यपण हा 'मळवट' कथेचा विषय आहे. पुरुषाचे स्त्रीशी असलले खरे व चिरतानेपण पुत्र-माऊलीचे आहे. म्हणूनच 'आदिताल' मधील मृदंगवादकाला वसू - नर्तकी मातृरुपात भावते. जगाच्या सस्कृतीचा जन्मही झाला नव्हता, तेव्हापासून त्यांच्यात असलेले गूढ अनामिक नातं ते अनुभवतात. नर्तकी प्रसन्न जगदंबेप्रमाणे बोलते व तिच्या स्पर्शात मृदंगवादकाला मातृत्वाचा अनुभव येतो. 'जन्मस्थान' मधील गोविंदा मृत्यूशय्येवरील आपल्या आईला जगदंबेच्या रुपात पाहतो. 'अनैतिक' कथेतील स्त्रीला लग्नाशिवाय मातृत्व हवं आहे. 'माती' कथेतला विषय मनुष्य आपल्या नैसर्गिक वृत्ती-प्रवृत्तींना कलंदर वृत्तीच्या कृष्णाला गोऱ्या सुंदर साहेबपासून मूल हवे आहे. स्वतःच्या मानसिकतेला - नैसर्गिक प्रकृतीला मोकाट सोडायला ती तयार आहे. एकूण 'जन्मस्थान', 'मळवट', 'हरवलेला सोनचाफा', 'अनैतिक', 'आदिताल' इत्यादी कथांतून प्रकृती - पुरुष, स्त्रीपुरुषसंबंध, आदिम कामभावनेचा शोध आणि वेध घेण्याचा प्रयत्न दिसतो. पण हा शोध आणि वेध दुर्बोध न होता, हा तरल असा विषय लेखकाने समर्थपणे हाताळला आहे. यादवांच्या 'आदिताल' हा कथासंग्रह म्हणजे त्यांनी लेखकाला योजलेल्या शीर्षकानुसार 'विलोभनीय अभिव्यक्तीची अतुलनीय झेप' अशा स्वरुपाचा वाटतो.

**३. डवरणी - (१९८२) :**

'डवरणी' हा कथासंग्रह १९८२ साली प्रसिद्ध झाला. १९९३ साली दुसरी आवृत्ती देखील प्रकाशित झाली. 'डवरणी' या शीर्षकावरुनच संग्रहाचे अंतरंग ग्रामीण असल्याचे स्पष्ट होते.

'डवरणी' संग्रहातील पहिलीच कथा 'माझी पहिली बायको' ही मनोविश्लेषणात्मक स्वरुपाची आहे. बालपणीच एखाद्या स्त्रीचे विशिष्ट गोष्टीसाठी आकर्षक वाटणे व अशीच स्त्री पत्नी असावी असे वाटणे, यात गूढ मानसिकता दिसते. लेखकाच्या लहानपाणी दुग्धपान करू शकणारी तानीबाईसारखी स्त्री पत्नी असावी असे लेखकाला वाटते. पत्नी आणि माता यातील एकरुपताच लेखकाला कुठेतरी भावली आहे. 'ओढ' मधील तम्माला पाण्याची असलेली ओढ गूढ स्वरूपाची आहे. 'संशयात्मा' कथेतील जानदेवाला स्वत:च्या भावाचा वाटणारा संशय आणि संशयामुळे होणारे त्याचे वेडसर वागणे, जानदेवाची मानसिकता दाखवते. तर 'हूल' कथेत एखादी हूल किंवा अफवा समाजमनावर कसा अनिष्ट परिणाम घडविते त्याची कथा येते. सामाजिक रोषाला निरपराध म्हातारी नाहक बळी पडते. 'शहाणा' गाव कथेतही गावातील शहाणे (?) लोक आपल्याला गंमत पाहायला मिळावी म्हणून खुळ्या शंकऱ्याला पुरात उडी घेण्यास प्रवृत्त करतात व खुळ्या शंकराचा बळी जातो. एकूण व्यक्तीची व समाजात मानसिकता दाखविणाऱ्या ह्या कथा जशा या संग्रहात आहेत. तशाच ग्रामीण जगतातील दारिद्र्याचे दर्शनही त्या घडवितात.

'हल्लक', 'कोंडमारा', 'भोलेनाथाची मर्जी', 'खताची गाडी', ह्या कथा ग्रामीण जगतातील दारिद्र्य व त्यामुळे निर्माण होणारे कारूण्य चित्रीत करतात. 'हल्लक' कथेत आधीच असलेलं दारिद्र्य विसरण्यासाठी नायकाने दारु पिणे, दारुच्या नशेत पत्नी-मुलांना मारणे, कामावर नीटपणे न जाणे व त्यामुळे आणखी दारिद्र्य येणे, दारिद्र्याचे चटके न सोसले गेल्यामुळे स्वत:ला परत दारूत बुडवून घेणे असे दुष्टचक्र दिसते. 'खताची गाडी' कथेत छोटा शेतकरी असलेल्या धोंडीबाची थोडीशी शेतीदेखील शेजारचा धनदांडगा शेतकरी थोड्या मोबदल्यात जबरीने आपल्या ताब्यात घेतो, धोंडीबा व त्याच्या मुलाच्या नशिबी मोलमजुरी येते. 'कोंडमारा' कथेतील संतूच्या आईला व तरूण पत्नीला दुसरीकडे कुठेच रोजगारीचे काम मिळत नाही व त्या आगतिकपणे दत्तूच्या मळ्यातच कामाला जातात. पण त्यामुळे संतूची होणारी तडफड, त्यांचा 'कोंडमारा' शेवटी दत्तूवर त्याचा खून करण्यासाठी दगड उचलून बाहेर पडतो.

'भोलेनाथाची मर्जी' कथेतील इराप्पा ग्रामसेवक सुबारावच्या घरात साप सोडतो आणि सापांचा बंदोबस्त करण्यासाठी म्हणून सुबारावाकडून पैसे काढतो. पण त्याची ही चलाखी लक्षात आल्यावर गावकरी त्याला चांगला चोप देतात. पण इराप्पा आपल्या पत्नीच्या आजारामुळे रंजिस आलेला असतो व तिला डॉक्टरकडे नेण्यासाठीच त्याने सुबारावाला फसवून पैसे मिळवलेले असतात हे जेव्हा वाचकाच्या लक्षात येते, तेव्हा इराप्पाचे दारिद्र्यच वाचक मनावर ठसते, ग्रामीण जनतेची व समानाची मानसिकता, दारिद्र्य यांच्या चित्रणाबरोबरच तेथील पुढारी-प्रतिष्ठित म्हणविणारी राजकारणी - बडी मंडळी कशी लबाडीने वागते याचेही चित्रण करणाऱ्या कथा या संग्रहात आल्या आहेत. 'सुटकेतील पाश', 'गिधाड', 'खताची गाडी' या कथा ग्रामीण पुढाऱ्यांचे बेरकीपणाचे दर्शन घडवितात.

'सुटकेतील पाश' मधल मतेसारखा प्रतिष्ठित सामाजिक कार्यकर्ता मनुष्य मोहितेबाईला आपल्या मोहात पाडतो. बाईला झालेले मूल आपल्या प्रतिष्ठित पणाखाली अनाथाश्रमात सोडतो. पत्नी, कुटुंबीयांच्याही डोळ्यात धूळ फेकतो.

'गिधाड' कथेतही गावातील तथाकथीत राजकारणात मंगला या नर्सचा बळी जातो. आधी तिचे शील लुटून मग त्यावरून पुन्हा तिलाच टोचून बोलून हैराण केले. शेवटी मंगला झोपेच्या गोळ्यांना शरण जाते. 'खताची गाडी' कथेतही धोंडीबाची शेती थोड्या मोबदल्यात लाटणारा पुढारी पवार आहेच.

याशिवाय 'मल्लू रामोशी' कथेत मल्लू रामोशाचा दरारीपणा, बेरकीपणा, अचाटशक्ती व या बळावर तो चोरीचे साहस करतो त्याची कथा येते. 'राणूची बायको' कथेतील भीवरा तडफदार, कर्तबगार आहे. पांगळा झालेला राणू नवरा म्हणून तिच्या मनाला भावत नाही व ती त्याला सोडून जाते. भिवरा, रामूचे व्यक्तिचित्रण या कथेत ठसठशीतपणे झालेले आहे.

'ठिणगी' ही शहरी जीवनातील कामगाराचे दारिद्र्य, हलाखी यांचे चित्रण करणारी कथा. मुलीच्या लग्नाच्या खर्चासाठी परसरामाला आपल्या डोळ्यात ठिणगी उडवून घेऊन अपघात घडवून आणावा लागतो. त्यामुळे त्याला मालकाकडून पैसे मिळाले असतात. कामगार जगतातली अगतिकता भयावह आहे, हेच येथे

दिसते.

'चित्तुर आणि चोळी' ही जयंवता आणि सोना यांच्या असफल प्रेमाची कथा. जातीची बंधने त्यांना जवळ येऊ देत नाहीत. चिडलेला जयवंता चित्तरांच्या पिसांच्या रंगामुळे त्याच रंगाच्या सोनाच्या चोळीची आठवण होऊन चित्तरांची शिकार करतो. 'कवठी चाफा' कथेत आईच्या बदफैलीपणाचा वारसा चालवणारी कोंडी आहे. तिचा उपभोग घेऊन तिला झडकून टाकणारा भुयाचा दिनकर आहे. रोगट पत्नीला सोडून मंजाकडे मजा करणारा शिवराम आहे. शिवरामचे हॉटेल सांभाळणारा मंजाचा बावळट नवरा आहे व गरोदर राहिलेल्या कोंडीचा गर्भ पाडण्यासाठी तिच्या पोटावर खच्चून लाथा घालणारी तिची आई आहे. कोंडी, शिवरामची पत्नी, कोंडीची आई या सर्वच स्त्रिया सामाजिक चालीरितीच्या व निसर्गाच्या बळी ठरल्या आहेत.

'डवरणी' या कथासंग्रहात मानसिक ताणतणाव, सामाजिक ताणतणाव जसे व्यक्त होतात तसेच दारिद्र्यामुळे निर्माण झालेली दुःखे, प्रेमभंग इत्यादींचे चित्रण होते. बेरकी व्यक्तिमत्त्व, ढोंगी राजकारणी यांचाही पर्दापाश होतो.

### ४. उखडलेली झाडे (१९८६) :

'उखडलेली झाडे' या संग्रहातील कथांमध्ये देखील ग्रामीण समाज तेथील बेरकी राजकारणी, शेतमजुरांचं हलाखीचं जगणं, बलुतेदारांचं दैन्य, तेथील भ्रष्टाचार इत्यादींचं चित्रण आलं आहे. परिवर्तनशील ग्रामीण जीवनात ग्रामविकास, औद्योगिकता यांच्या धबडग्यात गरीब व श्रीमंत या दोन समाजातील दरी अधिक रुंदावत आहे, यांचे दर्शन येथे या घडवितात.

'फळ्या आणि पारंब्या', 'गावचा मुख्यमंत्री' ह्या कथा बेरकी राजकारण्यांचं बेरकीपण दाखविणाऱ्या कथा आहेत. 'फळ्या आणि पारंब्या' कथेतील दादासाहेब देशमुख केवळ लोकमतासाठी बाबासाहेबांच्या संगतीत रहातात, वरवर बाबासाहेबांना पाठिंबा देतात, पण बाबासाहेबांच्या स्मारक योजनेला त्यांचा विरोधच असतो 'गावचा मुख्यमंत्री' कथेतील बाळासाहेब धूर्त आहेत. छऱ्याला त्यांनी हाताशी धरले आहे. या कथांतून खेड्यातील ओंगळ राजकारणाचे जसे दर्शन घडते तसेच 'फाट्याचं पाणी' कथेत खेडयातील भ्रष्टाचाराचे वर्णन येते. लक्ष्मण मोरेसारखा माजी सैनिक या लाचखोरपणाला थोपवण्यात तोकडा पडतो. अधिकारी व पुढारी मिळून गरीब, गरजू अज्ञानी शेतकऱ्यांना नाडतात. खेड्यातील वास्तवाचे विदारख दर्शनच येते घडते.

'कष्टाची लक्ष्मी' व 'शेवटचं पायताण' ह्या कथा ग्रामीण बलुतेदाराचं हलाखीचं जिणं चित्रित करतात. 'कष्टाची लक्ष्मी' कथेत लक्षुमी म्हणजे केरसुणी. ह्या केरसुन्या विकूण कष्टाची भाकर मिळवू पाहणारी एक विधवा मातंग स्त्री, पण शहरात आता जुन्या पद्धतीच्या खेड्यातील केरसुण्या कोणीच वापरत नाही. नवीन पद्धतीच्या जीवनात हा उद्योगही आता कालबाह्य ठरला आहे. 'शेवटचं पायताण' कथेतही पायताण शिवण्याचा चांभाराचा धंदा कसा निकालात निघाला आहे ह्याचे चित्रण येते. नवीन समाज रचनेत, ग्रामीण भागाचं शहरीकरण घडत असल्याच्या या काळात बलुतदारी कशी नामशेष होत आहे, त्याचे विदारख चित्रण येते.

'चांवीच पाणी' या कथेतही ग्रामीण जीवनातील दारिद्र्याचे वर्णन येते. छोटी-छोटी सुखं देखील या रोजगारी लोकांच्या नशिबी नसतात. त्यांना हुलकावणी देतात ह्याचे चित्रण येते.

'पाषाणाची माणसं', 'उद्योग वसाहत', 'भिंत' या कथा शहरी जगताचं चित्रण करतात. 'पाषाणाची माणसं' कथेत जंगमसाहेबांना पाषाणासारखीच असलेली माणसं शहरी भेदतात आण खेड्याशीच आपली नाळ बांधली आहे, या विचाराने ते खेड्याकडे परतण्याचा निर्णय घेतात. 'उद्योग वसाहत' कथेत कारखानदार आणि कामगार यांच्यातील वाढत्या दरीचे चित्रण आहे. घरगडी म्हणून काम करणाऱ्या चंदूला अभ्यासाला वेळ मिळत नाही, तो नापास होतो, निराश झालेल्या चंदूला उद्योग वसाहती जवळून जाणारे मळकट पोषाखातले काळ्या तोंडाचे कामगार आपलीच भावी प्रतिमा वाटतात. औद्योगिकीकरण झाले, कारखानदारी फोफावली तरी नाहीरे समाज आपल्या पूर्वीच्या परिस्थितीतून वर येऊ शकत नाही. 'भिंत' कथेतही गरीब व श्रीमंत वस्त्यात भिंत उभी राहिल्याचं चित्रण येते. खरं तर मनात असलेली भिंतच दंगा, हिंसाचार, जाळपोळ घडवून आणते आणि त्याचा परिणाम म्हणून प्रत्यक्षात भिंत बांधली जाते.

'हिरवी संस्कृती' ही कथा लेखकाला ग्रामीण जगताची असलेली ओढ व ती संस्कृती जगलीच पाहिजे म्हणून वाटणारी

तळमळ व्यक्त करते. सुरुवातीला प्रा. भोईटे आपल्या भावाला शेतकरी आंदोलनापासून दूर राहा असा उपदेश पत्रातून करतात. पण भाऊ आपली रास्त भूमिका विस्तारपूर्वक लिहून त्यांना कळवितो. तेव्हा प्रा. भोईटे यांचेही मत परिवर्तन होते. त देखील गावाकडे जातात खेडी, शहरे, देश, संस्कृती जगविली पाहिजे असे त्यांना वाटते.

एकूण नवसमाज निर्मिती, विकासकार्यात व औद्योगिक प्रगतीमुळे जुने पारंपारिक धंदे, व्यवसाय कसे डबघाईला आले, खेड्यांची सामाजिक व आर्थिक घडी त्यामुळे कशी विस्कटली यांचे मार्मिक चित्रण या कथा करतात. ग्रामीण जीवनाचा वेध घेणाऱ्या ह्या कथांचा विषय तेथील जनतेवर होत असलेल्या अन्यायाचे चित्रण करणे हाच आहे. लेखकाने स्वत: हे जीवन भोगले आहे, त्या मागे लेखकाची आत्मानुभूती आहे. पण खेड्याविषयी इतक्या आपुलकीने विचार करताना यादवांचा स्वर कधी कधी शहरवासीयांविषयी उपरोधपूर्ण छटा घेऊन उमटताना दिसतो. 'हिरवी संस्कृती', 'कष्टाची लक्ष्मी', 'पायताण', 'भिंत', 'पाषाण माणसं' या कथांची उदाहरणे या संदर्भात देता येतील.

सर्व कथांचा विषय ग्रामीण समाज हाच असल्यामुळे लेखक स्वत: पूर्वी त्या समाजाचा एक घटक होता म्हणून लेखनात त्या समाजाविषयी वाटणारी सहानुभूती उमटणे साहजिकच आहे. पण शहरी संस्कृतीविषयी अधून मधून कथेच्या ओघात उमटलेले विरोधात्मक स्वर आहेत.

**५. माती खालची माती (१९६५) :**

'मातीखालची माती' या व्यक्तिचित्रणात्मक संग्रहात 'हाताबुडी आलेला शिवा' या कथेत लेखकाने आपल्या धाकट्या भावाचे व्यक्तिचित्रण चितारले आहे. तर 'फुला आत्ती' ही देखील लेखकाच्या दूरच्या नात्यातील एक स्त्री आह. 'हाताबुडी आलेला शिवा' कथेत लेखक - मोठा भाऊ - शिकून शेतीच्या कामाचा राहिला नाही. म्हणून शिवाला आईवडील शाळेतच घालत नाहीत. पण रोजगारी शिवाला भातासारखी वस्तूही पोटभर मिळत नाही. अनेक जीवनावश्यक गोष्टी त्याला भेटत नाहीत. 'फुला आत्ती' ही लेखकाच्या आजीची मैत्रीण, वंशाला दिवा मिळवा, नातू व्हावा म्हणून आतुरलेली. पण सुनेला मुलीच होतात म्हणून तिला छळणारी आहे. पण सातव्यावेळी मुलगा झाल्यावर ती सुनेचे कौतुकही करते, 'तू बसून खा' असं सांगते. ग्रामीण जगात असलेल्या समजुती व त्यानुसार वागणारी एक स्त्री असे प्रतिनिधीक स्वरुप फुला आत्तीला लाभले आहे.

'बापू मांग', 'आक्कू मावशी', 'चव्हाणाचा आबामा', 'लंगडा गोपा', 'पोरका दिनू' इत्यादी व्यक्तिचित्रणे ग्रामीण विश्वातील दारिद्र्याचेही दर्शन घडवितात. 'बापू मांग', 'आक्कू मावशी' ह्या परिस्थितीने गांजलेल्या व्यक्ती पोटासाठी चोऱ्या करतात. बापू मांग गवत चोरतो आणि एखाद्या प्रसंगी कोकरूदखील चोरतो. 'पोट भरण्याचं दुसरं' साधन नसलेली म्हातारी आक्कू मावशी ताईबाईचा नैवेद्य चोरते. देवीला वाहिलली कोंबडी पकडते. परंतु आक्कू मावशी किंवा बापू मांग यांचा वाचकाला तिरस्कार वाटत नाही, तर त्यांची परिस्थिती पाहून कारूण्यच मनात उभे राहते.

'चव्हाणाचा आबामा' कथेतील आबामा पूर्वी पहिलवानकी केलेला आहे. पण आता बदललेल्या परिस्थितीत कष्ट करणे त्याच्या नशिबी आले. पहिलवानाला आवश्यक खुराक मिळणे दुरापास्त झाले. पूर्वीच्या आपल्या आठवणीतच तो केवळ रमतो. 'लंगडा गोपा' कथेतील गोपा लंगडा आहे. मिळेल ती मजुरी करून कष्टाचं जिणं जगतो. मुलगा वारल्यावरही त्याच्यासाठी दुःख करण्यासाठी त्याच्याकडे वेळ नाही. पोटासाठी लगेच त्याला कामावर जावे लागते. पोट, पोट करीतच आपल्यालाही मातीआड व्हावे लागेल हे तो समजून आहे. कारूण्य ओतप्रोत या कथेत भरून राहिले आहे. 'पोरका दिनू' कथेमधील दिनू पोरका आहे. उकिरड्यावर उगवलेल्या आंब्याच्या कोयीसारखा तो पोरका आहे. या कारूण्यपूर्ण कथा आहेत.

'मातीखालची माती' मधील वरील व्यक्तिचित्रणांशिवाय 'सखाराम', 'खादाड धोंडिबा' व 'बाबाजी बल्लाळ' ही व्यक्तिचित्रणे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'सखाराम' ही सखारामाची मानसिकता दाखविणारे व्यक्तिचित्रण आहे. वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'सखाराम' ही सखारामाची मानसिकता दाखविणारे व्यक्तिचित्रण आहे. सखाराम हा मुळात शरीराने पुरुष असूनही आपण स्त्री आहेत अशीच त्याची मानसिकता आहे व त्याचे वागणे, बोलणे, चालणे

इत्यादीतून त्याची मानसिकता दिसून येते. 'खादाड धोंडिबा' कथेतील धोंडिबा ही व्यक्तिरेखा. धोंडिबा अतिशय खादाड आहे पण कामचुकार आहे. खाण्यात पुढे असणारा धोंडिबा कामाची टाळाटाळ करण्यासाठी कशाप्रकारे युक्त्या योजतो त्याचे मजेदार चित्रण लेखकाने येथे केले आहे. 'बाबाजी बल्लाळ' मधील बाबाजी सज्जन आहे. चारचौघांपेक्षा वेगळा आहे. देवदासी रखमाला पत्नीप्रमाणे घरात ठेवतो. दोघांनाही आपल्याला मूल असावे असे तीव्रपणे वाटते. पण रखमाच्या पोटी एक मृत अपत्यच जन्माला येते. रखमा बाळंत झाली त्याच वारी मोरी कुत्री व्याली व तिला पाच पिल्ले झाली होती. आपल्याच बाळाचा जीव या पिलात आहे, अशा समजुतीने कुत्रीच्या पिलांना ती पुत्रवत जीव लावते. केवळ कुत्र्याच्या पिलांवरच ती माया करते असे नाही, तर झाडं-झुडपं, शेतं, इळ्याखुरप्यावरही रखमा आणि बाबाजी यांचं मनं जडलं आहे. त्यांची उस्तवारी करताना त्यांच्या मनात सुखाचं पेव फुटतं.

'भाडेकरू' कथेत भाडेकरू दत्तूची व्यक्तिरेखा रेखटली आहे. बैलांच्या विक्रीच्या व्यवसायात तोटा झाल्यामुळे दत्तू अडचणीत येतो, त्याचे वर्णन या कथेत येते.

वरील बहुतेक व्यक्तिचित्रणे व्यक्तीच्या बाह्यरुपाचे त्याच्या लकबी, लहरी स्वभावाचे वर्ण करणारी आहेत. पण व्यक्तीच्या अंतरंगाकडे, त्याच्या मानसिकतेकडे लेखक वळत नाही.

या संग्रहातील व्यक्तिचित्रणे ठसठशीतपणे वाचकमनावर उमटण्याऐवजी त्या व्यक्तीच्या जीवनातील घटनाप्रसंग व्यक्तिचित्रणावर मात करतात. 'लंगडा गोपा' कथेत गोपाच्या मुलाच्या मृत्यूचा प्रसंगच वाचकमनावर आघात करतो. 'बापू मांग', 'आक्कू मावशी' या व्यक्तिरेखाटनात त्यांच्या चोरीच्या घटना व्यक्तिदर्शनावर मात करतात. या संदर्भात स. शि. भावे म्हणतात, 'घटना प्रसंग ताकदीने उभे करणे हे आनंद यादव यांचे सामर्थ्य आहे. त्यातून व्यक्तिचित्रे उभी रहात नाहीत, कारण एकेरी व्यक्तिचित्राला फाडून फोडून हे प्रसंग मोठे होतात, आणखीच व्यापक आणि खोल अशी अनुभवाची समज दाखवितात.'

यादवांनी ग्रामीण जीवनातील विनोदी प्रसंगाचे वर्णन करणारी कथा देखील लिहिली. 'घरजावई' आणि 'माळावरची मैना' या नावाने दोन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

**६. 'घरजावई' आणि 'माळावरची मैना' :**

या दोन्हा संग्रहातील कथांचे स्वरुप खूपच सारखे आहे. 'घरजावई' कथासंग्रह १९७४ साली व 'माळावरची मैना' कथासंग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. या कथांचे लेखन वाचकांच्या मनोरंजनासाठी केले गेलेले दिसते. व्यक्ती तिच्या परीने व्यवस्थित, सुसंगत हुशारीने वागते, पण तिच्या वागण्यातून विसंगतीच निर्माण होते. ही विसंगती वाचकाला हसविते. यादवांच्या कथांतील व्यक्ती ग्रामीण जगातील आहेत. अनेकदा या व्यक्तींच्या विसंगतीतून निर्माण होणाऱ्या विनोदाला कारूण्याची एक किनार असलेली दिसते. यादवांच्या विनोदी कथांत गावरान चपखलपणाचे, बेरकीपणाचे चित्रण आलेले आहे.

'घरजावई' संग्रहातील पहिली कथा 'घरजावई.' या कथेत भागू, तिची एकुलती एक मुलगी संती, संतीचा पती व संतीशी लग्न करण्याची इच्छा बाळगून असलेला मारुती यांची फरपट व्यक्त झाली आहे. 'रांगडेपाडीचे गांजाखस' कथेतील गावचा पाटील नादिष्ट, रंगढंग करणारा. केवळ पोटाला घालण्याच्या बोलीवर अडल्या नाडल्यांना गरीबांना शेतावर राबवून घेणारा. पण या पाटलालाही शेरास सव्वाशेर असे रांगडेवाडीचे चापर गांजाखस भेटतात व कथेत धम्माल प्रसंग निर्माण होतात. परंपरेने चालत आलेल्या लोककथेचा तिच्यातील किस्सांचा उपयोग यादवांनी करून घेतला आहे.

'गायकवाडची गाठ' ही एका 'टिपिकल' ग्रामीण कथाकाराचे दर्शन घडवते. आपल्या कथेत पुरेपर ग्रामीण वास्तव यावं म्हणून खेड्यात वास्तव करणारे गायकवाड आपल्या कथेच्या टीकाकाराला जोड्यानं मारलं पायजे, अशी भाषा वापरतात.

'त्र्याहत्तर खोड्यांचा' कथेत अंगात त्र्याहत्तर खोड्या असलेल्या गणा न्हाव्याचं चित्रण येते. अशा गणाला चकवू पाहणारे, फसवू पाहणारे गावकरीही आहेतच. गणाची बायकोदेखील बाहत्तर खोड्यांची आहे, तरी ती त्र्याहत्तर खोड्यांच्या गणाबरोबर नांदत नाही. गणा आता दहीवालीशी लफडे जुळवू पाहतो आहे. एकूण ग्रामीण जनतेच्या मानसिकतेवर प्रकाश

टाकणारी ही कथा आहे.

'छंद करावा असा' ही कथा काडी पैलवान मुर्ल्याच्या पहिलवानकीच्या छंदाची जशी आहे; तशीच मुर्ल्या हौशी या मुलीच्या मागे लागतो, त्या छंदाचीही आहे. हौसाचे आपल्यावर मन आहे अशी खुळी समजूत असलेल्या मुर्ल्याच्या बावळटपणाचे चित्रण कथेत येते. 'धुळवड' कथेत किशा मांगाच्या मेंढरू चोरण्याची कथा येते. मेंढराची चोरी लपविताना व चोरी पकडल्यावर गयावया करणाऱ्या किशाचे विनोदी चित्रण कथेत येते. पण या विनोदाला मांगांच्या दारिद्र्याच्या वर्णनाची करूण किनारही असलेली दिसते.

'तिरकूट' कथेत आळसिद् आप्पाला परसू, त्याची पत्नी मंजा व त्याची आई वेगवेगळे तीन नवस करतात आणि मंजाला तिरकूट होतं. दान मुलगे व एक मुलगी. घरातील स्त्रिया, बाहेरचे ओळखीपालखीचे लोक परसूला याबाबतीत छेडतात आणि विनोद निर्माण होतो.

'बायको' कथेतील दसऱ्या आपल्या पत्नीचा - ती दिसायला साधारण आहे म्हणून त्याग करतो व दुसरी सुंदर पत्नी शोधू लागतो. एक सुंदर मुलगी सांगून येते, पण दसऱ्याच्या एक मित्र तिच्याशी आपले लग्न जुळवितो. दसऱ्याचे लग्न कुठेच न जुळल्याने सोडचिठ्ठी दिलेल्या पहिल्या पत्नीला तो आणायला येतो. पण तिची सोयरीक आता दुसरीकडे झालेली असते. सासरा दसऱ्याला चांगलीच खरपूस समज देतो. सुंदर पत्नी मिळवायच्या नादात दसऱ्या होती ती बायकोही घालवून बसतो.

'म्हातारी आणि कोंबडी' कथेतील अण्णावाणी बेवारशी म्हातारीला तिच्या जवळच्या डबोल्याच्या लोभाने सांभाळतो व तिच्या मरणाची वाट पाहतो. पण या लबाड आणि लोभी वाण्याच्या श्रद्धेचा फायदा घेणारा गंगाराम वाण्याला शेरास सव्वाशेर भेटतो व कथेत धम्माल विनोद निर्माण होतो.

'बाईची नेमणूक' ही कथा खेड्यातील शिक्षण क्षेत्रातील मंडळी काय लायकीची असतात त्यावर प्रकाश टाकते. स्त्री शिक्षिकेच्या नेमणुकीसाठी जिवाचा आटापिटा करणारे कार्यकारी मंडळाचे सदस्य कथेत विनोदी प्रसंग निर्माण करतात.

'आपटी' कथेत मारुतराव गायकवाड यांच्या दोन मुलाशी भीमगोंडा पाटील आपल्या देन मुलीची सोयरीक कशी सत्यात जुळवतात त्याची कथा येते. तसेच खेड्यात पैसे देऊन कशाप्रकारे मते मिळवली जातात, विरोधी पक्ष एकमेकांच्या सभा कशा उधळतात यावरही प्रकाश पडतो.

'रखवालदार' कथेत रखवालदाराने रात्री जागे राहावे म्हणून सोसायटीतल्या मेंबर लोकांनाच जागे राहावे लागते, त्याच गमतीदार वर्णन येते. 'महाराणी अबिदाचे साम्राज्य' कथेतील अबिदा पुण्याच्या हायवेवर दारु विकते. ट्रकवाले व इतर वाहनांचे चालक तिच्याकडून दारु घेऊन पितात. तिच्या तरुण, सावळ्या, कामुक सौंदर्याचा दुरुनच आस्वाद घेतात, पण जवळ पाण्याचा व छेडण्याचा कुणी प्रयत्न केल्यास अबिदाच भाऊ त्याला रक्त आकेस्तोवर मारतात. पुण्याजळच्या हायवेवर अबिदाच साम्राज्य आहे.

यादवांचे ग्रामीण विनोदी कथेचे स्वरुप वरीलप्रमाणे आहे. या कथा रंगविताना यादवांनी ग्रामीण लोकांच्या वागण्यातील विसंगती, लोकसाहित्यातील विनोदी किस्से इत्यादींचा वापर केला आहे. ग्रामीण भागात हे किस्से प्रचलित असल्याने तिथल्या लोकांना ते माहीत असतात, शहरी वाचकाला हे किस्से आपले कथेद्वारे सांगून त्यांचे मनोरंजन करणे हाच हेतू या कथांच्या लेखनामागे असलेला दिसतो. या कथेच्या लेखनहेतूविषयी डॉ. रवींद्र ठाकूर त्यांच्या 'आनंद यादव व्यक्ती व वाङ्मय' या ग्रंथात म्हणतात, या कथेचा वाचक प्राधान्याने शहरात राहणारा मध्यमवगीय माणूस हाच होतो. सतत मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण करणारे साहित्य वाचून कंटाळलेल्या त्याच्या मनाला ही कथा रूचिपालटाचा आनंद देत नाही. त्यासाठीच जणू तोही या कथेकडे वळला. परिणामी मनोरंजनाच्या गरजेतून निर्माण झालेल्या या कथेतील जीवनदर्शन उथळ पातळीवरचे राहावे हे स्वाभाविकच होते.

**आधुनिक ग्रामीण साहित्याची चळवळ :**

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचे लोण खेड्यापाड्यात, तळागाळापर्यंत जाऊन पोहोचले. या ग्रामीण नवशिक्षितांनी साहित्यनिर्मितीला सुरूवात केली. आतापर्यंत 'ग्रामीण'तेच्या नावाखाली निर्माण होणारे साहित्य खरेखुरे ग्रामीण नव्हतेच याची

जाणीव ग्रामीण नवशिक्षित पिढीला झाली. याच काळात नवा सामाजिक दृष्टीकोन समाजवादी दृष्टीकोन त्याला प्राप्त झाला. नवसाहित्यिकाला सर्वच जातीधर्माचे, पददलित आपलेच वाटले. आतापर्यंतच्या ग्रामीण साहित्यातील कृत्रिमता लक्षात आली. त्या मर्यादा टाळून नवे आधुनिक ग्रामीण साहित्य त्याने निर्माण केले. या आधुनिक मराठी ग्रामीण साहित्यिकांचे नेतृत्व आनंद यादवांकडे आले.



ग्रामीण साहित्याने साठ नंतर जी वास्तवादी लेखनाची मराठी साहित्यात स्वत:ची अशी जागा निर्माण केली, याचे अध्वर्यू म्हणूनच आपल्याला ज्येष्ठ लेखक आनंद यादव यांच्या लेखनाकडे पाहता येते. किंबहुना आनंद यादव यांच्या लेखनापासूनच ग्रामीण साहित्य चळवळीचा प्रारंभ झाला. त्यामुळे साहजिकच त्यांच्या एकूण वाङ्मयीन वकृत्वाकडे 'ग्रामीण लेखनाचा बाप' म्हणून पाहिले जाते. त्यांच्या निधनाची बातमी सगळीकडे पसरली तेव्हा अर्थातच आजच्या पिढीतील तरुण ग्रामीण साहित्यिकांच्या तोंडूनही न कळत शब्द बाहेर पडले ते 'आमा बाप आभाळ झाला !'

